सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | सोमवार, १५ जून २०२६ । वर्ष ४ थे अंक ९८ । पाने १२ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

# दोन ठिकाणी झालेल्या अपघातात ११ जणांचा मृत्यू, १७ जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जून-**

तांदुळवाडी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) आणि लातूर-औसा रोड असे दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात अनुक्रमे ८ आणि ३ असे एकूण ११ जणांचा मृत्यू तर १० आणि ७ असे एकूण १७ जण जखमी झाल्याची दुर्दे वी घटना रविवार, दि.१४ जून २०२६ रोजी घडली. कालरोजी अमावस्या होती. त्यामुळे या अपघातग्रस्तांसाठी आजचा दिवस जणू काळा दिवस ठरल्याची चर्चा त्या-त्या ठिकाणच्या घटनास्थळावर सुरु होती.

## पिकअप विहिरीत पडून ८ जणांचा मृत्यू, ७ जखमी



### विहिरीला कठडा नसल्याने अपघात

रस्त्याच्या कडेला असणाऱ्या विहिरीला सुरक्षा कठडा नसल्याने अपघात घडला आहे. गेल्या आठ दिवसांपूर्वी सदर वाहन दुसऱ्या एका विहिरीत गेली होती. परंतु त्यावेळी सुदैवाने मनुष्यहानी झाली नव्हती, असे सांगण्यात येते.

### लोकप्रतिनिधींची घटनास्थळाला भेट

या अपघाताची माहिती मिळताच पालकमंत्री जयकुमार गोरे, खा.धैर्यशील मोहिते-पाटील, खा.प्रणिती शिंदे, आ.उत्तमराव जानकर, आ.अभिजित पाटील, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ आदींनी घटनास्थळाला भेट देऊन माहिती घेतली.

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस । अकलूज । पिलीव, दि.१४ जून-**

सातारा जिल्ह्यातील म्हसवड येथील श्रीसिध्दनाथ मंदिर येथे देवदर्शन करुन गावी परतत असताना तांदुळवाडी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील एका विहिरीत पिकअप वाहन कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू तर ७ जण जखमी झाल्याची घटना रविवार, दि.१४ जुलै २०२६ घडली. हे सर्व भाविक पंढरपूर तालुक्यातील रांजणी येथील आहेत.

एम.एच.१३ डी.ओ.६३३५ या क्रमांकाच्या पिकअप वाहनाद्वारे ही मंडळी देवदर्शनासाठी जाऊन येत होते. रविवारी दुपारचे जेवण करुन ते पुढील प्रवासाला निघाले असता सातारा-पंढरपूर रोडवरील तांदुळवाडी येथील कदम वस्ती येथे चालकाचा वाहनावरील ताबा सुटून रस्त्यालगत असलेल्या विहिरीत पिकअप वाहन कोसळून हा अपघात घडला.

यातील मृतांची नावे याप्रमाणे; पूजा अमोल सातोरे, ताई बावचे, पूजा बालाजी बावचे, अश्विनी संदीप बावचे, सार्थक संदीप बावचे, संस्कृती संदीप बावचे, गणेश बालाजी बावचे, बालाजी बावचे यांचा लहान मुलगा. जखमींची नावे अशी, सिध्देश्वर पोपट जाधव, सागर चौगुले, अपूर्व अमोल सातोरे, बालाजी बावचे, संदीप बावचे. या जखमींना पंढरपूर येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या अपघातील मयत एकाच कुटुंबातील असल्याचे सांगण्यात येते. सौरभ कोळी, स्वप्नील कदम व इरफान मुजावर या तिघांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता विहिरीत उड्या मारुन सात जणांचे प्राण वाचविले. दरम्यान, घटनास्थळी उपस्थित असलेल्यांनी या तिघांचे कौतुक केले. वेळापूर पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे हे पुढील तपास करीत आहेत.

## औसा-लातूर रोडवर भीषण अपघात; तिघांचा जागीच मृत्यू ; १० जखमी





**तभा वृत्तसेवा**
**औसा दि. १४ जून -**

राष्ट्रीय महामार्गावरील औसा लातूर रोडवरील बुधोडा जवळ उमरगा येथील क्रुझर ला क्रेटा कारने रविवार दि. १४ रोजी रात्री बारा ते एक वाजण्याच्या सुमारास पाठीमागून जोरदार धडक दिली यामध्ये तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. तर १० जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात झालेल्या जखमीवर लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय रुग्णालय येथे उपचार करण्यात येत आहेत. तर याप्रकरणी औसा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

औसा तालुक्यातील बुधोडा गावाजवळ हॉटेल द्वारका जवळ औसा कडून लातूर कडे जाणाऱ्या क्रुझर जीप क्रमांक एम एच १२ सी आर ८०७७ ला क्रेटा कार क्रमांक एम एच २४ए डब्ल्यू ३६९१ ने पाठीमागून जोरदार धडक दिली. यामुळे क्रुझर जीप मधील निलावती पाटील, रेशमा पाटील, सरोजा पतंगे या तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला. लक्ष्मण मसरे दिपाली स्वामी शितल देशमुख सुचिता प्रवीण देशमुख कल्पना देशमुख कन्हैया स्वामी गंगाधर काटे विघ्नेश्वर पाटील मानसिक कोलंगे भक्ती देशमुख जखमी झाले आहेत.

या जोरदार धडकेत झालेल्या मोठ्या आवाजामुळे गावकरी गडबडून जागे झाले. आणि जमलेल्या गावकऱ्यांनी जखमींना वाहनातून काढून उपचारासाठी लातूर येथील दवाखान्यात पाठवले. जखमींना तात्काळ उपचार मिळाल्यामुळे पुढील जीवित हानी तळली असल्याचे चर्चिले जात आहे. या अपघातात रेशमा पाटील वय२९ वर्ष सरोजा पतंगे वय ४२ वर्ष रा. उमरगा यांचा मृत्यू झाला आहे तर तिसऱ्या व्यक्तीचे नाव अद्याप समोर आलेले नाही.

या अपघातानंतर घटनास्थळी काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करून वाहतूक सुरळीत केली. अपघात नेमका कशामुळे झाला. याबद्दल अद्याप स्पष्ट माहिती मिळू शकली नाही. क्रेटा कार चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शी सांगत आहेत.

याप्रकरणी चालक लक्ष्मण मसरे यांनी औसा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून कार चालक आदित्य श्रीहरी भताने रा. लातूर यांच्या विरुद्ध औसा पोलिसात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक आर के डमाळे करीत आहेत.




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# रशियाचे तेल टँकर ब्रिटनकडून जप्त

## – आता इंग्लिश खाडीत नव्या संघर्षाची नांदी
## – स्टारमर यांचा पुतिन यांना दणका

**लंडन, १४ जून**

ब्रिटनच्या नौदलाने इंग्लिश चॅनलमधून जाणाऱ्या रशियन सरकारी कंपनीच्या तेल टँकर अडवले आणि त्याला जप्त करून घेऊन गेले. ब्रिटनची कारवाई रशियासाठी मोठा धक्का असून, दोन्ही देशात तणाव वाढण्याची शक्यता आहे. ब्रिटनने तेलवाहू जहाज प्रतिबंधित यादी असल्याने कारवाई केल्याचे सांगितले आहे.


रशियाच्या तेलवाहू जहाजावर कारवाई करताना ब्रिटनचे सशस्त्र दल

ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांनी रविवारी सांगितले की, रशियाच्या युद्धयंत्रणेला आर्थिक धक्का देण्याच्या उद्देशाने ही कारवाई महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटनच्या संरक्षण मंत्रालयाने अधिकृत निवेदनात म्हटले की, रविवारी पहाटे सुरू झालेल्या सुमारे सहा तासांच्या मोहिमेत ब्रिटिश सशस्त्र दल, रॉयल मरीन कमांडो आणि नॅशनल क्राईम एजन्सीच्या विशेष अधिकाऱ्यांनी ‘स्मर्टोस’ या रशियाच्या तेलवाहू जहाजावर चढून त्याचा ताबा घेतला. या मोहिमेत ब्रिटिश वायुदलाने देखील महत्त्वाची भूमिका बजावली. रशियाचे तेलवाहू जहाज आणि त्यावरील कर्मचारी ब्रिटनच्या ताब्यात आहेत. हे जहाज सध्या इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्याजवळ निगराणीखाली आहे. जहाजाच्या हालचाली आणि मालकीशी संबंधित कागदपत्रांचीही चौकशी केली जात आहे. (वृत्तसंस्था)

### युद्धखोर देशाला धक्का देणारी कारवाई

पंतप्रधान स्टारमर यांनी सांगितले की, ही यशस्वी कारवाई रशियाला आणखी एक मोठा धक्का आहे. युक्रेनमधील युद्ध सुरू ठेवण्यासाठी रशियाला निधी पुरवणाऱ्यांनी हा संदेश घेतला पाहिजे की, ब्रिटन त्यांना लपून बसू देणार नाही. रशिया आपल्या ‘शॅडो फ्लीट’च्या माध्यमातून युक्रेन युद्धाला निधी पुरवतो. रशियाला याची किंमत चुकवावी लागेल. रशियाच्या छुप्या नौदलावर दबाव वाढवण्यासाठी ब्रिटन आणि फ्रान्स एकत्र काम करत आहेत.

### ५०० हून अधिक जहाजांवर बंदी

ब्रिटनने आतापर्यंत रशियाशी संबंधित ५०० हून अधिक जहाजांवर बंदी घातली आहे. या निर्बंधांमुळे अशा जहाजांना ब्रिटिश बंदरांमध्ये प्रवेश करण्यास मनाई आहे. ब्रिटिश कंपन्या आणि नागरिकांनाही या जहाजांना आर्थिक, विमा किंवा दलाली सेवा देण्यास मनाई आहे.

### रशियाचा ‘शॅडो फ्लीट’ म्हणजे काय?

रशियावर लादलेल्या पाश्चात्य निर्बंधांनंतर, मॉस्कोने शेकडो तेल टँकर्सचे एक जाळे तयार केले आहे, जे ‘शॅडो फ्लीट’ म्हणून ओळखले जाते. या जहाजांच्या मालकीची रचना अनेकदा अस्पष्ट असते आणि आंतरराष्ट्रीय निर्बंधांना टाळून रशियन तेल विकण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. निर्बंध असलेल्या तेलापैकी सुमारे ७५ टक्के तेल या ‘शॅडो फ्लीट’द्वारे जगभरातील विविध बाजारपेठांमध्ये पोहोचवले जाते.

# भाजपा युवा मोर्चाच्या नेत्याची हत्या

## संतप्त जमावाने आरोपीचे घर जाळले, पोलिसांवर दगडफेक

**डेहराडून, १४ जून**

सहसपूर भागातील बैरागीवाला गावात शनिवारी रात्री दोन समुदायांमध्ये झालेल्या हिंसक संघर्षानंतर वातावरण तणावपूर्ण झाले आहे. भाजपा युवा मोर्चाचे नेते विनोद कुमार यांच्या हत्येमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. शेकडो लोकांनी महामार्गावर उतरून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, जमावाने आरोपींच्या घराला आग लावली.तर पोलिस आणि प्रशासनाने एका आरोपीचे घर बुलडोझरने पाडले. तसेच संतप्त जमावाने पोलिसांवर दगडफेकही केली.



बैरागीवाला गावात शेताला पाणी देण्यावरून दोन समुदायांच्या सदस्यांमध्ये वाद निर्माण झाला. दुसऱ्या समुदायाच्या सदस्यांनी विनोद कुमार, अशोक कुमार आणि राजेश कुमार यांच्यावर हल्ला केला. अतिरक्तस्त्रावामुळे विनोद कुमार यांचा मृत्यू झाला, तर इतर दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी रझ्झाक, अमन, युनूस, जावेद, इम्तियाज, शहबाज, शराफत अली, आदिल, शमून, सलमान आणि इंतजार यांच्यासह सुमारे २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सांगितले की, दोन समुदायांच्या सदस्यांमध्ये आधीपासूनच वाद होता. गत तीन दिवसांपासून शेतांना पाणी देण्यावरून त्यांच्यात वाद सुरू होता. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, रझ्झाक, सलमान, युनूस आणि जावेद या चार आरोपींना अटक करण्यात आली असून इतर आरोपींना पकडण्यासाठी ठिकठिकाणी छापे टाकत आहेत.

**घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर**

या हत्याकांडाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. त्यात त्या तरुणाला कशी मारहाण करण्यात आली हे स्पष्टपणे दिसत आहे. फुटेजनुसार, शनिवारी विनोद आणि त्याचा भाऊ सरकारी विहिरीतून आपल्या शेतांना पाणी देत होते. यावर लगतचे शेतकरी इम्तियाजने आक्षेप घेतला.काही क्षणातच दोन्ही पक्षांमध्ये वाद सुरू झाला. अमन, युनूस, अनीस आणि रझ्झाकही घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये मारामारी सुरू झाली.

**जाळपोळीनंतर आरोपीच्या घरावर चालवला बुलडोझर**

विनोदच्या हत्येनंतर गावात जातीय तणाव निर्माण झाला.रविवारी बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आणि स्थानिक रहिवासी आरोपीचे घर जेसीबीने पाडण्याच्या मागणीसाठी गावात जमले. संतप्त जमावाने आरोपीच्या घराला आग लावली. जाळपोळीनंतर पोलिसांनी आरोपींचा पाठलाग केला असता लोकांनी पोलिसांवर दगडफेक केली. परिसरातील तणावानंतर प्रशासकीय पथके घटनास्थळी दाखल झाली. गावकऱ्यांच्या विरोधानंतर आरोपीच्या घरावर बुलडोझर चालवण्यात आला. (वृत्तसंस्था)

### तरुणाची हत्या सर्वांसाठी धक्कादायकः तोगडिया

विश्व हिंदू परिषदेचे माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष, प्रवीण तोगडिया यांनी या घटनेवर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, एका विशिष्ट समुदायाकडून तरुणाची हत्या होणे हे सर्वांसाठी धक्कादायक आहे. कधी दिल्लीत आपली मुले मारली जातात, तर कधी गाझियाबादमध्ये यावरून असे दिसते की, देशात हिंदू सुरक्षित नाहीत.

### अमेरिकेत गोळीबार; तीन ठार, १० जखमी

**टेक्सास, १४ जून**

अमेरिकेच्या टेक्सासमधील मिडलॅण्ड येथे एका हल्लेखोराने केलेल्या बेछूट गोळीबारात तीन तरुणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी आहेत. पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत ४५ हल्लेखोर व्हिक्टर माटा व्हिलारियल याचा मृत्यू झाला. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रविवारी सकाळी ८ वाजता हल्लेखोराने रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करत गोळीबार केला.

# रशियन तेल खरेदीत भारत दुसरा

## भारताकडून आयात मोठ्या प्रमाणात वाढली

**महिनाभरात आयातीत २१ टक्के वाढ**

**स्वस्त तेलावरील विश्वास कायम**

**नवी दिल्ली, १४ जून**

अमेरिकेच्या निर्बंधानंतरही भारताची रशियाकडून होणारी कच्च्या तेलाची खरेदी सुरूच आहे. स्वस्त रशियन तेलावर विश्वास कायम ठेवत रशियाकडून करण्यात येणाऱ्या तेल खरेदीत मे महिन्यात २१ टक्क्याने वाढ झाली. सध्या भारत जगातील दुसरा तेल खरेदीदार देश बनला आहे.




भारताने रशियाकडून ५.८ अब्ज युरो (६.७ अब्ज डॉलर्स) किमतीच्या कच्च्या तेलाची खरेदी केली. रशियाकडून होणाऱ्या तेलाच्या आयातीत २१ टक्क्यांनी वाढ झाली, ज्यामुळे भारत रशियन तेलाचा जगातील दुसरा सर्वात मोठा खरेदीदार बनला असल्याची माहिती सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर या जागतिक संस्थेने जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे. वडीनार, जामनगर, विशाखापट्टणम आणि पारादीप यांसारख्या तेल शुद्धीकरण प्रकल्पामध्ये रशियाच्या तेलावर प्रक्रिया केली जात आहे.

### तेल निर्यातीत विक्रमी वाढ

रशियाकडून खरेदी केलेल्या तेलावर प्रक्रिया करून युरोपियन देशांना भारताने मोठ्या प्रमाणात निर्यात केली. यामध्ये तुर्की, ब्रुनेई आणि जॉर्जिया या देशांचा समावेश आहे. या देशांना ६४१ दशलक्ष युरो किमतीच्या तेल उत्पादनांची निर्यात करण्यात आली.

### ऊर्जा खर्च नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न


मे २०२६ मध्ये रशियाकडून झालेल्या एकूण आयातीत कच्च्या तेलाचा वाटा ८३ टक्के होता. देशांतर्गत ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी रशियाकडून तेल खरेदी वाढवण्याची निर्णय घेतल्याचे अहवालात म्हटले आहे. निर्बंधांनंतर बदलत्या जागतिक ऊर्जा समीकरणांच्या पृष्ठभूमीवर, भारताने रशियाकडून तेल खरेदी करून आपला ऊर्जा खर्च नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

सवलतीच्या दरांमुळे, भारताच्या ऊर्जेच्या गरजांसाठी रशिया प्रमुख स्त्रोत आहे. परवडणाऱ्या इंधन पुरवठ्याच्या गरजेच्या पृष्ठभूमीवर भारताने मे २०२६ मध्ये रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी वाढवली. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### बड्या कलाकारांचा कार्यक्रम रद्द

**पुणे :** पुण्याच्या विमाननगर परिसरातील फिनिक्स मॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमादरम्यान मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. बॉलिवूड कलाकार शाहिद कपूर, रश्मिका मंदाना आणि कृती सॅनन यांच्या उपस्थितीमुळे मोठ्या संख्येने प्रेक्षक जमा झाले होते. मात्र, गर्दी नियंत्रणाबाहेर गेल्याने कार्यक्रमात अराजकसदृश स्थिती निर्माण झाली आणि अखेर आयोजकांना तो तातडीने रद्द करावा लागला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कार्यक्रम कोणत्याही पास किंवा तिकीटाशिवाय सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला होता. यामुळे अपेक्षेपेक्षा अधिक गर्दी झाली. कार्यक्रम सुरू होताच आणि कलाकार मंचावर येताच प्रेक्षकांचा उत्साह अनावर झाला. गर्दीतील काही लोकांनी बॅरिकेड्स बाजूला सारून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. सुरक्षेसाठी तैनात असलेले बाऊन्सर्स आणि सुरक्षा कर्मचारी गर्दीसमोर अपुरे पडल्याचे चित्र निर्माण झाले. याच दरम्यान कलाकारांच्या दिशेने काही लोक धावून गेल्याचे आणि त्यामुळे मंच परिसरात धक्काबुक्की झाल्याचेही समोर आले.




### ‘झापुक झुपुक’च्या घरी आनंदाची लाट

**मुंबई :** मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय आणि प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारा ‘बिग बॉस’ विजेता सूरज चव्हाण आता आयुष्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, सूरज लवकरच बाबा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या आनंद वार्तेवर त्याची जवळची मैत्रीण आणि अभिनेत्री जाह्नवी किल्लेकरने शिक्कामोर्तब केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी एक खास व्हिडिओ जाह्नवीने सोशल मीडियावर शेअर केला होता. त्या व्हिडिओसोबत तिने दिलेल्या संदेशात सूरजच्या पत्नी संजना यांच्या गरोदरपणाची आनंदवार्ता जाहीर केली होती. या घोषणेनंतर सूरजच्या चाहत्यांमध्ये आनंद आणि उत्सुकतेचे वातावरण नर्माण झाले आहे.



### प्रणित मोरेच्या वादात मुनव्वर फारुकीची ‘एन्ट्री’



**मुंबई :** सध्या सोशल मीडियावर गाजत असलेल्या ३७० रुपयांच्या बिर्याणी वादाला आता नवे वळण मिळाले असून या प्रकरणात ‘बिग बॉस’ विजेता आणि कॉमेडियन मुनव्वर फारुकी याने केलेल्या उपरोधिक टिप्पणीमुळे चर्चेला अधिकच उधाण आले आहे. वादाच्या केंद्रस्थानी असलेला कॉमेडियन प्रणित मोरे हा सध्या राष्ट्रीय महिला आयोग, पोलिस तपास आणि सोशल मीडियावरील तीव्र ट्रोलिंगमुळे अडचणीत सापडला आहे. मुनव्वर फारुकीने सोशल मीडियावर केलेल्या पोस्ट्समुळे या वादाला आणखी धार चढली आहे. मुनव्वरने उपरोधिक शैलीत केलेल्या पोस्टमध्ये ३७० रुपयांच्या बिर्याणीचा उल्लेख करत संबंधित प्रकरणावर खोचक टिप्पणी केली. तसेच कॉमेडियन्सनी आपले साहित्य प्रसिद्ध करण्यापूर्वी वकिलांकडून तपासून घ्यावे, असा सल्लाही त्याने दिला.

# नाकाबंदीच्या उल्लंघनामुळे जहाजावर क्षेपणास्त्राचा मारा

**वॉशिंग्टन, १४ जून**

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी त्यांचे भारतीय समकक्ष एस. जयशंकर यांच्यासोबत होर्मुझच्या सामुद्रधुनीतील परिस्थितीवर दूरध्वनीवरून चर्चा केली. व्यापारी जहाजांनी अमेरिकेच्या आदेशांचे पालन करण्याची गरज आणि इराणी तेलाची अवैध वाहतूक यावर त्यांनी आपल्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार करीत भारतीय खलाशांच्या मृत्युसंदर्भात भारताने केलेला निषेध फेटाळला. होर्मुझ जलमार्गात नाकाबंदी केल्यामुळेच अमेरिकेच्या सैन्याने क्षेपणास्त्राचा वापर केला. होर्मुझमधील नाकाबंदीचे उल्लंघन सहन केले जाणार नाही. (वृत्तसंस्था)

# सयोनी-माला यांना पदावरून हटवले

**कोलकाता, १४ जून**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या राजकीय गोंधळाच्या पृष्ठभूमीवर पक्षाध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी मोठे संघटनात्मक बदल केले आहेत. बॅनर्जी यांनी खासदार सयोनी घोष आणि खासदार माला रॉय यांना त्यांच्या महत्त्वाच्या पदांवरून हटवून पक्षाच्या युवा आणि महिला युनिटमध्ये नवीन चेहऱ्यांना नियुक्त केले आहे. पक्षात असंतोष आणि बंडखोरीच्या पृष्ठभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे.



खासदार सयोनी घोष यांना युवा तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून हटवण्यात आले असून, ही जबाबदारी तरुण नेते अर्णब बॅनर्जी यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. तृणमूल महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी खासदार माला रॉय यांच्या जागी आमदार अलिफा अहमद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच ममता बॅनर्जी यांनी संघटनात्मक पुनर्रचनेदरम्यान सयोनी घोष आणि माला रॉय यांची या पदांवर पुन्हा नियुक्ती केली होती. परंतु, हा अचानक झालेला बदल पक्षांतर्गत सुरू असलेल्या सत्तासंघर्षाशी जोडला जात आहे. (वृत्तसंस्था)

### अभिषेक बॅनर्जी पुन्हा सीआयडीसमोर

**कोलकाता, १४ जून**

आमदारांच्या बनावट सह्या प्रकरणी सीआयडी रविवारी अभिषेक बॅनर्जी यांची पुन्हा चौकशी करत आहे. तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी दुपारी १२ वाजण्याच्या नियोजित वेळेपूर्वीच भवानी भवन येथे पोहोचले. सकाळी ११:४३ वाजता त्यांची गाडी सीआयडी मुख्यालयात दाखल झाली. विधानसभेतील विरोधी पक्षनेत्याच्या नियुक्तीशी संबंधित एका ठराव पुस्तिकेवरील अनेक आमदारांच्या सह्यांवरून वाद निर्माण झाला होता. या प्रकरणी रविवारी अभिषेक बॅनर्जी यांची पुन्हा चौकशी केली जात आहे. डीआयजी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वात सीआयडीच्या विशेष तपास पथकाचे सदस्य अभिषेकची चौकशी करत आहेत. आमदारांच्या बनावट सह्यांमध्ये त्यांची भूमिका काय आहे, हे निश्चित करणे हा याचौकशीचा मुख्य उद्देश आहे. (वृत्तसंस्था)

# आयुष्मान भारत योजनेत ६५५ कोटींचा घोटाळा

## एआयने आणला उघडकीस, २,०२१ रुग्णालयांवर कठोर कारवाई

**नवी दिल्ली, १४ जून**

बनावट वैद्यकीय अहवालांच्या आधारे अनेक रुग्णालये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत फसवणुकीच्या कारवायांमध्ये गुंतलेली आहेत. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगचा वापर करून ६५५.०४ कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या दाव्यांचा शोध लावला आहे. यात एक्स-रे अहवाल, रक्त तपासणी अहवाल, एमआरआय आणि सीटी स्कॅनशी संबंधित फसवणुकीच्या दाव्यांचा समावेश आहे, जे वेगवेगळ्या रुग्णांच्या नावावर वापरले गेले होते तसेच रुग्णांच्या माहितीमध्ये फेरफार करण्यात आला होता किंवा एकाच वैद्यकीय कागदपत्रांचा वापर वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाव्यांसाठी केला गेला होता.



एनएचएच्या मते, या फसवणुकीत सामील असलेल्या २,०२१ रुग्णालयांना पॅनेलमधून वगळण्यात आले आहे. ५९० रुग्णालयांना निलंबित करण्यात आले असून, २६ रुग्णालयांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. सरकारने रुग्णालयांवर २६३.७१ कोटी रुपयांचा दंडही लावला आहे. एका एआय-आधारित इमेज ॲनालिटिक्स प्रणालीने अशी प्रकरणे शोधून काढली, जिथे एकाच एक्स-रे फिल्मचा वापर तीन वेगवेगळ्या रुग्णांच्या दाव्यांसाठी केला गेला होता. तपासात असे उघड झाले की, सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये केवळ रुग्णाचे नाव, आयडी आणि तारीख बदलण्यात आली होती. प्रणालीने याला ‘संभाव्य इमेज टॅम्परिंग’ म्हणून चिन्हांकित केले. याशिवाय एकाच रुग्णाचा अहवाल दोन वेगवेगळ्या रुग्णांच्या दाव्यांसाठी वापरला गेला होता. फसवणूक शोधण्यासाठी समान कागदपत्रे ओळखण्याकरिता इमेज हॅशिंग आणि डॉक्युमेंट ॲनालिटिक्स तंत्रांचा वापर करण्यात आला.

**एकाच वापरकर्त्याचे २० पेक्षा जास्त लाभार्थी कार्ड**

गुडघ्याच्या इम्प्लांटशी संबंधित प्रकरणांमध्ये मशीन लर्निंग-आधारित प्रणालीला असे आढळले की, वेगवेगळ्या रुग्णालयांच्या दाव्यांमध्ये एकाच इम्प्लांटचा बारकोड आणि तपशील वापरण्यात आला होता. यामुळे उपचार आणि बिलिंगच्या नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा संशय निर्माण झाला. सोशल नेटवर्क विश्लेषणाद्वारे, एआयने अशी संशयास्पद नेटवर्क्स देखील ओळखली, जिथे एकाच वापरकर्त्याने २० पेक्षा जास्त लाभार्थी कार्ड तयार केली होती. त्या सर्वांना एकाच दिवशी एकाच रुग्णालयात दाखल करण्यात आले होते व त्यांच्यावर एकाच दिवशी अँजिओप्लास्टी करण्यात आली होती.

**वैद्यकीय अहवालांचीही तपासणी**

ऑप्टिकल कॅरेक्टर रेकग्निशन आणि डीप लर्निंग तंत्रांचा वापर करून प्रयोगशाळेच्या अहवालांची तपासणी केली जात आहे. यामुळे अशी प्रकरणे समोर आली आहेत, जिथे पांढऱ्या रक्त पेशींची संख्या सामान्य मर्यादेत होती. परंतु रुग्णालयाने गंभीर संसर्ग झाल्याचा अहवाल देऊन ती जास्त असल्याचे सांगितले. (वृत्तसंस्था)

### तंत्रज्ञानाचा शस्त्राप्रमाणे वापर

- चेहऱ्याच्या तुलनेद्वारे ओळख पडताळणी
- ऑब्जेक्ट डिटेक्शनचा वापर करून महत्त्वाच्या कागदपत्रांची ओळख
- इमेज डिड्युप्लिकेशनचा वापर करून डुप्लिकेट कागदपत्रांची ओळख
- बनावट कागदपत्रांचे नमुने घेणे
- कागदपत्रांमधील साम्य तपासणे
- सोशल नेटवर्क अनालिसिसचा वापर करून संशयास्पद नेटवर्क्सची ओळख

### रील्स स्टार भाटीचा अपघातात मृत्यू

**मुंबई, १४ जून**

सोशल मीडियावर हॉरर आणि कॉमेडी रील्समुळे लोकप्रिय ठरलेला कल्याण येथील तरुण रील्स स्टार प्रेम भाटी याचा रस्ते अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. १३ जून रोजी पहाटेच्या सुमारास मोहने परिसरात रस्त्यावर पडलेले खड्डे आणि विखुरलेली खडी यामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटून हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रेम भाटी हा १३ जून रोजी पहाटे सुमारे ३ वाजता कल्याणच्या मोहने परिसरातून आपल्या घरी परतत होता. याच दरम्यान शिवसेना शाखेजवळील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे आणि बांधकामाची खडी पसरलेली होती. या असुरक्षित रस्त्यावर दुचाकी घसरल्याने त्याचे नियंत्रण सुटले. (वृत्तसंस्था)



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोमवार, १५ जून २०२६

### विचारपुष्प



हक्कांचे संरक्षण कायद्याने नव्हे, तर समाजाच्या सामाजिक आणि नैतिक सद्सदविवेकबुद्धीने होते. कायद्याने दिलेले हक्क स्वीकारण्यास जेव्हा समाजमन सिद्ध होईल, तेव्हाच ते हक्क अबाधित आणि सुरक्षित राहतील.

**- स्व. पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# भारत आता योगदान देणारा देश : पंतप्रधान

## फ्रान्समध्ये 'भारत इनोव्हेट्स'चे नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन

**नीस, १४ जून**

भारत उपाययोजनांचे केंद्र आणि जागतिक नवोपक्रमांमधील एक उदयोन्मुख शक्ती आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. भारत केवळ जगभरातील तंत्रज्ञानाचा ग्राहक नसून विविध क्षेत्रांत योगदान देणारा देश झाला आहे. नावीन्य आणि सर्वसमावेशकता या गोष्टी विरोधाभासी नाहीत, असे फ्रान्समधील नीस येथे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्यासोबत 'भारत इनोव्हेट्स'च्या उद्घाटनप्रसंगी संबोधित करताना मोदी यांनी सांगितले.

नवोन्मेष आणि सर्वसमावेशकता एकमेकांचे शत्रू नसून, ते एकमेकांना पूरक आहेत. एखादा नवोन्मेष त्याच्या मूल्यांकनामुळे नाही, तर मानवी जीवनावर होणाऱ्या त्याच्या प्रभावामुळे महान ठरतो. केवळ संकुचित व्यावसायिक हितसंबंधांचा विचार न करता मानवतेच्या हितासाठी उपाययोजना करण्याच्या दिशेने काम करणाऱ्या भारतीय तरुणांचे नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले. भारतीय तरुणांची मानसिकता आता बदलली आहे. ते संपूर्ण मानवतेचा विचार करतात, असे ते म्हणाले.

शाश्वतता केंद्रस्थानी ठेवून भारत जगासाठी नवनवीन शोध लावत आहे. भारत वेगाने आणि मोठ्या प्रमाणावर नवनवीन शोध लावत आहे. भारत शाश्वत जगासाठी नवनवीन शोध लावतआहे, असे मोदी यांनी सांगितले. आमच्या सरकारने मागील १२ वर्षांत मजबूत नवोन्मेष परिसंस्था उभारण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. नवोन्मेष तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे उदाहरण म्हणून त्यांनी शाळांमधील 'अटल टिंकरिंग लॅब्स' कार्यक्रमाचाही उल्लेख केला. या कार्यक्रमादरम्यान फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी भारताची मुक्तकंठाने प्रशंसा केली. या भव्य कार्यक्रमाचे उद्घाटन दोन्ही नेत्यांनी संयुक्तपणे केले. आज भारत नाविन्यपूर्ण उपक्रमांचे (इनोव्हेशन) एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आला आहे आणि दोन्ही देशांमध्ये अत्यंत दृढ व प्रामाणिक संबंध आहेत. भारताच्या उत्पादन क्षेत्रातील उपक्रमाचे कौतुक करताना मॅक्राँ म्हणाले, मी भारताच्या 'मेक इन इंडिया' मोहिमेचा पूर्ण आदर करतो आणि या प्रयत्नात फ्रान्स भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. संरक्षण ते तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्ये दोन्ही देश खांद्याला खांदा लावून काम करीत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. (वृत्तसंस्था)

### नवोन्मेष भारताच्या रक्तात

नवोन्मेष हा भारताच्या रक्तात आहे, असे मोदी यांनी भारताच्या नवोन्मेषाचा मागोवा घेताना सांगितले. हजारो वर्षांपासून भारताने वैद्यकशास्त्र, योग, गणित आणि विज्ञान या क्षेत्रांतील योगदानातून मानवतेच्या प्रगतीला आकार दिला, असे ते म्हणाले.



नीस येथे आयोजित शिक्षण आणि परिसंस्था विषयक कार्यक्रमात सहभागी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ

## महत्त्वाचे

### नीरव मोदीवरील भ्रष्टाचाराचे आरोप रद्द

**मुंबई :** पंजाब नॅशनल बँकेची ३२१.८८ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सीबीआयने नीरव मोदी, त्याच्या कंपन्या आणि इतर संचालकांविरुद्ध दाखल केलेल्या प्रकरणांपैकी एका प्रकरणात, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत लावण्यात आलेले आरोप विशेष सीबीआय न्यायालयाने रद्द केले. सीबीआयनेच हे आरोप रद्द करण्याची मागणी विशेष न्यायालयाकडे केली होती. पंजाब नॅशनल बँकेच्या कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा सिद्ध होत नाही, असे आढळले.

# सारस्वतांचा शंभरावा मेळा पुणे विद्यापीठात

## २८ ते ३१ जानेवारी दरम्यान अ. भा. मराठी साहित्य संमेलन

**पुणे, १४ जून**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या शतक महोत्सवी पर्वाचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरात २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी रविवार १४ जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा करत साहित्य संमेलनाचे स्वरुप थोडक्यात विस्तृत केले.



मराठी साहित्य संमेलनाबाबत माहिती देताना योगेश सोमण

संमेलनस्थळासाठी स. प. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या तीन ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. विस्तीर्ण परिसर, आधुनिक सुविधा, स्वतंत्र सभागृहे, निवास व वाहनतळाची व्यवस्था आणि वाहतूक कोंडीचा कमी धोका या निकषांवर पुणे विद्यापीठाची निवड करण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषद आयोजित आणि समर्थ युवा फाऊंडेशन संयोजित या स्वरूपात संमेलन होणार आहे. २८ जानेवारी रोजी संमेलनाची सुरुवात होईल. त्यानंतर तीन दिवस साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक आणि संवादात्मक कार्यक्रमांचे आयोजन आहे. पत्रकार परिषदेला महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोशाध्यक्ष प्रदीप निफाडकर आणि संयोजक संस्था असलेल्या समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे यावेळी उपस्थित होते.

महाकोशाकडे सध्या सुमारे अडीच कोटी रुपयांचा निधी असून शासनाकडून मदत मिळाल्यास शंभरावे संमेलन अधिक भव्य स्वरूपात आयोजित करता येईल, असे महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी सांगितले.

१५ ऑगस्ट २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत राज्यभर ९९ साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. 'नांदी शंभराव्या साहित्य संमेलनाची' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह विविध भागांत कार्यक्रम होणार आहेत. (तभा वृत्तसेवा)

# तृणमूलचे बंडखोर जाणार 'एनसीपी'त

**नवी दिल्ली, १४ जून**

राजधानी दिल्लीत रविवारी मोठ्या राजकीय नाट्यमय घडामोडी घडल्या.ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या सुमारे २० खासदारांनी बंड केले आहे. बंडखोर खासदारांनी सर्वप्रथम भाजपा मंत्री भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी जाऊन चर्चा केली. त्यानंतर त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांची भेट घेतली. या खासदारांनी 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी' नावाच्या एका छोट्या पक्षात विलीन होण्याची आणि एनडीएला पाठिंबा देण्याची घोषणा केली.

लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांची भेट घेतल्यानंतर बंडखोर तृणमूल खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी दावा केला की, २० खासदारांनी स्वतंत्रपणे बसण्याची मागणी केली आहे. आमचा गट 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया'मध्ये विलीन होत आहे.आम्ही पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात 'एनडीए'सोबत काम करणार आहोत. गट नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टीमध्ये सामील झाला आहे. (वृत्तसंस्था)

# आग लागल्याची अफवा, प्रवाशांनी मारल्या उड्या

## दुसऱ्या ट्रेनच्या धडकेत सहा जणांचा मृत्यू

**मोरेना, १४ जून**

मोरेना जिल्ह्यातील हेतमपूर आणि घेर रेल्वे स्थानकांदरम्यान रविवारी सायंकाळी एक भीषण अपघात घडला. बोगीला आग लागल्याची अफवा पसरल्यानंतर घाबरलेल्या प्रवाशांनी साखळी ओढून उदयपूर इंटरसिटी एक्सप्रेस थांबवली. त्यानंतर, काही प्रवाशांनी ट्रेनमधून उड्या मारल्या.त्याचवेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या पातालकोट एक्सप्रेसने त्यांना धडक दिली. यात सहा जणांचा मृत्यू झाला.तर अनेक प्रवाशी जखमी झाले आहेत. मृतांमध्ये तीन महिला व एका मुलाचा समावेशा आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



रविवारी सायंकाळी उदयपूर इंटरसिटी एक्सप्रेस ग्वाल्हेरहून मोरेनाकडे जात होती. एका प्रवाशाने डब्यात आग लागल्याची माहिती दिली. त्यामुळे डब्यात घबराट पसरली. घाबरलेल्या प्रवाशांनी आपत्कालीन साखळी ओढून ट्रेन थांबवली आणि अनेक जण उड्या मारुन खाली उतरले. दरम्यान, बाजूच्याच रेल्वेरुळावरून धोलपूरहून येणाऱ्या पातालकोट एक्सप्रेसच्या धडकेत काही प्रवासी गंभीर जखमी झाले.माहिती मिळताच, जीआरपी, आरपीएफ आणि मोरेना पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली. मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले.

**दिल्ली-मुंबई रेल्वे मार्गावरील वाहतूक विस्कळीत**

या अपघातामुळे मुख्य दिल्ली-मुंबई रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. मार्गावरील अनेक गाड्या थांबवण्यात आल्या, तर बाधित प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली. नंतर, रेल्वे मार्ग मोकळा करण्यात आला आणि रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात आली. रेल्वे प्रशासनाने या घटनेची चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक तपासात ट्रेनला आग लागल्याची पुष्टी झालेली नाही. (वृत्तसंस्था)

# मान्सून रुसला; कोकणात विसावला

**मुंबई, १४ जून**

यंदा केरळ येथे चार दिवस उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने सुरुवातीच्या टप्प्यात वेगाने वाटचाल करत संपूर्ण गोव्यासह तळकोकण गाठले. मान्सूनने हैदराबाद, ओडिशाच्या किनारपट्टी भागात, पश्चिम बंगाल, झारखंड आणि बिहारच्या काही भागात वाटचाल केली, मात्र कोकणच्यापुढे मान्सून सरकलेला नाही. आठवडाभरापासून मान्सून कोकणात असून महाराष्ट्र व्यापण्यासाठी अजून आठवडा लागणार असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे.

कोकण वगळता महाराष्ट्राच्या इतर भागात मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्याने उष्णतेपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला. आभाळाचा खेळ सुरू असताना मान्सूनच्या आगमनात सातत्याने होणारा विलंब शेतकऱ्यांची चिंता वाढवत आहे. सध्या महाराष्ट्रात मान्सून पुढे सरकत नसल्याचे चित्र आहे. अशातच छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला आणि वाशिम येथे उष्णतेचा 'यलो अलर्ट' तर, अमरावती, बुलढाणा आदी भागात उष्णेतचा 'ऑरेंज अलर्ट' हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्र १५ जूनपर्यंत मान्सूनचा पाऊस येईल अशी अपेक्षा होती, मात्र अरबी समुद्रातील अनुकूल नसलेल्या हवामान परिस्थितीमुळे त्याची पुढील वाटचाल संथ झाली आहे. नवीन अंदाजानुसार मुंबईसह विविध भागांत, २० जूनपर्यंत मान्सून पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या विलंबामागे प्रशांत महासागरात सक्रिय झालेला एल निनो असल्याचे सांगण्यात येत आहे.

**राज्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प**

अफगाणिस्तानकडून येणाऱ्या कोरड्या वाऱ्यांचा मान्सूनच्या वाटचालीला अडथळा येत असल्याचे हवामान अभ्यासकांचे म्हणणे आहे. या कोरड्या वाऱ्यांचा प्रभाव कमी झाल्यानंतरच मान्सूनची पुढील प्रगती अपेक्षित आहे. पुढील चार ते पाच दिवस राज्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तुरळक पावसाच्या सरी पडू शकतात. (वृत्तसंस्था)

# 'मातोश्री'वर चार खासदारांची हजेरी

## पाच खासदार ऑनलाईन उपस्थित

**मुंबई, १४ जून**

राज्याच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरु असून, या पार्श्वभूमीवर ठाकरे गटात मोठी अस्वस्थता पाहायला मिळत आहे. या संभाव्य धसक्यानेच मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांनी आपल्या खासदारांची बैठक बोलावली होती. विशेष म्हणजे, या बैठकीची पूर्वकल्पना दोन दिवस आधीच देऊनही ९ पैकी केवळ ४ खासदारच मातोश्रीवर प्रत्यक्ष हजर राहिले, तर तब्बल ५ खासदारांनी ऑनलाईन हजेरी लावणे पसंत केले. 'ऑपरेशन टायगर'च्या पार्श्वभूमीवर संख्याबळाच्या दृष्टीने ही हजेरी पूर्ण दिसत असली तरी, ५ जणांच्या ऑनलाईन उपस्थितीमुळे पक्षांतराच्या आणि संशयाच्या चर्चांना अधिकच उधाण आले आहे.



या बैठकीला अरविंद सावंत, संजय दीना पाटील, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे प्रत्यक्ष उपस्थित होते तर ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर, संजय देशमुख आणि संजय जाधव हे ऑनलाईन उपस्थित होते. दरम्यान, पक्षात सर्व काही आलबेल असल्याचा दावा ठाकरे गटाकडून आणि संजय राऊत यांच्याकडून केला गेला. खासदारांमधील अस्वस्थता आणि संभाव्य गळती रोखण्यासाठी आता उद्धव ठाकरे यांना दर महिन्याला या सर्व खासदारांशी संवाद साधण्यासाठी बैठक घ्यावी लागणार आहे. तसा निर्णयच त्यांनी आता घेतला आहे. तसेच प्रत्येक खासदाराला प्रसार माध्यमांकडे जाऊन आपण कोणाबरोबर आहोत, हे सांगण्याचे निर्देशही ठाकरेंनी दिले आहेत. दुसरीकडे, शिंदे गटाने यावर जोरदार पलटवार करत संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला आहे. संजय राऊत हे मनोरुग्ण असून त्यांना दवाखान्यात टाकले पाहिजे. 'ऑपरेशन टायगर'च्या बातम्यांशी आमचा कोणताही संबंध नाही, असे प्रत्युत्तर शिंदे गटाकडून देण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### संजय राऊतांना मराठीचा विसर

'ऑपरेशन टायगर'बाबत माध्यमांना प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांना चक्क मराठी भाषेचाच विसर पडल्याचे पाहायला मिळाले. राऊत यांनी सुरुवातीला पत्रकारांना आपली पहिली प्रतिक्रिया थेट हिंदीत दिली आणि तेथून ते चालू लागले. ते जात असताना तिथे उपस्थित असलेल्या पत्रकारांनी त्यांना मराठीत बोलायची आठवण करून दिली. पत्रकारांनी टोकल्यानंतर स्वतःची चूक लक्षात येताच, पुढे गेलेले राऊत मागे वळले आणि मग त्यांनी मराठीत प्रतिक्रिया दिली. त्यांच्या या कृतीची राजकीय वर्तुळात आणि माध्यमांमध्ये चांगलीच खमंग चर्चा रंगली आहे.

# उत्तर प्रदेश धर्मांतरात आणखी एकाला अटक

**मुझफ्फरनगर, १३ जून -**

उत्तर प्रदेशातील शामली जिल्ह्यात कथित बेकायदेशीर धार्मिक धर्मांतराच्या प्रकरणात आणखी एकाला अटक करण्यात आली असून, आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी 'निकाहनामा' जप्त केला, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. आयुष मलिक याच्या धर्मांतराशी संबंधित आरोपांच्या तपासादरम्यान तौसिफ उर्फ भोला या आरोपीला अटक करण्यात आली, असे पोलिस अधीक्षक एन. पी. सिंग यांनी सांगितले. आयुषचे वडील देवराज मलिक यांच्या तक्रारीवरून ६ जून रोजी हा गुन्हा दाखल करण्यात आला. चांदनी कुरेशी नावाच्या महिलेशी लग्नाच्या बहाण्याने अनेक वर्षांपूर्वी त्यांच्या मुलाचे इस्लाममध्ये धर्मांतरण करण्यात आले होते, असा आरोप त्यांनी केला आहे. आयुषला दिल्लीत नेण्यात आले. तिथे बनावट कागदपत्रांचा वापर करून निकाह लावण्यात आला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला. तौफिकला अटक केली त्यावेळी त्याच्याकडून एक निकाहनामा हस्तगत करण्यात आला. मात्र, पोलिसांनी या दस्तावेजाबाबत किंवा या प्रकरणात आरोपीच्या नेमक्या भूमिकेबाबत तपशील जारी केले नाहीत.

# भारताची विजयी सलामी; पाकिस्तानला नमविले

## महिला टी-२० विश्वचषक: दीप्ती शर्माचे ५ बळी


**बर्मिंगहॅम, दि. १४ जून-**

दीप्ती शर्माने घेतलेल्या ५ बळींच्या जोरावर महिला टी-२० विश्वचषकात भारताने पाकिस्तानवर ६४ धावांनी शानदार विजय मिळवला.

एजबॅस्टन येथे १७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा डाव भारताने १७ षटकांत १०६ धावांत गुंडाळला. मुनीबा अलीने सर्वाधिक ४१ धावा केल्या. भारताकडून दीप्ती शर्माने १० धावांत ५ बळी टिपले. श्री चरणीने ३ बळी तर शेफाली वर्माने एक बळी घेतला.

पाकिस्तानला शेवटच्या १८ चेंडूंमध्ये ६५ धावांची गरज होती, परंतु दीप्तीने १७व्या षटकातच सामन्याचा निकाल जवळपास निश्चित केला. दीप्तीने त्या षटकात तीन बळी टिपले. सुरुवातीला, तिने आलिया रियाझला (१८ धावा) डीप मिड-विकेटवर झेलबाद केले. त्यानंतर, तस्मिया रुबाबला जेमिमाह रॉड्रिग्जने झेलबाद केले; तिला खातेही उघडता आले नाही. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर नश्रा संधूही बाद झाली; तिला शॉर्ट मिड-विकेटवर हरमनप्रीत कौरने झेलबाद केले. दीप्तीने आपल्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये केवळ १० धावा देत ५ बळी घेतले.

(या अगोदरचे वृत्त पान ६ वर)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# मस्तीखोर महाशक्ती...

जगाला अमेरिका आणि रशियाच्या लष्करी शक्तीची जाणीव पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात झाली. या दोन्ही महायुद्धांमध्ये तथाकथित लष्करी महाशक्ती असलेल्या जगातील या दोन्ही बलाढ्य देशांच्या तोंडाला जर्मनी आणि जपानने फेस आणला होता. आपले अस्तित्व वाचविण्यासाठी दुसऱ्या महायुद्धात तर शत्रू असलेले अमेरिका-रशिया यांना एकत्र यावे लागले होते. हिटलरने ऐन हिवाळ्यात रशियावर आक्रमण करण्याची चूक केली नसती तर युरोपचा नकाशा वेगळा दिसला असता. अतिपूर्वेकडील आक्रमक जपानला रोखण्यासाठी तर अमेरिकेला अणुबॉम्बचा वापर करावा लागला होता. जर्मनी आणि जपान या दोन्ही देशांनी महाशक्तींना घायकुतीला आणले होते. पहिले महायुद्ध चार वर्षे, तीन महिने तर दुसरे सहा वर्षे सुरू होते. या दोन्ही महायुद्धांमध्ये अपरिमित मनुष्य आणि वित्तहानी झाली. अनेक देशांच्या सीमा बदलल्या. काही छोट्या देशांची निर्मिती करण्यात आली. २० व्या शतकात पहिल्या आणि दुसऱ्या या विनाशकारी महायुद्धांनंतर जगात काही सीमित संघर्ष झाले. २१ व्या शतकातील दीर्घकाळ चालणारे युद्ध म्हणजे रशिया-युक्रेन संघर्ष होय, जो अजूनही संपलेला नाही. रशिया हा युक्रेनपेक्षा भौगोलिकदृष्ट्या तब्बल २८ पट मोठा आहे. नैसर्गिक साधने आणि लष्करी शक्तीचीही तुलना होऊ शकत नाही. एवढे सारे असूनही इवलासा युक्रेन गेली सव्वाचार वर्षे बलाढ्य रशियाशी दोन हात करतो आहे. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेले हे युद्ध अजूनही संपलेले नाही. स्वतःला शक्तिशाली समजणाऱ्या रशियाच्या मर्यादा युक्रेनने उघड्या पाडल्या. केवळ लष्करी शक्तीच्या बळावर आपल्याला हवे ते प्राप्त करण्याच्या मर्यादाही जगाला दिसून आल्या. भौगोलिकदृष्ट्या रशिया आज जगातील सर्वांत मोठा देश असला तरी शेजारी देशांचा भूभाग गिळंकृत करण्याची लालसा कायम आहे. २०१४ मध्ये क्रिमिया गिळंकृत केल्यानंतर पुतिन यांची वक्रदृष्टी युक्रेनवर पडली आहे. याचा फटका बसतो आहे तो सामान्य नागरिकांना. नेमके किती सैनिक आणि नागरिक ठार झाले हे दोन्ही देशांनी अधिकृतपणे जाहीर केले नसले तरी आंतरराष्ट्रीय गुप्तचर संस्था आणि जगभरातील संघर्षांवर लक्ष ठेवणाऱ्या आणि संशोधन करणाऱ्या संस्थांनी दिलेल्या माहितीनुसार रशियाची झालेली मनुष्यहानी प्रचंड आहे. रशियाने या युद्धात आतापर्यंत पावणे तीन लाखांच्या वर सैनिक गमावले आहेत. युक्रेनचेही १ लाख ४० हजारांच्या आसपास सैनिक ठार झाले. ब्रिटनची गुप्तचर संस्था गव्हर्नमेंट कम्युनिकेशन्स हेडक्वार्टर्सने तर या युद्धात आतापर्यंत पाच लाख रशियन सैनिक ठार झाल्याचा दावा केला आहे. आधुनिक युगात केवळ भूभागासाठी लक्षावधी नागरिकांचा मृत्यू होण्याच्या घटनेचे वर्णन केवळ शब्दांनी करता येणार नाही. त्यात इराण-अमेरिका संघर्षाची भर पडली आहे. दुर्दैवाने या सर्व घडामोडींमध्ये संयुक्त राष्ट्र संघ दुर्बल आणि हताश झालेला आहे.

रशिया, इराण आणि अमेरिका या तीन हटवादी देशांनी जगाला वेठीस धरले आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा फटका केवळ बाल्कन आणि युरोपातील काही देशांनाच बसत आहे; पण इराण-अमेरिका संघर्षामुळे अवघे जग होरपळत आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याने युरोप, आफ्रिका खंड आणि आशियातील देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली आहे. या संघर्षाच्या केंद्रस्थानी इराण-अमेरिका-पाकिस्तान हे तिन्ही बेभरवशाचे आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करणारे देश आहेत. एका आठवड्याच्या आत इराण शरण येईल, अशी वल्गना करणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्या तोंडाला आता फेस आला आहे. तीन महिने झाले असले तरी इराण हा देश बलाढ्य अमेरिकेसमोर पाय रोवून उभा आहे. विशेष म्हणजे इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा, अमेरिकेचे डोनाल्ड ट्रम्प आणि संघर्षात मध्यस्थाच्या भूमिकेत असलेले पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर हे सारेच बेभरवशाचे नेते म्हणून पुढे आले आहेत. डोनाल्ड ट्रम्प दररोज विधाने बदलत आहेत. आज होणार, उद्या होणार म्हणून आज शंभर दिवस झाले तरी शांतता करार काही होण्याची चिन्हे नाहीत. ट्रम्प शांतता करार होणार-होणार असे दावे करतात; तर इराण या दाव्याचे खंडन करतो. तर दोन्ही देशांचा शांतता कराराचा मसुदा तयार आहे, लवकरच स्वाक्षरी होईल, असा दावा पाकिस्तान करीत असतो. आज या साऱ्या परिस्थितीचे अवलोकन केले असता अमेरिकेची जगात पुरती नाचक्की झाली आहे हेच खरे. अमेरिकेच्या अजेय लष्करी सामर्थ्याच्या प्रतिमेला तडा गेला आहे. अमेरिकन अध्यक्षाच्या विश्वासार्हतेपुढे प्रश्नचिन्ह लागले आहे. इराणचे भवितव्य मीच ठरविणार, अशा वल्गना करणाऱ्या ट्रम्प यांना इराणने पुरते कोंडीत पकडले आहे. अमेरिकेचे पश्चिम आशियातील लष्करी तळ नेस्तनाबूत झाल्याने अरब देशांना आता तथाकथित बलाढ्य देशावरील भरवसा उरलेला नाही. मोठी आर्थिक किंमत मोजून उभारलेले नागरी विमानतळ, इंधन आणि वायुसाठे, गॅस पाईपलाईन्स आदी पायाभूत सुविधांची नासधूस अरब देशांना डोळ्यादेखत पाहावी लागत आहे. सौदी अरेबिया, कतार, बहरीन, कुवैत हे देश संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून होते. पण, इराणच्या हल्ल्यांपासून अमेरिका आपल्याला वाचवू शकत नाही, याची जाणीव या अरब देशांना झाल्याने आता एक तर ते स्वतःचे सैन्य उभारतील किंवा इस्लामिक लष्करी गटाची निर्मिती करतील. सौदी अरेबियाने संरक्षणाची जबाबदारी पाकिस्तानकडे सोपविणे, हे या दिशेने पडलेले पाऊल आहे. अर्थात अमेरिकेची आतापर्यंतची लष्करी शक्ती म्हणजे झाकली मूठ सव्वा लाखाची होती, असेच म्हणावे लागेल. वर्तमान संघर्षांमुळे रशिया आणि अमेरिकेची पोलखोल झाली असून येणाऱ्या काळात जगातील भू-राजकीय समीकरणे पार बदलणार आहेत. अमेरिकेची दादागिरी आणि दबदबा डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या लहरी वर्तणुकीमुळे संपुष्टात आणला. केवळ विनाशकारी शस्त्रे भात्यात बाळगून युद्ध जिंकता येत नाही, तर ती वापरण्याचे काळीज आणि त्यानंतर होणारे परिणाम भोगण्याची हिंमतही असावी लागते. दोन जागतिक महाशक्तींच्या नांग्या ठेचल्या गेल्याने आता चीनलाही धडा मिळाला आहे. रविवारी किंवा सोमवारी इराणसोबत शांतता करार होईल, अशी घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. करार झाला तरी तो पूर्णपणे अमेरिकेच्या अटी-शर्तींवर होईल, असे होणार नाही. आगीत पोळलेले हात पूर्णपणे भाजू नयेत म्हणून ट्रम्प शांतता करार करण्यासाठी धडपडत आहेत. दुसरीकडे इराणकडे आता गमावण्यासारखे फारसे काही नाही. अमेरिकेची स्थिती जागतिक गुंडासारखी आहे. माजी अध्यक्ष बराक ओबामा यांच्या काळात अमेरिकेला नको असलेला इराणसोबतचा अणुकरार झाला होता. ओबामा यांनी इराणसोबतच्या तणावाचे आणि संबंधाचे चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन केले होते. पण, एककल्ली, लहरी आणि गर्विष्ठ असलेले ट्रम्प यांना इराणला हाताळणे जमले नाही. वारंवार भूमिका बदलून त्यांनी स्वतःला जाळ्यात अडकवून घेतले. त्यांनी जगापुढे स्वतःच्याच देशाच्या लष्करी आणि रणनैतिक मर्यादा उघड्या पाडल्याच; शिवाय, यापुढे जागतिक रचनेत अमेरिकेचे स्थान काय असेल, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित व्हावे अशी स्थिती निर्माण केली. युक्रेनपुढे जसा रशिया उघडा पडला, तीच स्थिती इराणने अमेरिकेची केली आहे. या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी ट्रम्प धडपडत आहेत. त्यांचे परिणाम जगाला भोगावे लागत आहेत. अनेक देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली असून अर्थव्यवस्था डबघाईस आल्या आहेत. गेली साडेचार वर्षे इंधनाचे दर भारतात स्थिर होते. पण, पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने इंधनाचे दर वाढवावे लागले आहेत. सर्वसामान्यांचे जगणे कठीण झाले आहे. पश्चिम आशियातील संघर्ष लवकर संपुष्टात येण्यात जगाचे हित आहे. कधी ना कधी संघर्ष थांबेलच. तो दिवस लवकर यावा आणि महाशक्तींची मस्ती उतरवणारे संघर्ष अशी नोंद इतिहासात व्हावी एवढेच!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# सरन्यायाधीशांचे वादग्रस्त विधान!

''हे शिवा! तू आपला तिसरा डोळा उघडला तरी चालेल, पण जे चूक आहे त्याला मी चूकच म्हणेन.'' तीन दशकांपूर्वी बोफोर्स घोटाळ्याच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या अहवालातील पृष्ठ २३५ वरील हे विधान देशाच्या सरन्यायाधीशांनाही लागू पडावे असे आहे. त्या समितीवर विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला होता. पण, काँग्रेसचा मित्रपक्ष म्हणून अण्णा द्रमुक समितीत सामील झाला. नंतर हा मित्रपक्ष 'शत्रुपक्ष' झाला आणि या पक्षाचे समितीतील सदस्य डॉ. अलादी अरुणा यांनी मुख्य अहवालासोबत आपला वेगळा अहवाल जोडला. त्यात त्यांनी २००० वर्षांपूर्वीचे तामील कवी नरीक्कर यांचा एका कवितेचा दाखला घेत हे विधान केले होते.

**१५ मे ची घटना :** सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत यांनी १५ मे रोजी एका वेगळ्या संदर्भात, झुरळ, परजीवी ही टिप्पणी केली होती. एका वकिलाने सर्वोच्च न्यायालयात आपल्याला 'वरिष्ठ अधिवक्ता' म्हणून मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न चालविले होते. त्याला फटकारताना सरन्यायाधीश म्हणाले होते, ''काही लोक न्यायपालिकेबाबत लांछनास्पद टिप्पणी करीत असतात. यात काही झुरळासारेख युवाही आहेत, परजीवी आहेत, ज्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. त्यांना या वकीलवर्गात काही मानही नसतो. त्यांच्यापैकी काही जण मग मीडिया, सोशल मीडिया चालवू लागतात. काही जण आरटीआय कार्यकर्ते होतात. काही जण अन्य प्रकारचे कार्यकर्ते होतात आणि मग ते सर्वांवर हल्ले चढवू लागतात.'' सरन्यायाधीशांच्या या विधानाचा संदर्भ फक्त मर्यादित होता. त्यांनी काही वकिलांबाबत झुरळ, परजीवी असे भाष्य केले होते. पण, प्रसारमाध्यमांनी नेमका तो भाग उचलला व वाद सुरू झाला.

झुरळाचा वाद सुरू झाल्यावर सरन्यायाधीशांनी लगेच स्पष्टीकरण केले. पण, तोपर्यंत त्यांच्या विधानाचा जो विपर्यास व्हायचा तो होऊन गेला होता.

**बुलेट फॉर बुलेट :** पोलिस दळात 'बुलेट फॉर बुलेट' ही घोषणा की शब्द लोकप्रिय ठरला आहे. याचा जन्म झाला होता पंजाबमध्ये दहशतवाद सुरू असताना. पंजाबचे तत्कालीन महासंचालक जे. एफ. रिबेरो यांच्या तोंडी हे शब्द घालण्यात आले होते. पण, रिबेरो यांनी कधीच 'बुलेट फॉर बुलेट'ची भाषा उच्चारली नव्हती. मग ते शब्द रिबेरो यांच्या तोंडी कसे घालण्यात आले? स्वतः रिबेरो यांनीच एकदा याचा खुलासा केला होता. चंडीगढच्या 'द ट्रिब्युन' या वृत्तपत्रात लिहिलेल्या एका लेखात रिबेरो यांनी लिहिले होते, बुलेट फॉर बुलेट हे स्व. अरुण नेहरू यांचे अपत्य होते. तेव्हा अरुण नेहरू हे अंतर्गत सुरक्षा मंत्री होते. त्यांनी स्वतः नवी दिल्लीच्या हिंदुस्थान टाईम्स या वृत्तपत्राला रिबेरो यांचे नाव घेत ही बातमी पुरविली होती. ती प्रसिद्ध झाल्यावर गदारोळ सुरू झाला. पण, ही बातमी सकारात्मक असल्याने रिबेरो यांना त्याचा फायदाच झाला होता. त्यांनी कधी त्याचे खंडन केले नाही.

**विधान गवई यांचे :** माजी सरन्यायाधीश गवई यांच्या काळातही त्यांच्या एका टिप्पणीने असेच वादळ उठविले होते. खजुराओच्या जावरी मंदिरातील भगवान विष्णूची प्रतिमा क्षतिग्रस्त झालेली आहे. या प्रतिमेच्या दुरुस्तीसाठी एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. यात दखल न देण्याची भूमिका गवई यांनी घेतली. त्यांची भूमिका योग्य होती. कारण कायद्यानुसार सर्वोच्च न्यायालयाला यात काही करता येणार नव्हते. पण, त्यावेळी त्यांनी केलेली मौखिक टिप्पणी वाद निर्माण करून गेली. 'यात सर्वोच्च न्यायालय पडणार नाही. तुम्ही भगवान विष्णूलाच यासंदर्भात काही तरी करण्यास सांगा. तुम्ही स्वतःला भगवान विष्णूचे भक्त समजता. मग तुम्हीच भगवान विष्णूंकडे जा व त्यांना काही तरी करण्यास सांगा' असे गवई बोलून गेले होते. मग यावर वाद सुरू झाला. शेवटी गवई यांनी स्पष्टीकरण देत त्यावर खुलासा केला. पण, ते प्रकरण त्यावरच थांबले. यावेळी मात्र सरन्यायाधीशांनी केलेल्या टिप्पणीतून एका आंदोलनाचा की पक्षाचा जन्म झाला. या पक्षाला दोन कोटींहून अधिक समर्थक मिळाले.

**लंडनमध्ये प्रतिक्रिया :** सरन्यायाधीश न्या. सूर्य कांत लंडनमध्ये एका भाषणासाठी गेले असताना , तेथेही याची प्रतिक्रिया उमटली. हे योग्य झाले नाही. वास्तविक सरन्यायाधीशांचा हेतू युवकांचा- बेरोजगारांचा अपमान वगैरे करण्याचा नव्हता. पण, त्यांच्या विधानाचा तसा अर्थ लावण्यात आला.

**रावत यांचे विधान :** देशाचे पहिले सरसेनापती सीडीएस जनरल बिपीन रावत यांनी नागरिकत्व विधेयकावरून झालेल्या हिंसाचाराबाबत एक वादग्रस्त विधान केले होते. त्याविरोधात काहूर उठल्यानंतर लष्कराच्या मुख्यालयाने त्याबाबत स्षष्टीकरण केले होते. टाईम्स ऑफ इंडियाने 'नो, जनरल' या शीर्षकाने एक संपादकीय लिहीत सरसेनापतींनी राजकीय विधाने करू नयेत असे म्हटले होते.

**शब्द शब्द जपून ठेव :** कुणाला आवडो वा न आवडो सध्याचा काळ हा सोशल मीडियाचा झाला आहे. जगात सोशल मीडियाने धुमाकूळ घातला आहे. दूरचित्रवाणी वाहिन्या वा वृत्तपत्रे एका चौकटीत काम करतात. प्रसिद्ध पत्रकार एम. व्ही. कामत यांनी आपल्या एका पुस्तकात म्हटले आहे, 'एखादा पत्रकार किती आणि काय लिहितो यापेक्षा तो काय लिहीत नाही हेही महत्त्वाचे असते.' राजकीय नेते अनेकदा 'ऑफ द रेकॉर्ड' बोलत असतात. पण, ते सहसा कुणी प्रसिद्ध करीत नाहीत. हा एक अलिखित नियम असतो. पण, सोशल मीडियाला अशी कोणतीही चौकट नाही. कोणताही नियम नाही. त्यातून एक लहानसे विधान, वाक्य वा शब्द व्हायरल होतो आणि मग तो संबधितासाठी तापदायक ठरतो. न्या. गवई यांनी याचा अनुभव घेतला आहे आणि आता न्या. सूर्य कांत याचा अनुभव घेत आहेत. यापुढे न्यायाधीश-सरन्यायाधीशांना मौखिक टिप्पणी करताना अधिकच काळजी घ्यावी लागणार आहे. कारण, त्यांच्याकडून नंतर केल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणाला कोणताही अर्थ राहात नाही. न्यायाधीशांनी केलेल्या मौखिक टिप्पणीचा उल्लेख अनेकदा लेखी निवाड्यात नसतो. मग, मौखिक टिप्पणीचा संदर्भ काय ?

**संवेदनशील पद :** देशाच्या रिझर्व्ह बँकचे गव्हर्नर हे देशाचा परकीय चलनसाठा, व्याजदर, सोन्याचा साठा याचे मुख्य सरंक्षक असतात. त्यांच्या एका विधानाने देशाचा शेअर बाजार खाली वर होण्याची शक्यता असते. तसेच देशाच्या सरन्यायाधीशांचे आहे. ते देशाच्या राज्यघटनेचे, न्यायप्रणालीचे मुख्य सरंक्षक असतात. त्यांच्या एका विधानाने काय गदारोळ होऊ शकतो हे देशासमोर आहे. आता या कॉक्रोच जनता पार्टीचे काय होणार हे तर इतिहासच सांगेल. या साऱ्या प्रकरणाचा धडा म्हणजे यापुढे न्यायाधीशांना कोणतीही टिप्पणी करण्यापूर्वी फार काळजी घ्यावी लागणार आहे. कारण, नंतर केल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणाला अर्थ राहात नाही हे वारंवार सिद्ध झालेले आहे.

**...कोई अर्थ नहीं! :** बिहारचे प्रसिद्ध कवी रामधारीसिंह 'दिनकर' यांच्या एका कवितेत हीच बाब फार मार्मिकपणे सांगण्यात आली आहे. त्यांच्या एका कवितेचे शीर्षक आहे- 'रह जाता कोई अर्थ नहीं' या कवितेतील चार ओळी आहेत..

मन कटूवाणी से आहत हो, भीतर तक छलनी हो जाये,
फिर बाद कहे प्रिय वचनों का, रह जाता कोई अर्थ नहीं
रह जाता कोई अर्थ नही !

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# श्रमाला प्रतिष्ठा द्या शेतमजूर मिळवा!

शेती करणे आज कठीण झाले आहे. याची अनेक कारणे असली तरी महत्त्वाचा मुद्दा शेतमजुरांचा आहे. पैसा देऊनही शेतमजूर मिळत नसल्याने शेतकरी शेती करणेच सोडून देत आहेत. या परिस्थितीत समजा शेतमजुरांना समाजासह शासनाकडून प्रतिष्ठा मिळाल्यास ते पुन्हा शेताकडे वळतील. कारण प्रत्येकाला पैशांसह मानसन्मान हवा असतो. शेतमजुरांना पैसा सोडा प्रतिष्ठाही मिळत नाही. शिवाय अंत्योदय योजनेमार्फत ८० कोटी कुटुंबांना मोफत धान्य मिळत असल्याने त्यांची काम करण्याची इच्छाच संपुष्टात आली आहे. हा प्रकार असाच सुरू राहिल्यास भविष्यात आपली लोकसंख्या २०० कोटी राहील पण शेतमजूर आपल्याला परदेशातून आयात करावे लागतील.

हाताला काम नाही म्हणून खेडे बकाल झाले आहेत. रोजगारासाठी युवक-युवतींचे शहराकडे पलायन सुरू आहे. तर तिकडे शेतात शेतमजूर मिळत नसल्याने शेतकरी रडत आहेत. हा विरोधाभास सुरू राहिल्यास शेती कशी पिकणार, याचा विचार करावाच लागेल. संपूर्ण देशात विकसित भारत रोजगार आणि आजीविका मिशन सुरू आहे. त्याअनुषंगाने एका वर्षात १२५ दिवस रोजगार देण्याची हमी यामाध्यमाने दिली आहे. पण सरकारने हमी दिली, मात्र काम करणारे त्याकरिता तयार नाहीत. आराम हराम आहे. हे शाश्वत सत्य माहीत असूनही ग्रामीण भागात शेतीत रोजगार हाती असतानाही बेरोजगारांची फौज पानटपरीवर टाईमपास करताना दिसते. हा प्रकार चिंताजनक आहे. तेव्हा सरकारने श्रमाला प्रतिष्ठा मिळेल, अशा स्वरूपाची संकल्पना प्रत्यक्षात आणायला हवी. रोजगार हमी योजनेच्या माध्यमाने नाल्या खोदणे, रस्त्याचे बांधकाम करणे सोडून आता त्यांना सरसकट शेतीच्या कामात लावायला हवे. शेतकरी जगला तरच देशातील जनता पोटभर भोजन करेल. अन्यथा लोकांना उपाशी राहावे लागेल. शेतमजूर मिळत नसल्याचे कारण अंत्योदय योजना सांगितले जाते. पण ते एक छोटेसे कारण आहे. त्यापेक्षा मोठे कारण शेतमजुरांना ती प्रतिष्ठाच मिळालेली नाही. सरकारी अधिकारी, डॉक्टर, इंजिनीअर, वकील, तहसील कार्यालयातील साध्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यालाही समाजाने प्रतिष्ठा दिलेली आहे. ती प्रतिष्ठा शेतमजुरांना दिलीच नाही. मजूर म्हणताच १०० पैकी ९९ लोक नाक मुरडून त्यांच्याकडे तुच्छतेने पाहतात. मग कसे वाढणार शेतमजूर, यावर कधीतरी चिंतन केले आहे का? आपण चापलुसी करून श्रेय लाटणाऱ्या शोभाराम सुगंधींना प्रतिष्ठा दिली, पण शरीराने मेहनत करणाऱ्यांना मानसन्मान देणे टाळले. त्यांना तुच्छ वागणूक दिली. आज शेतमजूर न मिळण्याचे तेच कारण आहे. क्रिकेटमध्ये पैसा आणि प्रतिष्ठा आहे. म्हणूनच कोट्यवधी मुले-मुली जीवाचे रान करतात. डॉक्टर, इंजिनीअर होणे प्रतिष्ठेसह पैसा कमावण्याचे माध्यम आहे. म्हणूनच त्याकरिता जीवाचा आटापिटा केला जातो. तशी मेहनत शेतमजूर बनण्यासाठी का नाही? कारण त्यात पैसा, प्रतिष्ठा आणि सुरक्षाही नाही. शेतमजूर होणे कुठल्याही येड्याचे काम नाही. त्यातही कसब लागतात. त्यातही शारीरिक व मानसिक शक्तीची कसोटी लागते. त्यात ऊन, वारा, पाऊस झेलण्याची ताकद हवी असते. वीज कडाडत असताना शेतात राबावे लागते. साप, विंचू, वन्यप्राण्यांची भीती झुगारून देशवासीयांसाठी घाम गाळावा लागतो. जेव्हा शेतमजूर घाम गाळतो तेव्हाच धान्यरूपी सोनं पिकते. म्हणूनच आता समाजाने त्यांना लोकाश्रय द्यावा अन् सरकारने राजाश्रय देत शेतमजूर म्हणवून घेणे गौरवपूर्ण ठरेल. श्रमाला प्रतिष्ठा मिळाली तरच शेतमजुरांची फौज वाढेल. गावखेड्यात पूर्वी गुराखी राहायचे. ते आता नामशेष झाले. परिणामी गाईंची कत्तलखान्याकडे वाटचाल वाढली. शेतीपूरक व्यवसाय संपुष्टात आला. शेणखत मिळणेही कठीण झाले. समजा गुराख्यांना श्रमप्रतिष्ठा समाजाने दिली असती तर लाखों गाईंचे प्राण वाचले असते. भरपूर दूध मिळत राहिल्याने भेसळ करण्याची गरज भासली नसती. पण समाजच चुकला अन् सर्व जण गोत्यात आले. या चक्रव्यूहातून बाहेर पडायचे असेल तर श्रमाला प्रतिष्ठेसह प्रतिष्ठा द्यावी लागेल. अर्थात 'तुमचा पैसा आमचे श्रम । तुमची बुद्धी आमुचा उद्यम। एकाचा घोडा एकाचा सरंजाम। असावा जैसा ।। मुळीं जीवनाची तैसीच रचना । एकास हात लागती नाना। सर्वां मिळोनीच हा आपुल्या स्थानां । बनतो सन्मान घ्यावया ।।' हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचारच तारतील.



९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# तेल संकटाला भारतीय उत्तर

जगाच्या अर्थकारणावर आणि राजकारणावर सर्वाधिक प्रभाव टाकणाऱ्या घटकांपैकी एक म्हणजे खनिज तेल. जगातील बहुतांश देशांची वाहतूक व्यवस्था, उद्योग, वीज निर्मिती आणि संरक्षण व्यवस्था आजही मोठ्या प्रमाणात तेलावर अवलंबून आहे. त्यामुळे इराण-अमेरिका युद्धाने निर्माण झालेल्या पुरवठा साखळीतील अडथळ्यांचा थेट परिणाम तेलाच्या किमतींवर होतो आणि त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल आयातदार देश असल्यामुळे अशा संकटांचा फटका आपल्यालाही बसतो. या पृष्ठभूमीवर भारतासाठी 'ऊर्जा स्वावलंबन' हा केवळ आर्थिक विषय नसून राष्ट्रीय सुरक्षेचा आणि विकासाचा विषय आहे.

भारताला निसर्गाने सूर्यप्रकाशाचे अमूल्य वरदान दिले आहे. वर्षातील बहुतांश दिवस देशाच्या विविध भागांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. त्यामुळे सौर ऊर्जा हे भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाचे सर्वांत प्रभावी साधन ठरू शकते. आज मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले जात असले तरी त्याची व्याप्ती आणखी वाढविण्याची गरज आहे. घरांच्या छतांवर सौर उपकरण, औद्योगिक क्षेत्रांमध्ये सौर ऊर्जा वापर, शासकीय इमारतींवरील सौर प्रकल्प आणि ग्रामीण भागातील सौर पंप या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होऊ शकते. भारतात लाखो हेक्टर जमीन पडीत अवस्थेत आहे. काही ठिकाणी सिंचनाच्या अभावामुळे तर काही ठिकाणी जमिनीची उत्पादकता कमी असल्यामुळे शेती करणे अवघड जाते. अशा जमिनींवर मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्प उभारता येऊ शकतात. यामुळे शेतकऱ्यांना जमीन भाड्याने देऊन नियमित उत्पन्न मिळू शकते. आज महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, हरयाणा, गुजरात या राज्यांमध्ये शेतकरी त्यांच्या जमिनीवर सौर प्रकल्प उभारून व त्यात निर्माण झालेल्या विजेला वीज वितरण कंपनीला विकून अधिक उत्पन्न मिळवत आहेत. पीएम कुसुम या योजनेअंतर्गत शेतीमध्ये सिंचन व्यवस्था उभी करण्यासाठी डिझेल पंपांच्या ऐवजी सौर ऊर्जेवर चालणारे पंप बसविणे व याचबरोबर विजेवर चालणाऱ्या पंपांना सौर ऊर्जेशी जोडण्याचे काम सुद्धा अनेक ठिकाणी झालेले आहे. सूर्य ऊर्जा आणि उत्पन्न दोन्हीही देत आहे.



ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे जैवइंधनाचा वापर. भारतामध्ये ऊस, मका, ज्वारी, बाजरी तसेच विविध तेलबिया पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. यापासून इथेनॉल आणि बायोडिझेलसारखी जैवइंधने तयार करता येतात. विशेष म्हणजे जैवइंधनासाठी लागणारी सर्व पिके सुपीक जमिनीवरच घ्यावी लागतात असे नाही. करंज, मोह, रतनजोत यांसारखी झाडे कोरडवाहू आणि कमी सुपीक जमिनीवरही वाढू शकतात. या वनस्पतींपासून बायोडिझेल तयार करता येते. विदेशातून तेल खरेदी करण्यासाठी खर्च होणारे परकीय चलन वाचविणे हे अत्यंत आवश्यक आणि काळाची गरज होऊन बसलेले आहे. जैवइंधनाचे पेट्रोल आणि डिझेलसारख्या पारंपरिक इंधनामध्ये मिश्रण मिश्रण केल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी ऑटोमोबाईल कंपन्या, तेल कंपन्या ,भारतीय तंत्रज्ञान संस्था व आचार्य पदवी मिळविण्यासाठी शोध करणारे विद्यार्थी या सर्वांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे.

जैवइंधनामुळे दोन महत्त्वाचे फायदे होतात. पहिला म्हणजे पेट्रोल आणि डिझेलवरील आयातीचे अवलंबित्व कमी होते. दुसरा म्हणजे शेतकऱ्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत उपलब्ध होतो. आज अनेक भागांमध्ये पडीत पडलेल्या जमिनींचा उपयोग जैवइंधनासाठी होणाऱ्या पिकांच्या लागवडीसाठी केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळू शकते. देशातील साखर कारखाने आणि इथेनॉल निर्मिती उद्योग यांच्यामध्ये सुसंगत धोरण तयार केल्यास शेतकऱ्यांची समृद्धी आणि देशाचे ऊर्जा स्वावलंबन हे दोन्ही उद्दिष्ट साध्य होऊ शकतात.

आज वाहतूक क्षेत्रातही मोठे परिवर्तन घडत आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत आहे. पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमुळे इंधन आयात वाढते तसेच प्रदूषणही होते. त्याउलट इलेक्ट्रिक वाहने देशात निर्माण होणाऱ्या विजेवर चालू शकतात. जर ही वीज सौर किंवा पवन ऊर्जेतून निर्माण केली गेली तर इंधन खर्च आणि प्रदूषण दोन्ही कमी होईल. भारतात इलेक्ट्रिक दुचाकी, तीनचाकी आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यांचा विस्तार केल्यास इंधन आयातीत मोठी बचत होऊ शकते. इलेक्ट्रिक किंवा साधी सायकल ही सुद्धा इंधनाची बचत करू शकते व आरोग्य सुद्धा सुधारू शकते. अनेक मोठमोठ्या कंपन्यांमध्ये व सरकारी कार्यालयांमध्ये सुद्धा त्यांचा परिसर खूप मोठा असल्यामुळे परिसरात फिरण्यासाठी सायकलचा वापर केल्यास हरित जीवन पद्धतीचा अवलंब सुद्धा होऊ शकतो.

ऊर्जा क्षेत्रातील आणखी एक क्रांतिकारी संकल्पना म्हणजे हरित हायड्रोजन. हायड्रोजन हे अत्यंत स्वच्छ इंधन मानले जाते. त्याच्या वापरामुळे कार्बन डायऑक्साईडऐवजी मुख्यतः पाण्याची वाफ निर्माण होते. हरित हायड्रोजन तयार करण्यासाठी पाण्याचे विद्युत अपघटन केले जाते. या प्रक्रियेसाठी आवश्यक वीज जर सौर किंवा पवन ऊर्जेतून मिळाली तर तयार होणारा हायड्रोजन पूर्णपणे पर्यावरणपूरक ठरतो.

भारतामध्ये हरित हायड्रोजन निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये भरपूर सूर्यप्रकाश आणि वाऱ्याची उपलब्धता आहे. येथे मोठ्या प्रमाणात सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प उभारून त्याद्वारे हरित हायड्रोजनचे उत्पादन करता येऊ शकते. भविष्यात हे इंधन ट्रक, बस, रेल्वे, जहाजे तसेच पोलाद, रसायन आणि खत उद्योगांमध्ये वापरले जाऊ शकते. ऊर्जा स्वावलंबनाचा मार्ग केवळ सरकारच्या धोरणांमधूनच तयार होणार नाही. त्यासाठी उद्योग, शेतकरी, संशोधन संस्था आणि सामान्य नागरिक यांचेही योगदान आवश्यक आहे. आज भारतासमोर एक ऐतिहासिक संधी उभी आहे. सूर्यप्रकाश, विशाल भूभाग, कृषी संसाधने आणि युवा मनुष्यबळ या सर्वांचा योग्य वापर केल्यास भारत ऊर्जा आयात करणारा देश न राहता ऊर्जा क्षेत्रातील महासत्ता बनू शकतो. ऊर्जा स्वावलंबन हा केवळ विकासाचा मार्ग नाही, तर तो आर्थिक स्थैर्य, पर्यावरण संरक्षण, शेतकरी समृद्धी आणि राष्ट्रीय सुरक्षेची हमी देणारा मार्ग आहे. सरकार त्या दिशेने जात आहे.

९५५२५३५८१३ (लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### नाग नदीतील सांडपाण्यामुळे गोसीखुर्द प्रदूषित

वरील मथळ्याची बातमी १२ जून २०२६ च्या तरुण भारतात वाचण्यात आली. भंडारा जिल्ह्याच्या पवनी तहसीलमध्ये वैनगंगा नदीवर गोसीखुर्द धरण बांधण्यात आले आहे. या धरणाच्या पाणीसाठ्यात नाग नदीतील सांडपाणी मिसळून या धरणाचा पाणीसाठा प्रदूषित होत आहे. कारण नाग नदी कन्हान नदीला मिळते व कन्हान नदी वैनगंगा नदीला मिळते. गोसीखुर्द हा विदर्भातील एक मोठा सिंचन प्रकल्प असून तो पूर्णत्वास आला आहे. गोसीखुर्द प्रकल्पाची सुधारित अंदाजे किंमत १८००० कोटी रुपये झाली आहे. अशा परिस्थितीत नाग नदीतील सांडपाणी शुद्धीकरणाचा अपेक्षित खर्च अत्यल्प आहे. सबब नाग नदीतील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे, तसेच गोसीखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यातील जलपर्णी काढणे आवश्यक आहे, जेणेकरून गोसीखुर्द धरणाचा पाणीसाठा शुद्ध होऊन पर्यावरण व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चांगले होईल. या प्रकरणी उच्च न्यायालयाने दखल घेतली असल्याने नाग नदी शुद्धीकरणाचे काम तातडीने पूर्ण व्हावे. असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

* * *

### 'मृत्यूच्या पार्ट्या' थांबणार कधी ?

वरळी येथील एका भव्य म्युझिक कॉन्सर्टमध्ये एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना पुन्हा एकदा समाजाला अस्वस्थ करून गेली. यापूर्वी गोव्यातील 'सनबर्न फेस्टिव्हल'मध्ये असे दुर्दैवी प्रसंग घडले आहेत. संगीत, मनोरंजन आणि आधुनिकतेच्या नावाखाली आयोजित होणारे असे कार्यक्रम अनेकदा तरुणांना चुकीच्या मार्गाकडे घेऊन जाणारे ठरतात. काही तासांच्या क्षणिक आनंदासाठी स्वतःचे आरोग्य, भविष्य आणि कधीकधी जीवनही पणाला लावले जात असल्याचे त्यांच्या लक्षातही येत नाही. युवकांचे जीवन सुरक्षित ठेवणे आणि त्यांना व्यसनांच्या गर्तेत जाण्यापासून रोखणे ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाज आणि प्रशासनाचीही सामूहिक जबाबदारी आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या संस्कारभूमीत तरुण पिढीला व्यसनांच्या अंधाराकडे ढकलणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे आवश्यक आहे. अन्यथा अशा घटनांमुळे अनेक कुटुंबांची स्वप्ने उद्ध्वस्त होत राहतील. मनोरंजनाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे असले, तरी ते समाजहित आणि तरुणांच्या सुरक्षिततेच्या किमतीवर असू नये, हीच या घटनेतून मिळणारी सर्वांत मोठी शिकवण आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

* * *

### जयशंकर यांची स्पष्टोक्ती

'आम्ही कधीच युरोपसाठी धोका ठरलो नाही : जयशंकर' ही बातमी वाचली. एका हिंदी चित्रपटात एक संवाद आहे. त्यातील नायक म्हणतो, 'भगवान की बनायी हुई यह दुनिया एक ऐसा बाजार है जहाँ इन्सान के कर्मों का हिसाब उसे इसी जनम में चुकता करना पडता है!' हा संवाद आठवण्याचे कारण म्हणजे युरोपातील बहुतेक सर्वच देश इस्लामी दहशतवादाच्या जाळ्यात अडकले आहेत. मात्र सुंभ जळला तरीही पीळ जळला नाही म्हणतात त्याप्रमाणे भारतात दहशतवाद पसरवणार्या देशांना आजही ते शस्त्रास्त्रे पुरवत आहेत.

ज्या इंग्लंडने भारतावर दीडशे वर्षे राज्य केले ते त्यांच्या फोडा आणि झोडा तत्त्वाने, तोच देश आज इस्लामी दहशतवादात पोळतो आहे! आज त्यांना अहिंसेचे आणि मानवतावादाचे स्मरण झाले आहे. मानवतावादाची शिकवण युरोपीय देशांकडून शिकण्याची वेळ भारतावर अजून आलेली नाही असेही या चर्चेदरम्यान परराष्ट्र मंत्र्यांनी सुनावले आहे. भारत हा वसुधैव कुटुंबकम् अर्थात हे विश्वचि माझे घर, माझे कुटुंब, या तत्त्वावर वाटचाल करत आहे. आधी शेकडो वर्षे मुघलांचे, नंतर दीडशे वर्षे ब्रिटिशांचे अनन्वित अत्याचार सहन करूनही आणि स्वातंत्र्यापासून आजतागायत दहशतवादाचे हजारो बळी जाऊनही भारताने शांततेची कास सोडली नाही. मात्र काँग्रेसच्या कारकीर्दीत कधीही नव्हते असे राष्ट्र सर्वोपरी हे धोरण २०१४ पासून मोदी सरकार कर्तव्यकठोरपणे पाळत आहे. रशियाकडून तेल घ्यायच्या मुद्यावरही परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेत जाऊन ट्रम्प सरकारला सुनावले होते. तेल विकणारा रशिया, पैसे देऊन तेल घेणारा भारत, मग अमेरिका कोण, अमेरिकेचा काय संबंध? असा प्रश्न त्यांनी रोखठोकपणे विचारला होता. आजतागायत काँग्रेसच्या कोणत्याही पंतप्रधानांनी किंवा मंत्र्यांनी एवढे धाडस दाखवल्याचे ऐकिवात किंवा वाचनात आले नाही. काही महिन्यांपूर्वी एका भारतीय वृत्तवाहिनीवर काही पाकिस्तानी नेते आणि पत्रकार चर्चेसाठी आले होते. तेव्हा निवेदकाने त्यांना एक प्रश्न विचारला होता. तो असा, पाकिस्तानमधील परिस्थिती सुधारण्यासाठी तुम्ही काय करणार? तेव्हा बहुतेक सर्व पाकिस्तानी नेते आणि पत्रकारांनी सांगितले की, आम्हाला पाच वर्षांसाठी पाकिस्तान सरकार चालवायला, भारतातील फक्त दोनच लोकांची आवश्यकता आहे. एक म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरे म्हणजे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर! तसे झाले तर, पाकिस्तान दहशतवादमुक्त होईल, पाकिस्तानी सुतासारखे सरळ होतील.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८



# सांगोला पोलिसांचा अवैध वाळू उपसा करणाऱ्यांना दणका

## सुमारे सव्वा कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त; ६ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ जून-**

सांगोला पोलिस ठाण्याच्या पथकाने जवळा (ता.सांगोला) येथील पांढरे वस्ती परिसरातील कोरडा नदीपात्रातून बेकायदेशीररित्या वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली आहे. तब्बल १ कोटी २१ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत ६ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांनी पत्रकार परिषदेमध्ये ही माहिती दिली. शनिवार दि.१३ जून रोजी रात्री सांगोला पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत प्राप्त माहितीनूसार जवळा येथील पांढरे वस्ती परिसरातील कोरडा नदीपात्रात पहाटे सव्वा दोनच्या दरम्यान पोलिस पथक पोहोचले. तेव्हा त्यांना कोरडा नदीपात्रात यंत्रसामग्रीचा आवाज येत असल्याचे निदर्शनास आले. पथकाने परिसरात पाहणी केली असता ३ जेसीबीने वाळूचा उपसा करून दोन ट्रॅक्टर-ट्रॉली व एका टिपरमध्ये वाळू भरली जात असल्याचे दिसले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून संबंधित वाहन चालकांना ताब्यात घेतले.

> **जप्त केलेला मुद्देमाल**
>
> जेसीबी क्र.एमएच.१२.इबी.१०८३, जेसीबी क्र.एमएच.१०.बीजी.९१९२, विना नंबर १ असे ३ जेसीबी, विना नंबर ट्रॅक्टर-ट्रॉली २ व विना नंबर टिपर १ तसेच ६ ब्रास वाळु असा एकूण १ कोटी २१ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कारवाईदरम्यान वाहनचालकांकडे वाळू उपसा अथवा वाहतुकीसाठी आवश्यक असलेले कोणतेही वैध परवाने, रॉयल्टी पास अथवा शासनाची परवानगी नसल्याचे निष्पन्न झाले.

कारवाईमध्ये निखील महादेव नायकुडे (वय-२५), रा.भोपसेवाडी, ता.सांगोला, रामचंद्र अर्जुन आगलावे (वय-४२), स्वप्निल दत्तात्रय तोडकर (वय-२५), दोघे रा.आगलावेवाडी, ता.सांगोला, रोहन महादेव देवकते (वय-२५), रा.वाकी घेरडी, ता.सांगोला, शेखर युवराज लवटे (वय-२१), रा.आलेगाव, ता.सांगोला, तसेच अंधाराचा फायदा घेऊन घटनास्थळावरून पसार झालेला समाधान महादेव हजारे, रा.पांढरे वस्ती,जवळा, ता.सांगोला यांना ताब्यात घेतले आहे.

सदरची कामगिरी जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधिक्षक विजय कबाडे, मंगळवेढा उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुजे यांचे मार्गदर्शनाखाली सांगोला पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांचे आदेशान्वये पो.उपनि. गुरव, पो.उपनि.सागर पाटील, पोहेकॉ.अस्लम काझी, पोहेकॉ.नवनाथ सावंत, पोकॉ.सद्दाम नदाफ, पोकॉ.मच्छिंद्र माळी, पोकॉ.मारुती पांढरे, पोकॉ.सोमनाथ भुई यांनी केली. तपास पोहेकॉ.राजगे हे करीत आहेत.

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

### 'स्वाद चषक' खुली व महिला जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जून-**

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने चॅम्प चेस स्कूल व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने खुली व महिला गटाच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली.

टाकळीकर मंगल कार्यालय येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत शहरासह जिल्ह्यातील २६ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह ९१ खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

मुलांच्या गटात अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू मानस गायकवाड, शंकर साळुंके, श्रेयस कुदळे, आदिराज म्हेत्रे, युवराज गायकवाड, चंद्रशेखर बसरगीकर, ओंकार कर्वेकर, प्रज्वल कोरे, आयुष जानगवळी, श्रेयांश इंगळे, हिमांशू व्हनगावाडे, श्लोक चौधरी, देवदत्त पटवर्धन, नैतिक होटकर, नागेश राजमाने व सानिध्य जमादार यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत शानदार विजय मिळविला.

मुलींच्या गटात बार्शीची राष्ट्रीय खेळाडू सानवी गोरे, पृथा ठोंबरे तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त स्वराली हातवळणे, अनन्या उलभगत, मनस्वी क्षिरसागर व संस्कृती जाधव यांनी देखील आकर्षक खेळाचे प्रदर्शन करत विजयी सुरुवात केली.

तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन भारतीय जीवन विमाचे अधिकारी योगेश धर्माधिकारी व बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्मिक विभाग प्रमुख निलेश पाटील यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने तसेच नामवंत उद्योजक गणेश सावंत, नामवंत उद्योजक सादिक नदाफ, आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, टाकळीकर उद्योग समूहाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये यांची प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा राठी, पद्मजा घोडके आदी काम पाहत आहेत.

स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या चार मुले व चार मुलींची निवड आगामी राज्यस्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. स्पर्धा अत्यंत चुरशीच्या वातावरणात पार पडत असून उपस्थितांना अनेक प्रेक्षणीय लढती पाहण्याची संधी मिळत आहे.

विशेष म्हणजे सात वर्षीय उदयोन्मुख खेळाडूंनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १४ जून-**

राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत.

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल ॲपद्वारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

स्मार्ट मीटरच्या ॲपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो. ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल ॲपद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

# प्रतापसिंह मोहिते-पाटील विकास सोसायटीची १०० टक्के कर्ज वसुली

## बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ जून -**

उदयनगर चौंडेश्वर वाडी (ता.माळशिरस) येथील प्रतापसिंह मोहिते पाटील विकास सोसायटीने १० जून २०२६ रोजी १०० टक्के कर्ज वसुलीचा मानाचा टप्पा गाठला आहे.

संस्थेची सभासद संख्या ४०३ असून भागभांडवल रुपये १८ लाख ७१ हजार १११ इतके आहे. संस्थेमार्फत एकूण रुपये २ कोटी ९० लाखांचे कर्जवाटप केले होते. कर्जदारांनी वेळेत कर्जफेड केल्याने संस्था शंभर टक्के वसुलीपात्र ठरली.

या यशामध्ये मोलाचे सहकार्य केल्याबद्दल सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचे बँक इन्स्पेक्टर रामचंद्र पवार, शाखाधिकारी विजय कचरे, ज्युनियर ऑफिसर वैजिनाथ पवार, कॅशियर मोहिनी खुडे, लिपिक अश्विनी मोरे, प्रियंका चव्हाण तसेच शिपाई सुदाम सावंत व महेंद्र गायकवाड यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे चेअरमन शिवाजी इंगवले-देशमुख, व्हाईस चेअरमन विठ्ठलराव चव्हाण, तज्ज्ञ संचालक समाधान इंगवले-देशमुख, हरिचंद्र किर्दकर, सदाशिव रिसवडकर, खंडाळीचे गटनेते अमर रिसवडकर, क्लार्क अविनाश साठे, भारत साठे आदी मान्यवर उपस्थित होते. भाऊसाहेब बाबर, भाऊसाहेब काटकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करून सभासदांच्या आर्थिक शिस्तीबद्दल अभिनंदन केले.

# आश्रमशाळांमधील शिक्षकांचे समायोजन पारदर्शक

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहसंचालक गणेश सोनटक्के यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून**

सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच आश्रम शाळांच्या समायोजनाची प्रक्रिया अत्यंत पारदर्शक पद्धतीने अतिरिक्त शिक्षकांना विश्वासात घेवून पार पाडली गेली. परिणामी शिक्षकांत आनंदाचे वातावरण असल्याचे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक गणेश सोनटक्के यांनी दिली.

संच मान्यतेनुसार ज्या आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरले आहेत. अशा आश्रमशाळांना शाळा/संस्थास्तरावरुन सर्व कर्मचाऱ्यांचे लेखी आक्षेप विचारात घेऊन बिंदुनामावली पडताळणी नोंदवहीनुसार, सेवाजेष्ठतेनुसार, माध्यमिक विभागामधील विषय शिक्षक उपलब्धता विचारात घेऊन अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बिंदुनामावली, सेवाजेष्ठता इत्यादी तपासून नियमानुसार अतिरिक्त ठरविण्याची कार्यवाही केली. त्याबाबत संस्था, शाळा स्तरावरुन अतिरिक्त घोषित केलेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांची नावे जिल्हा कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हास्तरावर शाळा/संस्था स्तरावरुन प्राप्त माहितीचे संकलन करुन अतिरिक्त होणाऱ्या सुमारे २०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्राथमिक स्वरुपातील यादी प्रकाशित करुन अतिरिक्त कर्मचाऱ्यांना या यादीच्या अनुषंगाने त्यांचे आक्षेप नोंदविण्याबाबत लेखी कळविण्याबाबत जिल्हा कार्यालयाने सर्व मुख्याध्यापकांना निर्देश दिले आहेत. जिल्हा कार्यालयास प्राप्त अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाच्या प्राप्त लेखी आक्षेपांवर दि. ०१ जुन रोजी एकत्रित सुनावणी सर्वांसमक्ष आयोजित केली.

पारदर्शक पध्दतीने सुनावणी करुन नियमानुसार सर्व निर्णय दिले. त्यानुसार जिल्हास्तरीय अतिरिक्त कर्मचाऱ्यांची पदनिहाय, प्राथमिक, माध्यमिक, अल्पसंख्याक, मान्यता रद्द आश्रम शाळा येथील अतिरिक्त कर्मचाऱ्यांची जेष्ठता यादी जिल्हा कार्यालयाकडून ८ जून रोजी प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार १० रोजी सर्व अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे जिल्हास्तरीय समायोजन समुपदेशनाने जिल्ह्यातील उपलब्ध रिक्त जागेच्या प्रमाणात जेष्ठतेनुसार तसेच माध्यमिक विभागातील विषय शिक्षकांच्या प्राप्त झालेल्या संबंधित आश्रम शाळांकडील मागणीनुसार समायोजनाची प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने समुपदेशनाने सर्वांसमक्ष पार पाडण्यात आली. याबाबत स्वराज्य शिक्षक संघटना व शिक्षक भारती संघटना, संस्थापक यांनी सहायक संचालक गणेश सोनटक्के यांचे आभार मानले.



# लक्ष्मी टाकळीत अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई; १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर, दि. १४ जून-**

तालुक्यातील लक्ष्मी टाकळी पंढरपूर येथे अवैध दारू विक्रेत्यावर पोलिसांनी केलेल्या कारवाईत १६ हजार रुपयांचा मुद्देमाल केला जप्त आहे. लक्ष्मी टाकळी गावातील हॉटेल शाही दरबारच्या बाजुला एका पत्राशेडच्या बाजुस एक इसम अवैधपणे देशी-विदेशी दारूची विक्री करत असल्याची गोपनीय बातमी मिळाल्याने उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी सहकाऱ्यांना सूचना दिली. कारवाई दरम्यान श्रीराम नगरकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावरील पत्राशेडचे बाजुला पोलिस पथकाला एक इसम पांढऱ्या रंगाची पिशवी घेवून थांबलेला दिसला. पोलिसांनी त्याचा संशय आल्याने पकडले. यावेळी त्याने त्याचे नाव शरद बाळासाहेब रणदिवे (रा. क्रांतीवीर लहुजी वस्तादनगर, टाकळी रस्ता, पंढरपूर ) असे असल्याचे सांगितले.

दरम्यान पोलिसांनी त्याच्याजवळील पिशवी तपासून पाहता त्यामध्ये १६ हजार ३० रुपयांचा देशी-विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. शरद रणदिवे हा अवैधरित्या त्याची विक्री करत असताना मिळून आला. पोहेकॉ ताजुद्दीन मुजावर यांनी पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ही कारवाई सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ मुजावर, पोना गायकवाड, पोकॉ लोंढे, पोकॉ हुलजंती यांनी केली.


# District Collector, Solapur and Returning Officer,

Vardayini Multi-State Cooperative Credit Society Ltd.,
Bhandule Chowk, Pandharpur, Dist. Solapur.

**NOTICE OF ELECTION**

(ONLY FOR MEMBERS)
(As per Multi-State Co-operative Societies Act, 2002 (Amendment 2023) and MSCS Rules 2002 (Amendment 2023))

Notice is hereby given that, as per Cooperative Election Authority, New Delhi, Order No. CEA-12011/455/2026 Dated 15th May, 2026, **Election is to be held for Board of Directors and Office Bearers of "Vardayini Multi State Cooperative Credit Society Ltd., Pandharpur, Dist. Solapur"**

* The number and type of "Board of Directors" to be elected : 15 (General - 12, SC/ST- 01, Women – 02)
* The number and type of "Office Bearers" to be elected : 02 (Chairman - 01 and Vice- Chairman- 01)
* Office address of Returning Officer (RO) : Office of the District Collector, Solapur, New Collector Office, Sat Rasta, Vijapur Road, Solapur-413003.

**Election Schedule**

**Election programme for "Board of Directors"**

| SL. No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| I | Publication of Provisional List of Members & Delegates, Eligible to Vote | 22nd June, 2026 (Monday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 2 | Time Window for Raising Objection to the Provisional List | 23rd June, 2026 to 29th June, 2026 (Tuesday to Monday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 3 | Scrutiny of objection received to the Provisional List (if any) | 30th June, 2026 to 03rd July, 2026 (Tuesday to Friday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 4 | Publication of Final List of Members & Delegates, Eligible to Vote | 03rd July, 2026 (Friday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 5 | Issue and Filing of Nomination Form | 13th July, 2026 to 15th July, 2026 (Monday to Wednesday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 6 | Publication of List of Nominations Received | 15th July, 2026 (Wednesday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 7 | Scrutiny of Received Nomination Forms | 16th July, 2026 (Thursday) | 11:00 AM onwards | RO Office. |
| 8 | Publication of List of Valid Nominations | 16th July, 2026 (Thursday) | Immediately after scrutiny | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 9 | Withdrawal of Nominations | 17th July, 2026 (Friday) | 11:00 AM to 3:00 PM | RO Office. |
| 10 | Publication of Final List of Contesting Candidates | 17th July, 2026 (Friday) | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 11 | Date of Polling, if Necessary | 26th July, 2026 (Sunday ) | 8:00 AM to 04:00 PM | Place will be Announced later. |
| | | and all those who have entered polling station at 04:00 PM or before, should be allowed to cast vote | | |
| 12 | Counting of vote | 28th July, 2026 (Tuesday ) | 8:00 AM Onwards | Place will be Announced later. |
| 13 | Declaration of Result of "Board of Directors" | On or before 04th August, 2026 (Tuesday) After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19M | | |

**Election programme for "Office Bearer"**

| SL. No. | Particulars | Date | Time | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Announcement of Election Schedule | 04th August, 2026 (Tuesday) | After Declaration of Result of Board of Directors Election | |
| | 1. Time window for filing nomination | | 09:30 AM to 11:30 AM | RO Office. |
| | 2. Scrutiny of nomination papers | | 12:30 PM to 02:00 PM | |
| | 3. Time and date for withdrawal | | 2:00 PM to 04:00 PM | |
| | 4. Display of list of the contesting candidate and schedule of election | | By Evening | Office of the RO Society Head office and It's all Branch Offices, Society Website. |
| 2 | Meeting of Newly Constituted Board and Publication of Valid Nominations, Polling (if required) | 05th August, 2026 (Wednesday) | 11:00 AM Onwards | Place will be Announced later. |
| 3 | Declaration of Result of Election of Office Bearers | On or before 12th August, 2026 (Wednesday) After approval of Cooperative Election Authority, New Delhi on Format 19N | | |

1. MSCS Rule 19(1) and the relevant clauses of the Bye-laws of the Vardayini Multi-State Cooperative Credit Society Ltd., state that only members registered in the final voter list shall be eligible to vote in the said election.
2. The Provisional List of members will be available for inspection at the RO/ARO office, the registered office of the Vardayini Multi-State Cooperative Credit Society Ltd., all of its branch offices, and the Society's website.
3. A copy of the final voters list will be supplied to any member or delegate upon payment of the fee specified by the society's Board of Directors.
4. It is mandatory for the candidate, proposer, and seconder to be members of the Vardayini Multi-State Cooperative Credit Society Ltd., and their names must be included in the final voter list.
5. It is mandatory for the candidate, or a person authorized by them, or their nominee, to file a nomination form in the prescribed format—'Form III' for the Board of Directors and 'Form V' for Office Bearers—with the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time limit.
6. To be eligible to contest elections for the Board of Directors and as an Office Bearer, a candidate must fulfill the criteria under Sections 29, 43, and 44 of the Multi-State Cooperative Societies Act, Rules 19J, 19K, and 19L of the MSCS Rules, and the bye-laws of the SPG Multi-State Cooperative Credit Society Ltd.
7. An election deposit of Rs. 2,000/- (Rs. 500/- for Scheduled Castes and Scheduled Tribes candidates) is mandatory, and the receipt for this deposit must be attached to the nomination paper.
8. A candidate filing a nomination form under a reserved category (SC/ST/NT/OBC) must attach a self-attested copy of their caste certificate to the nomination form.
9. A candidate, their nominee, or their authorized representative (authorized in writing by the candidate) may give a written notice of withdrawal of candidature to the Returning Officer or Assistant Returning Officer within the prescribed time.
10. All contesting candidates must submit the details of their election expenses to the RO/ARO as per the provisions of MSCS Rules 19(U), (V), (W), and (X), and strictly adhere to the code of conduct.

**Place : Solapur**
**Date : 15 June, 2026**

**Sd/-**
**Karthikeyan S. IAS**
**Returning Officer**
**Vardayini Multi-State Cooperative Credit Society Ltd.**
**And District Collector, Solapur.**



## महत्त्वाचे

### स्कॉटलंडचा हैतीवर एका गोलने रोमहर्षक विजय



**बॉस्टन :** पिफा फुचबॉल विश्वचषकात येथील जिलेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सी गटाच्या साखळी सामन्यात स्कॉटलंडने हैतीवर अवघ्या १-० गोलने रोमहर्षक विजय नोंदविला. जॉन मॅकगिन स्कॉटलंडच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने २८ व्या मिनिटाला केलेला गोल स्कॉटलंडसाठी निर्णायक ठरला.

# ब्राझीलची मोरोक्कोविरुद्ध लढत बरोबरीत

## विनिअस ज्युनियरचा महत्त्वपूर्ण गोल

**ईस्ट रदरफोर्ड, १४ जून**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतील चुरशीच्या गट साखळी सामन्यात विनिअस ज्युनियरने नोंदविलेल्या एकमेव महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर ब्राझीलने मोरोक्कोविरुद्धची लढत १-१ गोलने बरोबरीत राखली.

२००२ नंतर पहिले विश्वचषक विजेतेपद मिळविण्याचे दडपण असलेल्या पाच वेळच्या जगज्जेत्या ब्राझीलला सुरुवातीच्या काळात प्रतिस्पर्ध्याकडून वरचढ खेळाचा सामना करावा लागला. मोरोक्कोविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधण्यासाठी ब्राझीलला विनिअस ज्युनियरच्या ३२ व्या मिनिटाला केलेल्या गोलची मदत घ्यावी लागली. आमची सुरुवात खूपच खराब झाली, असे विनिअसने सांगितले. आम्हाला चेंडूवर अधिक ताबा ठेवावा लागेल आणि अधिक चांगल्या प्रकारे हालचाल करावी लागेल. चार वर्षांपूर्वी उपांत्य फेरी गाठणाऱ्या मोरोक्कोने पहिल्या ३० मिनिटांत १२ शॉट्स मारले आणि इस्माईल सायबारीने २१ व्या मिनिटाला गोलरक्षक ॲलिसन बेकरच्या डोक्यावरून गोल करत आघाडी घेतली.

सुरुवातीला संघ थोडा अस्वस्थ होता. खेळाडूंवर दडपण स्पष्ट दिसत होते, असे ब्राझीलचे प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी सांगितले. संघ खूपच असंतुलित वाटत होता, मात्र त्यानंतर ११ मिनिटांनी ब्राझीलने बरोबरी साधली. विनिअसने डाव्या बाजूला ब्रुनो गुइमारेससोबत पासची देवाण-घेवाण केली, नील अल आयना-उईला चकवण्यासाठी चेंडूवर काही वेळा नियंत्रण मिळविले आणि यसीन बोनूच्या पसरलेल्याला हाताला हुलकावणी देत उजव्या पायाने जोरदार फटका मारत आपला १० वा आंतरराष्ट्रीय गोल नोंदविला. (वृत्तसंस्था)



## आजचे सामने

**स्वीडन विरुद्ध ट्युनिशिया**
सोमवारी : सकाळी ७:३० वाजतापासून
स्थळ : एस्तादियो बीबीव्हीए, मॉन्टेरी

**स्पेन विरुद्ध केप वर्दे**
सोमवारी : रात्री ९:३० वाजतापासून
स्थळ : मर्सिडीज-बेंझ स्टेडियम, अटलांटा

**बेल्जियम विरुद्ध इजिप्त**
सोमवारी मध्यरात्री १२:३० वाजतापासून
स्थळ : लुमेन फील्ड, सिएटल

**सौदी अरब विरुद्ध उरुग्वे**
मंगळवारी पहाटे ३:३० वाजतापासून
स्थळ : हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

**इराण विरुद्ध न्यूझीलंड**
मंगळवारी (१६ जून) सकाळी ६:३० वाजता
स्थळ : सो-फाय स्टेडियम, लॉस एंजेलिस



# ऑस्ट्रेलियाचा तुर्कीवर सरळ २-० ने विजय



तुर्कीविरुद्ध ऑस्ट्रेलियाच्या कॉनर मेटकाफने गोल केल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांसोबत आनंद साजरा करताना

**व्हॅन्कुवर, १४ जून**

फिफा फुटबॉल विश्वचषकात गट 'डी' मधील सामन्याच्या प्रारंभापासून आक्रमक खेळ करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने तुर्कीवर सरळ २-० ने विजय नोंदविला.

नेस्टोरी इराणकुंदाने २७ व्या मिनिटाला, तर कॉनर मेटकाफने ७५ व्या मिनिटाला तुर्कीच्या संरक्षण फळीला हुलकावणी देत गोल नोंदविला.

पॅट्रिक बीचने ऑस्ट्रेलियाच्या गोलकीपरची धुरा सांभाळली आणि विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात चमकदार कामगिरी केली. तुर्कीविरुद्धच्या सलामीच्या सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघाचा मुख्य गोलरक्षक म्हणून मॅथ्यू रायनचे नाव निश्चित मानले जात होते; रायन हा तीन विश्वचषकांचा अनुभव असलेला आणि संघाचा कर्णधार म्हणून या स्पर्धेत आला होता. मात्र, व्यवस्थापक टोनी पोपोविच यांनी २२ वर्षीय गोलरक्षक पॅट्रिक बीचची निवड केली. पॅट्रिक कारकिर्दीतील केवळ तिसराच आंतरराष्ट्रीय सामना खेळला व त्याने आपली जबाबदारी चोखपणे बजावली.

सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियाने तुर्कीवर अनपेक्षितपणे १-० अशी आघाडी घेतली होती, तेव्हा बीचने अनेक महत्त्वपूर्ण बचावांपैकी पहिला बचाव केला आणि पोपोविच यांनी त्याच्यावर दाखविलेला विश्वास सार्थकी लावला.

तुर्कीच्या अब्दुलकेरीम बारदाकची याने गोलच्या दिशेने एक जोरदार लांब पल्ल्याचा फटका मारला, तेव्हा बीचने पूर्ण ताकदीनिशी झेप घेत चेंडू अडवला आणि तो गोलपोस्टला लागून सुरक्षित दिशेने वळवला.

सामन्याच्या अखेरीस बीचने एकूण आठ बचाव केले आणि प्रतिस्पर्ध्याला गोल करू न देता 'क्लीन शीट' राखली. सिडनीचा रहिवासी असलेल्या बीचने आतापर्यंत केवळ दोन व्यावसायिक हंगाम (सीझन्स) खेळले आहेत, तर रायनने १६ हंगाम खेळले आहेत.

विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलियाने स्वित्झर्लंडविरुद्ध खेळलेल्या अंतिम मैत्रीपूर्ण सराव सामन्यात बीच सुरुवातीला खेळला होता व हा सामना १-१ असा बरोबरीत सुटला होता), परंतु जून २०२५ पासून खेळल्या गेलेल्या देशाच्या इतर नऊ सराव सामन्यांपैकी एकाही सामन्यात तो खेळला नव्हता. (वृत्तसंस्था)

# खोउखीने केलेल्या गोलमुळे कतारने स्वित्झर्लंडकडून गुण हिसकावला

**सॅन फ्रान्सिस्को, १४ जून**

येथील 'बे एरिया स्टेडियम'वर फिफा विश्वचषकातील गट 'ब'च्या सामन्यात कतारने स्वित्झर्लंडविरुद्ध १-१ अशी ऐतिहासिक बरोबरी साधली आणि या स्पर्धेतील आपला पहिला गुण मिळवला.

सामन्याच्या सुरुवातीला स्वित्झर्लंडचे वर्चस्व राहिले; १७ व्या मिनिटाला गोलरक्षक महमूद अबुनादा याने रेमो फ्रॉयलरवर फाऊल केल्यामुळे स्वित्झर्लंडला पेनॉल्टी मिळाली. ब्रिल एम्बोलोने या पेनॉल्टीचे अचूकपणे गोलमध्ये रूपांतर करून संघाला आघाडी मिळवून दिली.

संपूर्ण सामन्यात अनेक संधी निर्माण करूनही स्वित्झर्लंडला सामना आपल्या बाजूने पूर्णपणे वळविण्यात अपयश आले. आपल्या वर्चस्वाचा पुरेपूर फायदा न उठवणे त्यांना 'स्टॉपेज टाइम'च्या अंतिम क्षणी महागात पडले. ९४ व्या मिनिटाला कतारच्या होमाम अहमदने 'बॅक पोस्ट'च्या दिशेने एक अचूक 'क्रॉस' दिला व कर्णधार बुआलेम खोउखीने बचावपटूंना मागे टाकत शानदार 'हेडर'द्वारे गोल केला आणि सामना बरोबरीत आणला. या निकालामुळे गट 'ब'मधील चारही संघ प्रत्येकी एका गुणावर समान स्थितीत आहेत; आता स्वित्झर्लंडचे लक्ष बोस्निया आणि हर्जेगोव्हिना विरुद्धच्या सामन्याकडे लागले आहे, तर कतार सह-यजमान कॅनडाचा सामना करण्यासाठी सज्ज होत आहे. (वृत्तसंस्था)



गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना बुआलेम खोउखी व संघमित्र

# पाकिस्तानविरुद्ध 'हस्तांदोलन न करण्याचे' धोरण भारताकडून कायम

**बर्मिंगहॅम, १४ जून**

बीसीसीआयच्या अलिखित धोरणाचे पालन करत, भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने रविवारी येथे झालेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकातील 'गट १' मधील सलामीच्या सामन्यापूर्वी नाणेफेकीच्या वेळी पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिच्याशी हस्तांदोलन केले नाही.

गेल्या वर्षी पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि भारतीय सशस्त्र दलांनी राबवलेली 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम यांनंतर, दोन्ही देशांच्या राष्ट्रीय क्रिकेट संघांनी नाणेफेकीच्या वेळी आणि सामन्यानंतर 'हस्तंदोलन न करण्याचे' धोरण पाळले आहे.

दुबईतील आशिया चषक स्पर्धेदरम्यान भारताचा तत्कालीन टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव (ज्याला नंतर कर्णधारपदावरून हटवण्यात आले) याने या प्रथेची सुरुवात केली होती.

कोलंबोमध्ये झालेल्या महिलांच्या एकदिवसीय विश्वचषकातील सामन्यादरम्यानही हरमनप्रीत आणि फातिमा यांनी हस्तांदोलन केले नव्हते.

मला वाटते की आम्ही येथे क्रिकेटसाठी आलो आहोत आणि आम्ही केवळ क्रिकेटबद्दलच बोलतो; त्याव्यतिरिक्त आम्ही इतर कशाबद्दलही बोलत नाही... क्रिकेट हे पहिल्या दिवसापासून आमचे स्वप्न राहिले आहे आणि आम्ही केवळ क्रिकेट व उद्याच्या सामन्याबद्दलच चर्चा करतो, असे हरमनप्रीतने भारताच्या टी-२० विश्वचषकातील सलामीच्या सामन्याच्या पूर्वसंध्येला प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटले होते. (वृत्तसंस्था)



# पात्रतेच्या अटीवर नीरज चोप्राची राष्ट्रकुलसाठीच्या संघात निवड

**नवी दिल्ली, १४ जून**

ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणाऱ्या भालाफेकपटू नीरज चोप्राचा रविवारी भारताच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीच्या ॲथ्लेटिक्स संघात समावेश करण्यात आला; मात्र ही निवड भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने निश्चित केलेले पात्रतेचे निकष आगामी स्पर्धांमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर असेल.

महासंघाच्या निवड समितीच्या अंतिम बैठकीनंतर निश्चित करण्यात आलेल्या ३२ सदस्यांच्या या संघात गुरिंदरवीर सिंग (१०० मीटर), अनिमेष कुजूर (२०० मीटर), गुलवीर सिंग (५,००० आणि १०,००० मीटर), तेजस्विन शंकर (डेकॅथलॉन आणि उंच उडी), पारूल चौधरी (३,००० मीटर स्टीपलचेस) आणि रेस-वॉकर प्रियांका यांचाही समावेश आहे.

**नीरज पुढील १० दिवसांत पुन्हा स्पर्धेत उतरणार**

टोकियो येथील जागतिक स्पर्धेनंतर कोणत्याही स्पर्धेत भाग न घेतलेला चोप्रा पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे आणि त्याने अद्याप आपला हंगाम सुरू केलेला नाही. तरीही, हा माजी जागतिक विजेता पुढील १० दिवसांत पुन्हा स्पर्धेत उतरण्याची शक्यता आहे. नीरज पाठीच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा झाला आहे. तो आता प्रशिक्षणासाठी तंदुरुस्त असून, कदाचित पुढील १० दिवसांत स्पर्धेत उतरण्याची तयारी करत आहे, असे एएफआयच्या निवड समितीचे अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी सांगितले.

भारतीय ॲथ्लेटिक्स संघ : पुरुषः गुरिंदरवीर सिंग (१०० मी.), अनिमेश कुजूर (२०० मी), नीरज चोप्रा*, रोहित यादव, यशवीर सिंग (भालाफेक), लोकेश सत्यनाथन, श्रीशंकर (लांब उडी), सेल्वा प्रभू*, प्रवीण चित्रवेल (तिहेरी उडी), समरदीप, तजिंदरपाल (शॉट जंप), तेजस्वीन (शॉटलॉन), तेजस्वी (शॉट) गुलवीर सिंग (५००० मी., १०००० मी.), आदर्श राम, सर्वेश कुशारे (उंच उडी), विशाल टीके, राजेश रमेश (४ बाय ४०० मी. मिश्र रिले), तेजस शिरसे (११० मीटर अडथळा), संतोष टी, यशस पी (४०० मीटर अडथळे), देव कुमार कुमारेना (४०० मीटर अडथळे), देवल कुमार मेने (महिला) (३००० मीटरस्टीपलचेस, ५००० मी), सीमा, निधी (थाळीफेक), पूजा (उंच उडी), मनप्रीत कौर (गोळाफेक), रविना, प्रियांका (१०००० मीटर रेसवॉक), अन्सा बाबू, रशदीप कौर, नीरू पाठक (४ बाय ४०० मीटर मिश्र रीले). (वृत्तसंस्था)




# भारताचे पाकिस्तानसमोर १७१ धावांचे लक्ष्य

**बर्मिंगहॅम, १४ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी पाकिस्तानविरुद्धच्या आपल्या पहिल्या साखळी सामन्यात स्मृती मंधानाने (६८) झळकावलेल्या दमदार अर्धशतकाच्या बळावर भारताने मर्यादित २० षटकांत ६ बाद १७० धावा उभारल्या आणि पाकिस्तानसमोर विजयासाठी १७१ धावांचे लक्ष्य ठेवले.

भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र भारताची सुरुवात निराशाजनक झली. सलामीवीर शेफाली वर्मा (६) पहिल्या षटकांत सादिया इकबालच्या गोलंदाजीवर मुनीबा अलीकडून झेलबाद झाली. त्यानंतर स्मृती मंधानाला साथ देण्यास आलेल्या जेमिमाह रॉड्रिग्जला (२) तस्मिन रूबाबने नतालिया परवेझकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. भारताने ३.२ षटकांत १८ धावांत २ महत्त्वपूर्ण फलंदाज गमावले. मात्र त्यानंतर मंधाना व कर्णधार हरमनप्रीत कौरने आपले अनुभव पणाला लावत भारताचा डाव सावरला. दरम्यान स्मृती मंधानाने आपले अर्धशतक साजरे केले. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ९१ धावांची भागीदारी केली.रमीन शमीनने स्मृती मंधानाला फातिमा सनाकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. स्मृती मंधानाने ४४ चेंडूत ६८ धावांची खेळी केली, यात तिने ९ चौकार व २ षटकार खेचलेत. पुढे हरमनप्रीत कौरला साथ देण्यास आलेल्या भारती फुलमाळीला (१) स्थिरावण्याआधीच सादिया इक्बालने बाद केले. हरमनप्रीत व ऋचा घोषने भारताला सव्वाशे धावांच्या जवळपास आणले. त्याचवेळी कर्णधार हरमनप्रीत कौर पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाच्या गोलंदाजीला बळी पडली,. हरमनप्रीतने ३५ चेंडूंत ४ चौकारांसह ३६ धावांचे योगदान दिले. फातिमा सनाने ऋचा घोष (३४)हिच्या रुपाने आपला दुसरा बळी मिळविला. दीप्ती (१२) व श्रेयांका पाटीलने (१) नाबाद खेळी करत भारताला २० षटकांत ६ बाद १७० धावांचा टप्पा गाठून दिला. पाकिस्तानकडून सादिया इकबाल, फातिमा सनाने प्रत्येकी २ बळी, तर तस्मिन रूबाब व रमीन शमीमने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)



स्मृती मंधानाचे अर्धशतक

## भारत अ, श्रीलंका अ सामना आज

**डाम्बुला, १४ जून**

येथे आयोजित तिरंगी मालिकेत सोमवारी रंगिरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत अ आणि श्रीलंका अ संघादरम्यान सामना खेळला जाणार आहे.

या सामन्याच्या माध्यमातून दोन्ही संघ महत्त्वपूर्ण गुण मिळवित अंतिम फेरीसाठी पात्रता सिद्ध करण्यास उत्सुक आहे. अंतिम सामना २१ जून रोजी खेळला जाणार आहे. या तिरंगी मालिकेत सहभागी श्रीलंका, भारत आणि अफगाणिस्तान अ संघांनी प्रत्येकी दोन सामन्यातून एक विजय नोंदवून प्रत्येकी २ गुणांची कमाई केलेली आहे. आपल्या पहिल्या सामन्यात भारत अ संघाने श्रीलंकेवर ८ गड्यांनी विजय मिळविला होता, त्या सामन्यात श्रीलंकेची फलंदाजी सपशेल कोसळली होती. आता तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय अ संघाला सोमवारी श्रीलंका अ संघाविरुद्ध तसेच बुधवार, १७ जून रोजी अफगाणिस्तान अ संघाविरुद्धचा सामना जिंकणे आवश्यक राहील. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशचा नेदरलॅण्डवर विजय




फिरदौस, शर्मिनची शानदार कामगिरी

**बर्मिंगहॅम, १४ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात ज्युआरिया फिरदौस व शर्मिन अख्तरने केलेल्या शानदार कामगिरीच्या बळावर बांगलादेशने नेदरलँड्सवर ५ चेंडू शिल्लक ठेवून ६ गड्यांनी विजय नोंदविला. ३३ चेंडूंत ५० धावांची विजयी खेळी करणारी जुआरिया फिरदौसने सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या नेदरलँड्सने ८ बाद १३९ धावा उभारल्या. बांगलादेशने १९.१ षटकांत ४ गडी गमावित १४१ धावा काढून आपला विजय साकार केला.

टी-२० विश्वचषकातील पदार्पणाच्या सामन्यात नेदरलँड्सने शानदार खेळ करत बांगलादेशला चांगलीच टक्कर दिली आणि सात वेळा या स्पर्धेत सहभागी झालेल्या बांगलादेशला घाम फोडला.


कर्णधार बॅबेट डी लीडने ४५ चेंडूंत केलेल्या अर्धशतकाच्या जोरावर नेदरलँड्सने १३९ धावांची मजल मारली; तसेच बांगलादेशच्या 'पॉवरप्ले'नंतर १८ धावांत चार बळी टिपून त्यांनी सामन्यात रंगत आणली. मात्र, अखेरीस बांगलादेशच्या अनुभवाचा कस लागला आणि शोर्ना अख्तर व शर्मिन अख्तरने ४४ चेंडूत ५६ धावांची संयमी भागीदारी करत संघाला विजयापर्यंत पोहोचवले. शर्मिन अख्तरने ३२ चेंडूंत ४ चौकारांसह नाबाद ३७ धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

## आज जागतिक मल्लखांब दिन

# आपल्या संस्कृतीचा अभिमान 'मल्लखांब'

**यवतमाळ, १४ जून**

मल्लखांबमध्ये खेळाडू लाकडी खांबावर विविध कसरती करतात. या खेळामुळे शरीर लवचिक मजबूत आणि संतुलित राहते. हा योग आणि व्यायाम यांचा सुंदर संगम मानला जातो, अशी माहिती जागतिक मल्लखांब दिनानिमित्त यवतमाळचे मल्लखांबप्रेमी सोहम प्रशांत पेंडसे यांनी दिली.



मल्लखांबचे तीन मुख्य प्रकार आहेत, स्थिर, दोरी आणि लटकता मल्लखांब. त्यात प्रामुख्याने खेळाडू लाकडी खांबावर कसरती करतात. दोरी मल्लखांबमध्ये दोरीवर खेळ केला जातो. हा खेळ करण्यासाठी धैर्य, ताकद आणि एकाग्रता आवश्यक असते. आज या खेळाचे महत्त्व पटले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होतो. मल्लखांब केल्याने आत्मविश्वास वाढतो आणि शरीर तंदुरुस्त राहते. सर्वांनी या पारंपरिक खेळाचे जतन करणे आवश्यक आहे. मल्लखांब हा आपल्या संस्कृतीचा अभिमान आहे, असे ते म्हणाले. मल्लखांबला 'राजा' असे संबोधले जाते. हा मराठी मातीतील अस्सल मराठी खेळ असून, कुस्तीला दुसरा एकेरी व्यायाम प्रकार आहे. मल्लखांब हा दोन शब्दांनी बनलेला आहे. एक शब्द म्हणजे मल्ल. याचा अर्थ कुस्तीपटू आहे. दुसरा शब्द खांब असा आहे.

महाराष्ट्रात उगम पावलेल्या या खेळाचा १५ जून हा आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन म्हणून साजरा केला जातो. या खेळामुळे आयुष्य स्पर्धात्मक बनते. या खेळाची विशेषता पाहता हा एकमेव असा खेळ आहे, ज्यात केसापासून हातापायांच्या नखापर्यंत संपूर्ण व्यायाम होतो. या खेळामुळे शारीरिक व मानसिक व्यायाम होतो. मल्लखांबामुळे शारीरिक लवचिकता, ताकद, बौद्धिक विकास, धाडसी वृत्ती, एकाग्रता, प्रतिकारशक्ती, टाईम मॅनेजमेंट, तल्लख बुद्धी, स्वतःचा आणि साथीदाराचा तोल सांभाळणे यात खेळणारा तरबेज होतो, असे पेंडसे यांनी सांगितले. मल्लखांबाचे पुरलेला लाकडी खांब, टांगता मल्लखांब, दोरीचा मल्लखांब, सिल्क एरियल हे प्रकार आहेत. लहान मुकांसाठी याची उंची २४० ते २६० सेंटीमीटर आणि मोठ्यांसाठी २६० ते २८० सेंटीमिटर असते. या मल्लखांबाचे कित्येक फायदे असल्यामुळे शालेय जीवनात हा प्रत्येकाने खेळावा असा खेळ आहे, असे मत पेंडसे यांनी व्यक्त केले. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## १९७५ च्या बॅचच्या मित्रांची शिवणे येथे रंगली आंबा पार्टी

**सांगोला, दि.१४ जून-**

शिवणे (ता.सांगोला) येथील सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी तानाजी घाडगे यांच्या शेतात प्रथमच आंब्याचे भरघोस फळ हाती आले. या पहिल्या फळाची बाजारात विक्री न करता त्यांनी १९७५ सालच्या आपल्या शालेय मित्रमंडळींना मनसोक्त आंबा खाण्यासाठी आमंत्रित केले. या स्नेहमेळाव्यात मित्रांनी नैसर्गिकरित्या पिकलेल्या रसाळ आंब्यांचा आस्वाद घेतला. यावेळी सर्वांनी शालेय जीवनातील गप्पा, जुने किस्से, आठवणी आणि एकमेकांची केलेली चेष्टा-मस्करी यामुळे वातावरण कमालीचे आनंददायी बनले होते. या संपूर्ण सोहळ्याचे संयोजन प्रा.राजेंद्र ठोंबरे, दिपक चोथे यांनी केले. याप्रसंगी नारायण चव्हाण, जब्बार मुलाणी, नंदकुमार ठोंबरे, मोहन माळी, शंकर डोंबे आणि विलास पाटील उपस्थित होते. वयाच्या उत्तरार्धातही शालेय मित्रांनी एकत्र येत अनुभवलेला हा जिव्हाळ्याचा सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.




## श्रीराम कृषिदूतांचे डोंबलवाडीत स्वागत

**सोलापूर, दि. १४ जून-**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीअंतर्गत पानीव (ता. माळिशरस) येथील श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालयातील चतुर्थ वर्षात शिकत असणाऱ्या कृषिद्धतांचे आगमन झाले. ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबविण्यात येतो. श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालयाच्या यांचे डोंबलवाडी गावात शेतकऱ्यांसमवेत आगमन झाले. कृषिदूत पुढील तीन महिने गावातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. विविध पिकांच्या लागवडीपासून ते काढणीपर्यंत आणि कृषीसोबत कृषीपूरक व्यवसाय याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून विविध आधुनिक तंत्रज्ञान, जास्तीत जास्त उत्पन्न मिळणाऱ्य पद्धतीची माहिती कृषिदूत गावाला देणार आहेत. तसेच उद्यान दूत रणवीर जाधव, शिवराज देशमुख, तेजस धायगुडे, रवी होळ, आशिष कळके, तुषार मारकड, विश्वराज मस्के, हे उपस्थित होते. उद्यानदूतांना श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शका श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव ॲड. अभिषेक पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद झगडे, महाविद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग कोळेकर, कार्यक्रम समन्वयक दत्तात्रय राऊत, कार्यक्रम अधिकारी अमोल देवकाते, प्राचार्य सुगंध शिंदे , प्राध्यापक जीवन सावळकर, प्राध्यापक धीरज दोरकर, प्राध्यापिका अश्विनी फुटाणे, प्रा. विजय तरंगे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# 'दक्षिण'च्या बीडीओकडून नागरिकांच्या तक्रारी बेदखल




### सत्ताधाऱ्यांचे पाणीटंचाईकडे दुर्लक्ष मात्र बिल काढण्यासाठी झेडपी वारी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १४ जून-**

दक्षिणमधील नागरीकांनी विविध ग्रामपंचायत व ग्रामसेवकांच्या मनमानी कारभाराबद्दल दक्षिण सोलापूर पंचायत समितीकडे तक्रार केल्यानंतर गटविकास अधिकारी मनोज राऊत त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा सुरू आहे. पंचायत समिती कार्यालयाकडे मंद्रुपमधील सरपंच व ग्रामसेवकांच्या भ्रष्ट कारभाराबद्दल तक्रार करून दीड वर्ष होत आले. त्या अर्जाची दखल न घेता 'राजकीय दबावाखाली' कोट्यावधी रूपयांची बिले काढण्याचा खटाटोप सुरू आहे. याबाबत वारंवार गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्याकडे विचारणा केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे गटविकास अधिकार्यांच्या मनमानी कारभाराबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूपमध्ये तीन वर्षात चार ते पाच कोटीचे विकासकामे करण्यात आली. तरीही गावात प्राथमिक सोईसुविधांचा अभाव आहे. केवळ कागदावर विकासकामे दाखवून बिल उचलल्याने दक्षिणच्या बीडीओंकडे तक्रार केल्यानंतरही त्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे.

माझी वसुंधरा योजनेतून मंद्रूप ग्राम पंचायतीला दोन कोटी ७५ लाख रूपयांचे बक्षिस मिळाले. मात्र या पुरस्कार रक्कमेचा योग्य वापर न झाल्याने निधी वाया गेल्याची चर्चा सुरू आहे. सौरऊर्जा, फायबर शौचालय , कचरीकुंडी , प्लास्टीक खुर्च्या सायकल व भांडी वाटपामध्ये घोटाळा झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. मात्र अद्याप त्याची चौकशीही करण्यात आली नाही.

माझी वसुंधरा पुरस्कार योजनेतून गतवर्षी लावलेल्या चार हजार झाडांची पाहणी न करताच केवळ हिरवीगार झाडांचे 'फोटोसेशन' करून बिल काढण्यात येत आहे. यातील निम्याहून अधिक झाडे पाण्याअभावी करपून गेली आहेत. तीस ते चाळीस टक्के झाडे पाहून जवळपास दीड कोटी रूपये बिल काढण्यासाठी सत्तार्धायांचा खटाटोप सुरू आहे. मात्र कागदावरील झाडे जमिनीवर प्रत्यक्षात नसल्यामुळे वृक्षारोपणामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे . पर्यावरण संवर्धन सारख्या संवेदनशील बाबीकडे बीडीओ दुर्लक्ष करून मंद्रूपच्या सत्तार्धायांचे बोगस बिल काढण्यास सहकार्य करीत असल्याने पर्यावरणप्रेमीं मधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूप जिल्हा परिषद सदस्या सोनाली कडते व पंचायत समिती सदस्य मळिसध्द मुगळे यांनी झाडांची पाहणी करून व जिल्हास्तरीय समितिकडून चौकशी करून टप्याटप्याने बिल देण्यास सांगितला आहे. मात्र बीडीओ 'वरिष्ठांचे' आदेश असल्याचे सांगून बिल काढण्यावर ठाम असल्याचे सांगण्यात येत आहे.

### दक्षिणच्या बीडीओंची मनमानी चालणार नाही

नागरीक व लोकप्रतिनिधींच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून दक्षिणचे बीडीओ मनमानी कामकाज करीत आहेत. मंद्रूप ग्रामपंचायत विकासकामातील भ्रष्टाचाराबाबत तक्रारी असतानाही बीडीओ बिल काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. नियमानुसार व कायदेशीर कामांचे बिल काढावे. मात्र घोटाळा व तक्रार असलेल्या कामांची बिले काढल्यास बीडीओविरोधात वरिष्ठांकडे तक्रार करणार आहे.

**- सोनाली कडते**, जिल्हा परिषद सदस्या, मंद्रूप

### झाडांच्या संख्येनुसार बिल द्यावे

मंद्रूपमध्ये माझी वसुंधरा योजनेच्या बक्षिस निधींत घोटाळा झाला आहे. वृक्षारोपणासारख्या संवेदनशील विषयातही झाडांची संख्या वाढवून बिल काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. दक्षिणच्या बीडीओंनी जिल्हास्तरीय समितिकडून झाडांची संख्या पाहून टप्याटप्याने बिल काढावे. अन्यथा त्यांच्या कार्यालयासमोर ठिया आंदोलन करणार आहे.

**-मळिसध्द मुगळे**, पंचायत समिती सदस्य , मंद्रूप

### बीडीओकडून प्रतिसाद नाही

मंद्रूपमधील माझी वसुंधरा योजनेतील झाडांच्या बिलासंदर्भात विचारणा करण्यासाठी दक्षिणचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्याशी संपर्क साधला. मात्र प्रतिसाद मिळाले नाही.



# विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पुस्तके मिळणार

### ३०० शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ३० हजार ६९२ मोफत पाठ्यपुस्तक संच



**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १४ जून-**

अक्कलकोट तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध होणार आहेत. तालुक्यातील सुमारे ३०० शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी एकूण ३० हजार ६९२ मोफत पाठ्यपुस्तक संच शिक्षण विभागाकडे प्राप्त झाले आहेत.

जिप शाळा अनुदानित खाजगी शाळा आश्रमशाळामध्ये पुस्तकाचे वितरण शाळांना करण्यात आले आहे.

तालुक्यातील मराठी, कन्नड व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके दिली जाणार आहे यंदा शिक्षण विभागाने वेळेपूर्वी नियोजन करून वितरणाची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

२०१६-१७ च्या यू-डायस नोंदिनुसार विद्यार्थ्यांच्या संख्येच्या आधारावर पुस्तकांची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार मराठी माध्यमासाठी २० हजार ४३० संच, कन्नड माध्यमासाठी ३ हजार ४५० संच आणि उर्दू माध्यमासाठी १ हजार ४०७ संच उपलब्ध झाले आहेत. याशिवाय इतर काही आवश्यक पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे.

राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात बदल झाल्याने इयत्ता दहावीची पाठ्यपुस्तके अद्याप प्राप्त झालेली नाहीत.

तसेच सेमी-इंग्रजी माध्यमातील काही पुस्तके आणि सहावीच्या काही विषयांची पुस्तके येणे बाकी आहे. त्यासाठी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा सुरू आहे. तालुकास्तरावरून शाळास्तरावर पाठ्यपुस्तके तातडीने पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागाचे समन्वयक गोविंद राठोड व गौरीशंकर कोळी यांच्यासह विभागातील कर्मचारी प्रयत्न करत आहेत.

# मंगळवेढ्यात स्वीट मार्टमधील मलई, पेढा व पनीर गायब

### तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर धास्ती




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १४ जून -**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळयुक्त दूध व अन्नपदार्थाकडे लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या आदेशाने अधिकाऱ्यांनी राज्यात अनेक ठिकाणी कारवाई केल्या आहेत.

मंगळवेढ्यात याची धास्ती स्वीट मार्ट चालकांनी घेतली असून मलई, पेढा व पनीर गायब झाले असल्याचे दिसून येत आहे.

राज्यात भेसळयुक्त दूध व भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्री केली जात होती. भेसळयुक्त अन्नपदार्थावर लक्ष केंद्रित करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेले अधिकारी लक्ष्मी दर्शन घेऊन दुर्लक्ष करत असल्याचे चित्र होते. मात्र काही दिवसांपूर्वी शासनाने अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती केली. त्यांनी लगेच कामाला सुरुवात केली असून त्यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकी घेऊन भेसळयुक्त दूध व अन्नपदार्थ तयार करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी भेसळयुक्त दूध व अन्नपदार्थ तयार करण्यावरून कारवाई करण्यात आली.

स्वीट मार्टमध्ये भेसळयुक्त मलई, पेढा तसेच पनीर विक्री केली जाते. मात्र तुकाराम मुंढे यांनी आयुक्तपदाचा कारभार घेतल्यावर स्वीट मार्ट चालकांचे धाबे दणाणले आहे. त्यांनी आपल्या दुकानातून मलई, पेढा व पनीर गायब केले असल्याचे दिसून येत आहे.

# किराणा दुकानदारावरील धाडीत अक्कलकोटमध्ये ६६ हजारांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१४ जून -**



अक्कलकोट नगरीतील खासबाग गल्ली परिसरातील एका किराणा दुकानावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने छापा टाकला. ही कारवाई शुक्रवार १२ जून रोजी झाली. छाप्यात तब्बल ६६ हजार १२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला. या प्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

अन्न व औषध प्रशासन सहायक आयुक्त सोलापूर कार्यालयातील उत्कर्षा एखंडे (वय २९) यांनी फिर्याद दिली आहे. संशयित, आरोपी आप्पासाहेब ग्यानबा धुमाळ (वय ५५, रा. खासबाग गल्ली, अक्कलकोट) याच्या विरोधात अक्कलकोट उतर पोलीसात गुन्हा दाखल केला आहे. १२ जून रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी खासबाग गल्लीतील माउली किराणा स्टोअर्सची तपासणी केली. तपासणीत बंदी घातलेल्या विविध प्रकारच्या गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूजन्य पदार्थाचा विक्रीसाठी साठा केल्याचे आढळून आले. विविध प्रकारचे पानमसाला, तंबाखू, शॉट लक्झरी चेविंग तंबाखू असा एकूण ६६ हजार १२० रुपयांचा माल जप्त केला. याप्रकरणी आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. तपास हेड कॉन्स्टेबल कोळी करीत आहेत.

# जमीन खरेदीत फसवणूक; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.१४ जून -**




शेतजमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात बागायती जमीन असल्याचे भासवून प्रत्यक्षात जिरायती जमिनीचा करार करून तब्बल २४ लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ही घटना २९ ऑक्टोबर २०२५ ते १० जून २०२६ या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी सोपान हरिदास सावंत, हरिदास बळीराम सावंत, ज्ञानेश्वर हरिदास सावंत आणि कविता हरिदास सावंत (सर्व रा.चुंगी,ता. अक्कलकोट) यांच्याविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रमिला सोनटक्के (वय ४७, रा. चुंगी,) यांनी फिर्याद दिली आहे. २९ ऑक्टोबर २०२५ ते १० जून २०२६ या कालावधीत चुंगी येथे आरोपींनी शांतकुमार सुतार यांच्याशी बोलणी करून संबंधित जमीन बागायती असल्याचे सांगितले. मात्र, कागदोपत्री व्यवहार करताना जिरायती शेतजमिनीचा करार करून दिला.

आरोपींनी त्यांच्याकडून २४ लाख रुपये स्वीकारले. नंतर जमीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत आरोपींनी वारंवार टाळाटाळ केली. वेगवेगळी कारणे देत फिर्यादीची दिशाभूल केली. पैसे परत मागितल्यावर शिवीगाळ, दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिली. प्रकरणाचा तपास पोहेकॉ आर. आर. कोली करीत आहेत.

## निधन वृत्त...

### विलास पाटोळे



**माढा, दि. १४ जून-**

माढा येथील विलास हरी पाटोळे (मेजर) (वय ८०) यांचे बुधवार दिनांक १० जून दुपारी २वाजता अल्पशा आजाराने उपचार दरम्यान निधन झाले. त्यांनी सीआरपीएफ सैन्यात २० वर्ष देश सेवा केली. त्यांच्यावर रात्री ८ वाजता माढेश्वरी मंदिरा लगतच्या हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक विवाहित मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### फुलाबाई भोसले



**सोलापूर, दि. १४ जून-**

माढ्याचे तहसीलदार संजय भोसले, पुण्याचे तहसीलदार नागेश भोसले यांचे मातोश्री कै. फुलाबाई पांडुरंग भोसले यांचे दि. १४ जून रोजी निधन झाले आहे.

### राहुल सुरते



**तुळजापूर, दि. १४ जून-**

सुरतगांव (ता.तुळजापूर) येथील रहिवासी राहुल विलास सुरते (वय ३५) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, दोन भाऊ, बहिण असा परिवार आहे. त्यांचावर सुरतगांव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जिद्द चिकाटी, अभ्यासातून विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करावे

### पत्रकारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती वाटप समारंभ उत्साहात

**डॉ. श्रीकांत येळेगावकर, ॲड. अभिजीत ढोबळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**

आपल्या आई -वडिलांच्या कष्ट आणि संघर्षाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उज्वल यश संपादन करावे. उच्च पदस्थ अधिकारी व्हावे. आजचे युग हे स्पर्धेचे, ज्ञानाचे आणि कौशल्याचे असून विद्यार्थ्यांनी केवळ गुणांवर समाधान न मानता गुणवत्तेला प्राधान्य द्यावे. मोठी स्वप्ने पाहून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी नियोजनबद्ध आणि सातत्यपूर्ण परिश्रम करणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन डॉ. श्रीकांत येळेगावकर, ॲड. अभिजीत ढोबळे यांनी केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या माध्यमातून सौ. सुमतीबाई दत्तात्रय येळेगावकर यांच्या सन्मानार्थ प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर आणि शाहू शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. अभिजीत ढोबळे यांच्या देणगीतून पत्रकारांच्या पाल्यांना पत्र महर्षी रंगाअण्णा वैद्य स्मृती शिष्यवृत्ती आणि दिवंगत संपादक बाबुराव जक्कल स्मृती शिष्यवृत्ती वाटप समारंभ उत्साहात पार पडला. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, महात्मा फुले सूतगिरणीचे चेअरमन ॲड. अभिजीत ढोबळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. स्वागत कार्यकारणी सदस्य प्रीतम पंडित यांनी केले.

सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी तर उपाध्यक्ष आफताब शेख यांनी आभार मानले. यावेळी पत्रकार, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले, आज मिळालेले गुण हे यशाचे अंतिम मोजमाप नाही. गुणांपेक्षा गुणवत्ता अधिक महत्त्वाची आहे. गुणवत्ता ही अपघाताने मिळत नसून सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित असते.यशस्वी व्यक्तींच्या जीवनचरित्राचा अभ्यास करण्याचे आवाहन करताना त्यांनी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, उच्च ध्येय आणि कठोर परिश्रम या गुणांमुळेच महान व्यक्तिमत्त्वे घडतात. स्वतःच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी गिरणी कामगाराचा मुलगा म्हणून प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतल्याच्या आठवणींना उजाळा दिला.

### प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमध्ये यशाची ठिणगी पेटवावी : ॲड. अभिजीत ढोबळे

ॲड. अभिजीत ढोबळे म्हणाले, बारावीनंतरच्या उच्च शिक्षणासाठी पालकांना मोठा आर्थिक संघर्ष करावा लागतो, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावी. आई-वडिलांनी शिक्षणासाठी घेतलेले कर्ज आयपीएस, आयएएस, एमपीएससीसारख्या उच्च पदांवर जाऊन फेडण्याचा निर्धार प्रत्येकाने करावा. श्रमिक पत्रकार संघाने पत्रकारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती व मार्गदर्शनाच्या माध्यमातून केलेले कार्य कौतुकास्पद आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमध्ये यशाची ठिणगी पेटवून समाजात वेगळी ओळख निर्माण करावी तसेच पत्रकारांच्या लेखणीची ताकद समाजाला दिशा देणारी असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे आवाहन ॲड. अभिजीत ढोबळे यांनी केले.



सोलापूर : शहरातील शाळा सोमवारपासून सुरू होत असल्याने शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांनी नवी पेठमध्ये गर्दी केली होती.




सोलापूर : पूर्व मंगळवार पेठ परिसरातील शिवानुभव मंगल कार्यालयात रविवारी सकाळी शिवयोगी साधक परिवाराने श्री विष्णुसहस्त्रनाम यागचे आयोजन केले होते. ( छायाचित्रे : केवल तिवारी)

# उपोषण लय बेकार, हाडं ठिसूळ होतात!

## मनोज जरांगे; सरकारने चर्चेला बोलावल्यास मार्ग काढण्याचा सल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून -**

राज्यातील शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात पुकारलेल्या अन्नदात्यासाठी अन्नत्याग उपोषणाचा आज तिसरा दिवस होता. आज मराठा आरक्षणासाठी लढणारे नेते मनोज जरांगे पाटील यांनी रोहित पवार यांची आंदोलनस्थळी भेट घेतली. यावेळी त्यांनी उपोषण लय बेकार, हाडं ठिसूळ होतात असे सांगत सरकारने चर्चेला बोलावल्यास मार्ग काढण्याचा सल्ला आ. रोहित पवार यांना दिला.



मनोज जरांगे म्हणाले, या देशातल्या, या राज्यातल्या बळीराजासाठी आपल्या पांडुरंगाच्या नगरीत संघर्ष सुरू आहे. शेतकऱ्याला न्याय तर मिळालाच पाहिजे. आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद आहे फक्त थोडा घोळ आहे. तुम्ही कितीही पोटतिडकीने केले तरी त्याला राजकारणच म्हटले जाणार आहे. तुम्ही आमच्या पार्टीत या. तुमच्या मागण्या किती मान्य केल्या जातील माहीत नाही. पण शेतकऱ्यांची लढाई म्हणून याकडे आपण पाहिले पाहिजे. आपण राजकारण करत नसून शेतकऱ्यांसाठी रोहित पवार लढत आहेत. आता मी इथून गेलो की मला मी पवारांचा माणूस आहे, असे म्हणतील. परवा रातभर मी देवेंद्र फडणवीसांचा माणूस होतो. आता तिथून सुटून तुमच्या गळ्यात गुंतणार आहे. माझी खूप फरफट सुरू आहे. पण माझी एक भूमिका असते जिथे जिथे अन्याय होत असतो तिथे आम्ही जात असतो. बच्चू भाऊ बसले होते तेव्हा देखील आम्ही गेलो होतो. शेतकऱ्यांसाठी आम्ही कायम सोबत आहोत.

### मोदी देतात पवार यांना तांब्या भरून पाणी

मनोज जरांगे म्हणाले, मला रोहित पवारांनी मला एक जीआर दाखवला. त्यात त्यांनी मला दाखवले की शब्दांचा खेळ कसा असतो. ३ वर्ष मी तेच बघून बेजार झालोय. कोणीकडे काणा आणि कुणीकडे मात्रा हाणतील, कशाचा मेळ नाही. उपोषण करून बेजार झालो. तुम्हाला उपोषणाला बसायची वेळच नाही आली पाहिजे. मोदी पवारांना तांब्या भरून पाणी देते. आणि मग मोदी साहेब एवढा जीव लावत असतील तर तुम्ही उपोषणाला बसून कशाला हाडकं मोडून घेता? पवार यांना सांगा एक फोन फिरवा. पुढे मनोज जरांगे म्हणाले, जर सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेणार असतील तर तुम्ही त्यांच्यासोबत जावं. उपोषण करू नका. उपोषण लई बेकार आहे. तुम्हाला आता कळेल. तुम्ही परत दोन महिन्यांनी मला फोन कराल आणि म्हणाल उगाच उपोषणाला बसलो. माझे हाड ठिसुळ झाले आहेत. माझे शिरा सुद्धा हाडकाला लागले आहेत. उपोषण म्हणजे जिवावर बेतण्यासारखा आहे, असा सल्लाही जरांगे यांनी रोहित पवारांना दिला.

## सोलापूर विमानतळावर ‘प्रवासी सुविधा दिवस’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जून-**

प्रवाशांचा प्रवास अनुभव अधिक सुखकर व समाधानकारक करण्यासाठी तसेच विमानतळावरील विविध सुविधा आणि सेवांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सोलापूर विमानतळावर १५ ते २९ जून २०२६ या कालावधीत ‘प्रवासी सुविधा दिवस’ साजरा करण्यात येणार आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विमानतळावर आगमन व प्रस्थान करणाऱ्या प्रवाशांचे तिलक लावून व मिठाई वाटप करून स्वागत करण्यात येणार आहे. यासोबतच प्रवाशांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे आणि प्रवासी-केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कालावधीत वृक्षारोपण मोहीम, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांच्या विमानतळ भेटी आदी उपक्रम राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना विमान वाहतूक क्षेत्र आणि विमानतळ संचालनाची माहिती दिली जाणार आहे. प्रवासी सेवेत योगदान देणाऱ्या हाऊसकीपिंग कर्मचारी, एअरलाईन कर्मचारी, राज्य पोलीस कर्मचारी तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. उत्कृष्ट सेवा देणाऱ्या भागधारकांनाही गौरविण्यात येणार आहे. यशोधरा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने प्रवासी, विमानतळ कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोफत आरोग्य व नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. तसेच स्थानिक ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय सेल्फी पॉइंट, प्रवासी संवाद व अभिप्राय सत्र, विमानतळावरील सुविधा व सेवांबाबत जनजागृती मोहीम यांसारखे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. सोलापूर विमानतळाचे कार्यवाहक संचालक अंजनी कुमारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवासी सुविधा दिवस हा प्रवासी समाधान, सामुदायिक सहभाग, पर्यावरणीय जबाबदारी आणि उत्कृष्ट सेवेसाठी विमानतळाच्या वचनबद्धतेचे प्रतीक ठरणार आहे.

# संघर्षातून यशाच्या शिखराकडे

## प्रा.डॉ.कैलास बोंदार्डे यांचा प्रेरणादायी जीवनप्रवास



जिद्द, चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर शून्यातून विश्व कसं निर्माण करता येतं, याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे सोलापूरचे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. कैलास मुक्तागिरी बोंदार्डे. आज त्यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त (सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा) विजापूर रस्त्यावरील मयूर क्लासिक हॉल येथे सायंकाळी ७ ते ९.३० या वेळेत एका विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगलमयी क्षणी त्यांच्या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी शैक्षणिक कारकिर्दीचा घेतलेला हा धावता आढावा.

**गरिबीशी संघर्ष आणि शिक्षणाची जिद्द**

डॉ. बोंदार्डे अवघे दीड-दोन वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे (मुक्तागिरी) छत्र हरपले. अशा कठीण परिस्थितीत त्यांची आई राजूबाई, मोठे बंधू मधुकर आणि थोरली बहीण सिंधुबाई यांनी त्यांचे संगोपन केले. त्यांचे प्राथमिक शिक्षण उस्मानाबाद (आताचे धाराशिव) जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील शिराढोण येथे झाले. प्रचंड गरिबीमुळे शैक्षणिक साहित्य मिळणेही कठीण होते. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांनी लहान वयातच शिराढोणमध्ये लोकांच्या घरी पाणी वाहण्याचे काम केले आणि शेतमजुरीही केली. पुढील शिक्षणासाठी ते सोलापुरात आले. आठवीपासूनचे शिक्षण त्यांनी श्री. ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळेच्या श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेत घेतले. सोलापुरात शिकत असताना त्यांनी घरोघरी वर्तमानपत्रे टाकण्याचे काम सुरू केले, ज्यातून त्यांना महिना नऊ रुपये मिळत असत. गरिबी आणि कष्टातून तावून सुलाखून निघतानाच त्यांची गणिताशी गट्टी जमली, जी त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली.

**शिक्षकी पेशा ते प्राध्यापक पदापर्यंतचा प्रवास**

बी.एस्सी. पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या गणितातील हुशारीमुळे अनेक शाळांमधून त्यांना शिक्षकी नोकरीसाठी विचारणा झाली. मुलांना शिकवण्यात मिळणाऱ्या आनंदापोटी त्यांनी ज्या जैन गुरुकुल प्रशालेत स्वतः शिक्षण घेतले, तिथेच माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारली. १० वीच्या विद्यार्थ्यांच्या चांगल्या तयारीसाठी त्यांनी आपले मित्र सच्चिदानंद मोकाशी यांच्या सोबतीने गणित व विज्ञान विषयांचे विशेष मार्गदर्शन केले. गुरुकुलमध्ये ७-८ वर्षे सेवा बजावत असतानाच त्यांनी एम.एड. पदवी पूर्ण केली. त्यांच्यातील गुणवत्तेचा आदर करत संस्थाचालकांनी त्यांना बी.एड. कॉलेजमध्ये जाण्याचा सल्ला दिला. मुलाखतीद्वारे त्यांची निवड कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन या बी.एड. महाविद्यालयात अधिव्याख्याता म्हणून झाली.

**संशोधन आणि ग्रंथलेखनात मोलाचे योगदान**

कस्तुरबाई कॉलेजमध्ये तत्कालीन प्राचार्य पी. बी. भंडारी यांच्या प्रेरणेने डॉ. बोंदार्डे यांनी लेखन आणि संशोधनाला सुरुवात केली. पुणे विद्यापीठाचे गुरुवर्य व्ही. झेड. साळी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एम.फिल आणि पीएच.डी या सर्वोच्च पदव्या संपादन केल्या. त्यांच्या शैक्षणिक प्रवासातील काही महत्त्वपूर्ण टप्पे असे आहेत:

**ग्रंथलेखन:** त्यांनी मानसशास्त्र, गणित, शास्त्र, आशययुक्त अध्यापन पद्धती आणि लोकसंख्या शिक्षण या विषयांवर तब्बल १३ पुस्तकांचे सह-लेखन केले.

**अभ्यासक्रम निर्मिती:** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळावर (बालभारती) त्यांनी गणित विषय समितीचे सदस्य म्हणून दीर्घकाळ काम केले. तसेच सट (MSCERT) मार्फत विविध वर्गांचे गणिताचे अभ्यासक्रम तयार करण्यात सक्रिय सहभाग घेतला.

**संशोधन मार्गदर्शक:** त्यांच्या मार्गदर्शनाखाली १३ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. आणि ६ विद्यार्थ्यांनी एम.फिल.चे संशोधन पूर्ण केले. आज हे विद्यार्थी विविध महाविद्यालयांमध्ये प्राचार्य, प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत, तर काही सन्मानाने निवृत्त झाले आहेत. आज वयाची ८१ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही डॉ. बोंदार्डे यांनी आपले वाचन अखंड सुरू ठेवले आहे. तसेच विविध सामाजिक व धार्मिक कार्यात ते स्वतःला व्यस्त ठेवून समाजाची सेवा करत आहेत. अशा या थोर ज्ञानतपस्वी प्रा. डॉ. कैलास बोंदार्डे यांना ८१व्या वाढदिवसानिमित्त आणि सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त मनापासून हार्दिक शुभेच्छा!

**अजितकुमार बापूराव संगवे**
**मो.९८८११३३१०३**

### सामाजिक बांधिलकी आणि कौटुंबिक प्रगती

डॉ. बोंदार्डे यांनी केवळ स्वतःचीच प्रगती केली नाही, तर कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्याही तितक्याच सक्षमपणे पेलल्या. लग्न झाले तेव्हा त्यांच्या पत्नी विजया अकरावी मॅट्रिक नापास होत्या. परंतु, डॉ. बोंदार्डे यांनी त्यांना प्रोत्साहन देऊन बी.ए., बी.एड. पर्यंतचे उच्च शिक्षण पूर्ण करून घेतले. बोंदार्डे यांनी त्यांचे पुत्र डॉ. अश्विन यांनाही एम.एससी., एम.एड., पीएच.डी. असं उच्च विद्याविभूषित शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. आज ते कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्येच प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. तर त्यांच्या सुनबाई सोनाली यांनाही विवाहानंतर त्यांनी बी.ए., बी.एड. आणि पीएच.डी. हे शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. तसेच त्यांच्या कन्या तृप्ती यांनी अभियांत्रिकी शिक्षण घेऊन आज ते त्यांचे पती रवीकीर्ती पाटील यांच्यासोबत ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कतर अशा देशांमध्ये कार्यरत आहेत. सेवानिवृत्तीनंतरही कस्तुरबाई कॉलेजमध्ये एम.एड. विभागप्रमुख म्हणून, तसेच येथील गिरीजाबाई ढोबळे शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि उस्मानाबाद येथील श्रीकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून त्यांनी यशस्वी धुरा सांभाळली.

# ‘स्वातंत्र्यलढ्याला बळ देणाऱ्या वंदे मातरम्‌चा इतिहास प्रेरक’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जून-**



ब्रिटीशांच्या विरूध्द झालेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये बळ देणाऱ्या वंदे मातरम्‌चा इतिहास प्रेरक आहे, असे प्रतिपादन पत्रकार सिध्दाराम पाटील यांनी केले.

वंदे मातरम गीताच्या सार्ध शताब्दीनिमित्त वंदे मातरम गीताचा लपलेला इतिहास या विषयावर महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी सोलापूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय स्वातंत्र्यासाठी १८५७ मध्ये झालेले बंड त्यापेक्षाही आधी ३७ वर्षापुर्वी जवळपास २० लाख भारतीयांनी सहभाग घेवून ब्रिटीशांविरूध्द स्वातंत्र्याचा लढा उभा केला होता. त्या लढ्याचे घोषवाक्य होते वंदे मातरम्. स्वातंत्र्यासाठी उभा राहिलेल्या लढ्यात प्रेरणा देणारे वंदे मातरम् किती शक्तीशाली होते याची प्रचिती आल्यानेच ब्रिटीश राजवटीतील भारतीय अधिकारी डेप्युटी मॅजिस्ट्रेट बंगाली कवी बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी १८७० साली बंगाली भाषेत वंदे मातरम् कविता लिहिली. त्यानंतर आनंदमठ या कादंबरीमध्ये त्याचा समावेश केला. थोर स्वातंत्र्यसेनानी, कवी रविंद्रनाथ टागोर यांनी १८९६ रोजी झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम वंदेमातरम् ही कविता सादर केली. वंदे मातरम् या गीताला नुकतेच दीडशे वर्षे पूर्ण झाले. आपल्या देशाचा वरवरचा आणि तात्पुरता इतिहासच आजच्या तरूणांना माहित आहे. असे न होता तरूणांनी आपल्या देशाच्या महान इतिहासाचा अभ्यास केला पाहिजे आनंदमठ कादंबरीचे वाचन केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी प्रास्ताविक केले. कोषाध्यक्ष अमोल धाबळे यांनी वक्ता आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर यांनी स्वागत केले. कार्यवाह जितेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, नगरसेवकद्वय सात्विक बडवे, ज्ञानेश्वर म्याकल, सिध्देश्वर बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक पुरुषोत्तम उडता, शिवसेना महानगर प्रमुख महेश धाराशिवकर, ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने, गायक दीपक कलढोणे, प्रशांत बडवे, अविनाश महागांवकर, डॉ.व्यंकटेश मेतन, अ‍ॅड.मंकणी, सिध्देश्वर किणगी, विशाल शिंदे यांच्यासह सेवासदन, नूतन मराठी विद्यालय, चंद्राम चव्हाण गुरुजी आणि अन्य शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी शिल्पा जिरांकलगी यांनी वंदे मातरम हे गीत गायले.

## रस्त्याकडेला असलेल्या विहिरींचे होणार सर्वेक्षण : जिल्हाधिकारी

**सोलापूर, दि. १४ जून -**

माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे आज झालेल्या भीषण अपघाताबाबत सोलापुरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आता जिल्ह्यातील रस्त्याच्या कडेला असलेल्या सर्व विहिरींचे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले की ‘ ग्रामस्थांनी विहिरीत उतरुन लोकांचा जीव वाचवला. वाहनात एकूण १५ लोक होते, त्यापैकी ८ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या संपूर्ण घटनेची चौकशी केली जाणार आहे. या विहिरीच्या बाजूला संरक्षण भिंत बांधणं अपेक्षित होतं. आता संपूर्ण जिल्ह्यात रस्त्याच्या बाजूला असलेल्या विहिरींचे सर्वेक्षण केले जाणार आहे. खासगी वाहनांमध्ये प्रवासी वाहतूक करणं चुकीचं आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहनात भरणंही चुकीचं आहे. संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करणार आहोत’.

माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी या घटनेबाबत बोलताना म्हटले की, ‘शेतकऱ्यांच्या विहिरी आधीपासूनच्या आहेत, रस्ता नंतर बनला. रस्ता बांधतांना सर्वेक्षण झाले नाही का? रस्त्याचे पुन्हा सर्वेक्षण केले पाहिजे. ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे. याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार असून विधानसभेतही मुद्दा मांडणार आहे.

|| प्रथम पुण्यस्मरण ||



सोमवार,
१५ जून
२०२६
दु.१ वा.

-स्वगृही-
क्रांती चौक
भीमनगर
धाराशिव

कालकथित
शकुंतला गंगाधर शिंगाडे

आई तुझे प्रेम, माया आणि आशीर्वाद..
आमच्या हृदयात सदैव जिवंत राहतील..
भावपूर्ण आदरांजली..!

सुनिल गंगाधर शिंगाडे
शरणम गंगाधर शिंगाडे
का.अनिल गंगाधर शिंगाडे
धनंजय (नाना) शिंगाडे
अविनाश गंगाधर शिंगाडे
विशाल गंगाधर शिंगाडे

दिपक अंबादास शिंगाडे
बुद्धमणी अंबादास शिंगाडे
रावसाहेब अंबादास शिंगाडे

समस्त
शिंगाडे परिवार

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सौर ऊर्जा प्रकल्पातून ८० हजारांच्या केबल वायरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जून -**

तुळजापूर तालुक्यातील व्होर्टी येथील सौर ऊर्जा प्रकल्पातून सुमारे ८० हजार रुपये किमतीची केबल वायर चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.८ जून रोजी पहाटे ३ ते ४.३० वाजण्याच्या दरम्यान व्होर्टी येथील सेक्टर क्रमांक १२ व १३ मधील धाराशिव सोलार एनर्जी लिमिटेड प्रकल्प परिसरात ही चोरी झाली.

अज्ञात चोरट्याने सोलापूर कंपनीच्या मालकीची सुमारे दोन हजार मीटर लांबीची ०६ स्क्वेअर एमएमडीसी केबल वायर चोरून नेली. चोरीस गेलेल्या मालाची किंमत अंदाजे ८० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी प्रेमदास हिरू राठोड (वय ३८), व्यवसाय सुपरवायझर, आयएमपी इम्पिरिअल सिक्युरिटी फोर्स, रा. वडाचा तांडा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी १२ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# ४०० कोटींची मालमत्ता शासनाकडे; पण कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा नाही! तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय हस्तांतरणावर नाराजी

**शासनाच्या परिपत्रकातील अटींमुळे कर्मचारी संभ्रमात; ३७ कोटींची देयके आणि ४ कोटींच्या देखभाल खर्चाचा भार मंदिर संस्थानावर...**

**सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.१४ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत राज्य शासनाने १० जून रोजी परिपत्रक जारी करून हस्तांतरण प्रक्रियेचा सविस्तर खुलासा केला आहे. या परिपत्रकामुळे ५ मे २०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाला प्रत्यक्ष अंमलबजावणीची दिशा मिळाली असली, तरी त्यातील अटी-शर्तींमुळे कर्मचारी आणि शिक्षणप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

परिपत्रकानुसार, महाविद्यालयातील सध्याचे कर्मचारी शासकीय सेवेत समाविष्ट होणार नसून ते मंदिर संस्थेचे कर्मचारी म्हणूनच कार्यरत राहतील. त्यांच्या वेतनाची जबाबदारीही मंदिर संस्थानावरच राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित होत असतानाही कर्मचाऱ्यांना शासकीय लाभ मिळणार नसल्याने असंतोष वाढला आहे.

याशिवाय, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या देखभाल व व्यवस्थापनासाठी मंदिर संस्थानाने शासनाकडे सुमारे चार कोटी रुपयांची रक्कम जमा करावी लागणार आहे. तसेच महाविद्यालयातील १३ नियमित कर्मचारी आणि ४६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असून, या सर्व प्रकरणांचा निपटारा करून सुमारे ३७ कोटी रुपयांची थकीत रक्कम मंदिर संस्थानानेच अदा करायची असल्याचेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. परिपत्रकात पुढे असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, सध्या कार्यरत कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रिक्त पदांवर शासन स्वतःचे कर्मचारी नियुक्त करेल. त्या कर्मचाऱ्यांचे वेतन आणि इतर सर्व जबाबदाऱ्या शासनाकडे राहतील. मात्र, अनेक वर्षांपासून महाविद्यालयात सेवा बजावणारे प्राध्यापक व कर्मचारी शासकीय सेवेत समाविष्ट न होण्याची शक्यता असल्याने त्यांच्यात संभ्रम आणि नाराजी वाढली आहे.

शिक्षणप्रेमी नागरिकांनी या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, महाविद्यालयाची सुमारे ४०० कोटी रुपयांची मालमत्ता शासनाच्या ताब्यात जाणार आहे; मात्र त्याबदल्यात कर्मचाऱ्यांचे वेतन आणि सेवा हक्क स्वीकारण्यास शासन तयार नाही. कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि भवितव्याचा प्रश्न कायम असताना एवढी मोठी मालमत्ता शासनाकडे का द्यावी, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महाविद्यालय हस्तांतरणाच्या निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय अभियांत्रिकी शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असली, तरी कर्मचारी हिताच्या मुद्द्यावरून हा विषय पुन्हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### धाराशिवमध्ये ५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व खाऊ वाटप

**धाराशिव, १४ जून -**

उज्वला कुलकर्णी यांच्या पुढाकाराने व धारासुर मर्दिनी महिला फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १३ जून रोजी हिप्परगा येथील पालावरच्या शाळेतील पाचवी ते आठवीच्या ५० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी अमेरिका येथील शिल्पा डोंगरे तसेच पुणे येथील अपर्णा पुराणिक व अश्विनी कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसोबत वडापाव व आईस्क्रीम देण्यात आल्याने मुलांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाला रत्नमाला देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. बॅग व खाऊ वाटप करताना त्यांचा उत्साह उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. यावेळी फेडरेशनच्या पदाधिकारी संगीता काळे, उज्वला मसलेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अवंतिका जालनेकर, ज्योती राजेनिंबाळकर, संगिता देशमुख, पुष्पा डोळे, अस्मिता बेंबळीकर, रेखा ढगे व नीता कठारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### प्रज्ञाशोध परीक्षेत आर्य चाणक्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**धाराशिव, १४ जून -**

लोकसेवा समिती, धाराशिव संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय प्रज्ञाशोध



परीक्षा (आयटीएस) २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता पहिलीतील सुतीर्थ पद्मनाभ व्यास याने २०० पैकी १७८ गुण मिळवून केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरी गटातून सावी भागवत सताळकर हिने १८० गुणांसह केंद्रात द्वितीय, तर अन्विता किशोर जोशी हिने १७८ गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता चौथीतील ऋज्वी पद्मनाभ व्यास हिने १८८ गुण मिळवत आपल्या गटातून केंद्रात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल लोकसेवा समिती, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले असून यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### एआय आणि डेटा सायन्समध्ये करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन

**धाराशिव, १४ जून -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्स विभागामार्फत एआय आणि डेटा सायन्स क्षेत्रातील करिअर व रोजगाराच्या संधी या विषयावर फिनसॉफ्टएआयचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शैलेन्द्र अभ्यंकर यांचे ऑनलाइन तज्ज्ञ व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांनी उद्योगाभिमुख कौशल्ये व रिअल-टाईम प्रकल्पांमध्ये सहभाग वाढविण्याचे आवाहन केले. प्रमुख वक्ते श्री. अभ्यंकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि जनरेटिव्ह एआय क्षेत्रात भविष्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचे सांगितले. केवळ पदवी नव्हे तर उद्योग क्षेत्राला आवश्यक कौशल्ये विकसित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप टेकाळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विभागप्रमुख प्रा. प्रदीप पवार यांनी केले.



### अर्पिताचा पत्रकार संघाकडून सत्कार

**नळदुर्ग, १४ जून -**

नळदुर्ग येथील नॅशनल मराठी शाळेची विद्यार्थिनी अर्पिता अन्नाराव जाधव हिने दहावीच्या परीक्षेत ८८ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नळदुर्ग शहर पत्रकार संघ व मित्र परिवाराच्या वतीने तिचा आणि तिच्या पालकांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. सत्कार समारंभात नगरसेवक मारुती खारवे, सुहास येडगे, नगरसेवक तानाजी जाधव यांच्या हस्ते अर्पिता व तिचे वडील अन्नाराव जाधव यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक सुधीर हजारे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, अमर भाळे आदी उपस्थित होते.

### ४.१२ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, १४ जून -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या पथकांनी १३ जून रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर एकूण ४७६ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून ४ लाख १२ हजार ४०० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## हॉटेलसमोर थांबला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला; कट्टाधारी युवक ताब्यात




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील आंदोरा येथे अवैधरित्या गावठी कट्टा व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या एका युवकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने पकडून अटक केली. आरोपीकडून गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा एकूण ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दि.१२ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणणे तसेच अवैध शस्त्रधारकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पथक पेट्रोलिंग करत होते.

यावेळी येरमाळा चौक परिसरात पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, शाम शिवाजी काळे (वय ३२, रा. झगडे गल्ली, भूम, ता. भूम, जि. धाराशिव) हा आंदोरा येथे पंचायतसाठी आला असून हॉटेल निसर्गसमोर थांबलेला आहे आणि त्याच्याकडे गावठी कट्टा आहे.

माहितीची खातरजमा करून पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. हॉटेल निसर्गसमोर संशयित इसम दिसताच पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कमरेला खोवलेला लाकडी पिस्टल ग्रीप असलेला लोखंडी गावठी कट्टा तसेच पँटच्या खिशात दोन जिवंत काडतुसे आढळून आली.

जप्त करण्यात आलेल्या शस्त्र व काडतुसांची किंमत सुमारे ४६ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याच्याविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सचिन खटके, पोहेकॉ. विनोद जानराव, नितीन जाधवर, पोलीस नाईक बबन जाधवर व चापोअं रोहित दंडनाईक यांच्या पथकाने केली. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

## बंद पडलेल्या बोअरवेलचे री-बोअरिंग; कळंबकरांच्या पाणीटंचाईवर उपाय



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ जून -**

शहरातील नागरिकांना भविष्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी पुढाकार घेत अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या बोअरवेलचे री-बोअरिंग करून त्या पुन्हा कार्यान्वित केल्या आहेत.

या उपक्रमाअंतर्गत पोलीस लाईन परिसर, आर्य समाज मंदिरासमोरील तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील चोंदे यांच्या घरासमोरील बोअरवेलचे री-बोअरिंग करण्यात आले. या बोअरवेल बंद पडल्याने नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता या ठिकाणी पुन्हा मुबलक पाणी उपलब्ध होणार असल्याने संबंधित भागातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे.

नगरपरिषदेच्या या निर्णयामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगराध्यक्षा सुनंदा कापसे व सर्व नगरसेवकांचे आभार मानले. वाढत्या लोकसंख्येनुसार पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करून शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याचा प्रयत्न नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, नगरसेवक व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**पाणीपुरवठ्यासाठी कापसे दाम्पत्याचा पुढाकार...**

कळंब शहराला नियमित, स्वच्छ व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा मिळावा यासाठी माजी नगराध्यक्ष शिवाजी आप्पा कापसे यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. दुष्काळी परिस्थितीत त्यांनी राबविलेली हवाई पाईपलाईन योजना राज्यभर चर्चेचा विषय ठरली होती. शहराच्या पाणीप्रश्नावर त्यांनी केलेले कार्य आजही कौतुकास्पद मानले जाते.

## भूम-परंडा तालुक्यात शिवसेना संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न : डॉ. बोराडे

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१४ जून -**

धाराशिव येथे खासदार ओम प्रकाशराजे निंबाळकर यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित शिवसेनेच्या संघटनात्मक आढावा बैठकीत भूम व परंडा तालुक्यात पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ. चेतन बोराडे यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा शिवसेना नेते आमदार अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत डॉ. बोराडे यांनी भूम व परंडा तालुक्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा सादर केला.

यावेळी इङ नोंदणी, घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा या उपक्रमांवर विशेष भर देत पक्षाची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीतील यश, विधानसभा निवडणुकीतील अल्प मतांनी झालेला पराभव तसेच अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील निकालांचे आत्मपरीक्षण करून आगामी काळात जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या बैठकीस आमदार अंबादास दानवे यांच्यासह संपर्कप्रमुख सुनील काटमोरे, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाप्रमुख रणजीत पाटील, महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील विविध लोकप्रतिनिधी, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तेरखेडा येथे गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जून -**

बीड-धाराशिव राष्ट्रीय महामार्गावरील तेरखेडा येथे गोवंशीय जनावरांची कथितपणे बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या वाहनावर येरमाळा पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दशरथ शंकर जगदाळे (वय ५२, रा. हिवरा, ता. भूम, जि. धाराशिव) हे १३ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास अशोक लेलँड मालवाहतूक वाहन (क्र. एमएच २५ एजे ६५८६) मधून दोन जर्सी गायी व चार लहान वासरे वाहतूक करत होते.

तेरखेडा येथील हॉटेल स्वादसमोर पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, जनावरांना चारा-पाण्याची व्यवस्था न करता क्रूरपणे भरल्याचे आढळून आले. पोलिसांनी वाहनासह सुमारे २ लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## शाळा एकत्रीकरणाला मंगरुळ ग्रामस्थांचा तीव्र विरोध; आज शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा




**शासनाने निर्णय मागे घ्यावा; अन्यथा शाळा बंद आंदोलन : ग्रामस्थांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१४ जून -**

राज्य शासनाने एकाच कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद मुलांची व मुलींची प्राथमिक शाळा जिल्हा परिषद प्रशालेत विलीन करण्याचा घेतलेला निर्णय ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि गोरगरीब विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा असल्याचा आरोप करत मंगरूळ येथील ग्रामस्थांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शासनाने निर्णयाचा फेरविचार करावा, अन्यथा १५ जून रोजी शाळेला कुलूप ठोकून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयामुळे शिक्षकांची संख्या कमी होण्याची शक्यता आहे. तसेच पोषण आहार योजनेतील कर्मचाऱ्यांवरही परिणाम होणार असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होईल. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना याचा फटका बसणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

यापूर्वीही अनेक गावांनी या निर्णयाविरोधात ठराव मंजूर केले असून मंगरूळ येथील जिल्हा परिषद प्रशाला, प्राथमिक शाळा आणि कन्या शाळेच्या शाळा व्यवस्थापन समित्यांनीदेखील एकत्रीकरणास विरोध करणारे ठराव शासनाकडे पाठविले आहेत. तरीही शासनाने निर्णय कायम ठेवल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना दिलासा द्यावा. अन्यथा नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी, १५ जून रोजी, समस्त मंगरुळ ग्रामस्थ जिल्हा परिषद प्रशालेला कुलूप ठोकून निषेध नोंदवतील आणि पुढील काळात तीव्र आंदोलन छेडतील.

हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज डोंगरे, प्राथमिक शाळेचे अध्यक्ष तथा पत्रकार चांदसाहेब शेख आणि कन्या शाळेचे उपाध्यक्ष सत्यवान लबडे यांनी सादर केले.

निवेदनावर सरपंच, उपसरपंच, तिन्ही शाळा व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष व सदस्य तसेच ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

या निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), खासदार आणि तुळजापूरचे आमदार यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# अंबाजोगाई–आपेगाव रस्त्याची भयानक अवस्था; 7–8 किलोमीटरमध्ये 1500 खड्डे, प्रवाशांची गैरसोय व एसटी सेवा बंद







**अंबाजोगाई :** अंबाजोगाई ते आपेगाव या महत्त्वाच्या जिल्हा परिषद रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अवघ्या ७ ते ८ किलोमीटरच्या अंतरात तब्बल १५०० हून अधिक खड्डे पडल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. खड्ड्यांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

ऐन पावसाळ्याच्या तोंडावर आता ही अवस्था आहे तर भर पावसाळ्यात काय अवस्था होईल खड्ड्यांच्या विळख्यात अंबाजोगाई–आपेगाव रस्ता; ७ ते ८ किलोमीटरमध्ये तब्बल १५०० खड्डे, नागरिकांचा संताप

शाळकरी विद्यार्थी बससेवा बंद करण्यात आली आहे, वाहनधारक व प्रवाशांचा जीव धोक्यात; हिवरा खुर्द, सोमनाथ बोरगाव, धानोरा, माकेगाव, कानडी बदन आपेगाव यांसह परिसरातील अनेक गावांना जोडणारा हा प्रमुख मार्ग पुढे लातूर महामार्गाला जोडतो. या रस्त्यावरून दररोज शेतकरी, कामगार, नोकरी करणारे नागरिक, शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी व अनेक वाहनधारकांचा प्रवास सुरू असतो. मात्र रस्त्यावरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर झाली आहे की काही भागात विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या अडचणीमुळे महामंडळाच्या बससेवा बंद करण्यात आली आहे महामंडळानी सुद्धा ऐनवेळी पाठफिरवली अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

विशेष म्हणजे निवडणुकीच्या काळात याच मार्गावरील विकासाची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासनाचे अधिकारी या रस्त्याच्या प्रश्नाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर बनली असून दुचाकीस्वारांना खड्डे चुकवताना तोल जाऊन अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. चारचाकी वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप ठोस दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याची नाराजी व्यक्त केली आहे. "या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना प्रत्येकवेळी जीव मुठीत धरावा लागतो. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा सर्व गावकरी व वाहनधारकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल," असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# धोंडे भोजन सोहळ्यात हजारो भाविकांची उपस्थिती

## पावनधामच्या प्रवेशद्वारासाठी श्रीगुरु पुंडलिक महाराज देहुकर यांची ₹४ लाख ३१ हजारांची देणगी घोषणा

**केज(प्रतिनिधी )दि.14जुन :** श्री जगद्गुरु तुकोबाराय पावनधाम संस्थान, औरंगपूर येथे अधिकमासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानिमित्त रविवारी भव्य धोंडे भोजन सोहळा पावनधामचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. या भक्तिमय कार्यक्रमास हजारो भाविकांनी उपस्थित राहून हरिनामाचा आनंद लुटला.

यावेळी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे 13 वंशज, ह.भ.प. श्रीगुरु पुंडलिक महाराज देहुकर यांचे काल्याचे कीर्तन संपन्न झाले. आपल्या कीर्तनातून त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा जागर करत सेवा, माणुसकी आणि समाजहिताचा संदेश दिला. त्यांच्या प्रभावी निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.



कीर्तनादरम्यान श्रीगुरु पुंडलिक महाराज देहुकर यांनी संस्थानच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा करत पावनधाम येथील सावन मंच प्रवेशद्वार उभारणीसाठी ₹४ लाख ३१ हजारांची देणगी जाहीर केली. वर्षभराच्या आत हे प्रवेशद्वार उभारण्यात यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या उदार घोषणेचे उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या धोंडे भोजन सोहळ्यात हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. धोंडे जेवणाचे यजमानपद उद्योजक नामदेव इंदरराव गोरे, भास्कर नागोराव आगळे, प्रकाश बंडगर, भानुदासराव करपे, अनिल लक्ष्मणराव पिंपळे आणि सतीश पंढरीनाथ शिंदे यांनी घेतले.

संपूर्ण परिसर हरिनाम, अभंग आणि भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.

भक्ती, सेवा आणि समाजकार्याचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या सोहळ्यामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. श्रीगुरु पुंडलिक महाराज देहुकर यांच्या देणगी घोषणेमुळे पावनधामच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# प्राध्यापकांनी संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज : प्रा. डॉ. महेंद्र शिरसाट

## तुलसी शैक्षणिक समूहात सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न




**बीड (प्रतिनिधी) :** प्राध्यापकांनी केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज बनली आहे. संशोधनातूनच नवीन ज्ञानाची निर्मिती होते आणि समाजाच्या प्रगतीला दिशा मिळते, असे मत जेष्ठ प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रो. डॉ. महेंद्र शिरसाट यांनी व्यक्त केले.

तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने शनिवार, दि. १३ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. उत्तम साळवे, प्रो. डॉ. मनोहर शिरसाट, प्रा. अर्जुन राठोड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महेंद्र शिरसाट म्हणाले की, जीवनात तत्त्वांशी कधीही तडजोड करू नका, महामानवांचे विचार आचरणात आणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव जपा, आपण ज्या समाजातून घडतो त्या समाजासाठी काहीतरी परत देण्याची भावना प्रत्येकामध्ये असली पाहिजे. असा प्रेरणादायी संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आई-वडिलांप्रमाणे भूमिका निभावावी, असे ते म्हणाले. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. मनोहर शिरसाट म्हणाले की, प्रा. डॉ. महेंद्र शिरसाठ यांनी आयुष्यभर तत्त्वांना कधीही सोडले नाही. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांनी अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक विकासाचे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनाही झाला असून ते शिक्षण क्षेत्रातील प्रेरणेचे महत्त्वपूर्ण स्रोत आहेत. प्रो. डॉ. उत्तम साळवे यांनी आपल्या भाषणात डॉ. शिरसाट यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. देश-विदेशातील अनेक नामांकित पदव्या त्यांनी संपादन केल्या असून त्यांचा परिचयच तब्बल ५५ पानांचा आहे.

# अनिल वैरागे गौतम खंडागळे यांच्यासह बीड जिल्ह्यातील तिन कलावंत करारत्न पुरस्काराने सन्मानित

**केज/प्रतिनिधी :** एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र आयोजित जीवन गौरव, राष्ट्रीय एकतारत्न, समाज रत्न, कलारत्न, व राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार वितरण सोहळा दि.११ जून २०२६ रोजी मराठी पत्रकार भवन म.न.पा मार्ग आझाद मैदान मुंबई या ठिकाणी प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थिती व सहकार मंत्री महा. राज्य मुंबई मा.ना. बाबासाहेब पाटील तसेच मा.आ. विक्रमजी काळे शिक्षण आमदार छत्रपती संभाजी नगर यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार ५७ व्यक्तींना देण्यात आला तसेच मा. सुधाकर जी शर्मा ज्येष्ठ गीतकार बॉलीवूड



मुंबई तसेच मा. अली खान सिने अभिनेते बॉलिवूड मुंबई मा. सय्यद अली मुंबई विभाग अध्यक्ष एकता सेवाभावी संस्था यांची देखील उपस्थितीत होती या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अगदी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला हा पुरस्कार विविध क्षेत्रातील पारंगत व्यक्तींना देण्यात आला यामध्ये माननीय अनिल वैरागे, गौतम जी खंडागळे, व बीड जिल्ह्यातील गायिका ललिता लांडगे निशा उजगरे यांना कला क्षेत्रातील कलारत्न हा पुरस्कार देण्यात आला तर सुनीता बोधने यांना कलासमाज रत्न पुरस्कार देण्यात आला यावेळी मा. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व आमदार विक्रम जी काळे यांनी आलेल्या सर्व पुरस्कार विजेत्यांचे शब्द सुमनाने स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातीहल मान्यवर मोठ्या प्रमाणात या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# महिलांच्या हातातून मोबाईल पळवणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड

## शिवाजीनगर पोलिसांची आठवड्यातील दुसरी मोठी कामगिरी



**बीड :** बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसाढवळ्या महिलांच्या हातातील मोबाईल हिसकावून पळवणाऱ्या एका अट्टल चोरट्यांच्या टोळीला शिवाजीनगर गुन्हे शोध (डीबी) पथकाने अत्यंत शिताफीने अटक केली आहे. चोरट्यांनी अवघ्या १५ ते २० मिनिटांच्या अंतराने एकापाठोपाठ एक तीन महिलांना लक्ष्य करत मोबाईल लांबवले होते. या धाडसी चोऱ्यांमुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते, मात्र डीबी पथकाने तात्काळ चक्रे फिरवून अवघ्या दोन तासांच्या आत नाकेबंदी करत या टोळीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

"प्रेस नोट-2_Page_1.jpg" या अधिकृत पत्रकानुसार, चोरट्यांनी शहरात धुमाकूळ घालत तीन वेगवेगळ्या ठिकाणी जबरी चोऱ्या केल्या. पहिली घटना 'दीप हॉस्पिटल'कडे जाणाऱ्या अश्विनी कृष्णा सुर्वे यांच्यासोबत घडली, ज्यांचा मोबाईल स्वराज्य नगर कमान समोर मोटर सायकलवरून आलेल्या तिघांनी हिसकावला. दुसरी घटना जुना धानोरा रोड भागातील मिराबाई बाळू मुळीक या आपल्या मैत्रिणींसोबत 'सरस्वती विद्यालया'समोरून दळण घेऊन जात असताना घडली; पाठीमागे बसलेल्या चोरट्याने त्यांच्या हातातील फोन ओढला. तर तिसरी घटना 'के. एस. के. कॉलेज'समोरून जाणाऱ्या एका परिचारिका (नर्स) महिलेसोबत घडली, ज्यांच्या ॲप्रनच्या खिशातील मोबाईल चोरट्यांनी चालत्या गाडीवरून उडवला. एकामागून एक घडलेल्या या घटनांमुळे पोलिसांनी पाच पथके तयार करून दोन ठिकाणी कडक नाकेबंदी लावली आणि दोन तासांत आरोपींना जेरबंद केले. त्यांच्याकडून एकूण ९ मोबाईल रिकव्हर करण्यात पोलिसांना यश आले आहे.

याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांमध्ये आवेश खान खाजा शेख (वय २२ वर्षे, रा. कानडी रोड, केज), गणेश श्रीराम मुंडे (रा. किल्ले धारूर रेस्ट हाऊसजवळ, बीड) आणि ऋषिकेश लक्ष्मण वायबसे (वय १९ वर्षे, रा. कासारी, ता. केज) यांचा समावेश आहे. हे तिन्ही आरोपी अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल आहेत. मोबाईल चोरी करणे, त्याचे सुटे भाग (स्पेयर पार्ट) करून विकणे हाच त्यांचा मुख्य धंदा होता. गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे एकत्र आलेल्या या टोळीवर आता शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर नवीन कायद्याच्या कडक कलमांन्वये कोर्टात भक्कम

# मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे शेतकरीहिताचे नेतृत्व पुन्हा अधोरेखित; कर्जमाफीमुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा – शंकर देशमुख

**बीड, दि. __ :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने घेतलेला कर्जमाफीचा निर्णय हा शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारा, शेतीला बळकटी देणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणारा ऐतिहासिक निर्णय असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले.

देशमुख म्हणाले की, गेल्या काही वर्षांत दुष्काळ, अवकाळी पाऊस, नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत राज्य मंत्रिमंडळाने मोठ्या आर्थिक तरतुदीसह मंजूर केलेली कर्जमाफी लाखो शेतकरी कुटुंबांना दिलासा देणारी ठरणार आहे.

या निर्णयामुळे पात्र शेतकऱ्यांवरील कर्जाचा भार कमी होऊन त्यांना नव्याने शेतीमध्ये गुंतवणूक करण्याची संधी मिळेल. तसेच शेती उत्पादन वाढीस मदत होऊन ग्रामीण भागातील आर्थिक चक्र अधिक गतिमान होईल. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याबरोबरच त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी नेहमीच शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य दिले आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासासोबतच शेती क्षेत्र सक्षम करण्यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, कर्जमाफीचा निर्णय हा त्यांच्या संवेदनशील, अभ्यासू आणि शेतकरीहितैषी नेतृत्वाचा प्रत्यय असल्याचे देशमुख यांनी नमूद केले.

देशमुख पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. योजनेचा लाभ जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा ही सर्वांचीच अपेक्षा आहे. शासनही त्यासाठी कटिबद्ध आहे.

यावेळी त्यांनी विरोधकांवर टीका करताना सांगितले की, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत असताना काही विरोधी पक्षांकडून या विषयाचे राजकारण करण्याचा प्रयत्न होत आहे. शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयाचे स्वागत करण्याऐवजी संभ्रम निर्माण करणे, दिशाभूल करणारी विधाने करणे आणि शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरविणे हे दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करण्यापेक्षा विधायक सूचना देणे आणि सकारात्मक सहकार्य करणे अधिक आवश्यक आहे. शेतकरी बांधवांनी अफवा आणि अपप्रचारावर विश्वास न ठेवता शासनाच्या अधिकृत माहितीकडे लक्ष द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

"शेतकरी सशक्त झाला तर महाराष्ट्र सशक्त होईल" या विश्वासातून राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे भारतीय जनता पार्टीतर्फे स्वागत करण्यात येत असून, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कल्याणासाठी घेतले जाणारे निर्णय भविष्यातही ग्रामीण विकासाला नवी दिशा देतील, असा विश्वास शंकर देशमुख यांनी व्यक्त केला.

# परळी ग्रामीण हद्दीतून अपहरण झालेल्या व्यक्तीची शिताफीने सुटका

## खंडणीखोर चार आरोपींना बेड्या

**परळी :** परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अपहरण झालेल्या एका प्रौढ व्यक्तीची स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत शिताफीने सुटका केली असून याप्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात यश मिळवले आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्र परिसरातून तुकाराम पंढरीनाथ मुंडे या व्यक्तीचे अज्ञात कारणासाठी अपहरण करण्यात आले होते. या घटनेनंतर परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत अमरावतीपर्यंत माग काढून या गुन्ह्याचा छडा लावला.

घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ एका विशेष तपास पथकाची स्थापना केली होती. या पथकाने घटनास्थळाला भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, त्यात मारुती सुझुकी कंपनीची एक संशयास्पद गाडी आढळून आली. पोलीस पथकाने या गाडीचा माग काढत थेट अमरावतीपर्यंत धाव घेतली. पोलिसांचा माग लागल्याचे लक्षात येताच आरोपींनी पीडित व्यक्तीला अमरावती जिल्ह्यातील हिंगणघाट येथे डोळ्यांवर पट्टी बांधून सोडून दिले आणि पळ काढला. पोलिसांनी पीडित तुकाराम मुंडे यांना सुखरूप ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, तब्बल पाच कोटी रुपयांच्या खंडणीसाठी हे अपहरण करण्यात आल्याचे उघड झाले.

या खळबळजनक गुन्ह्यामध्ये सचिन नारायण वंजारे, संतोष नारायण वंजारे (दोघे राहणार परळी), अल्पेश विष्णूजी अवजाडे आणि शुभम राजू पिंपळकर (दोघे राहणार मंगरूळ चावला, अमरावती) यांनी मिळून हे अपहरण केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सर्वप्रथम संतोष वंजारे याला ताब्यात घेतले असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर उर्वरित आरोपी हे राज्याबाहेर पळून गेल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांच्या पथकाने नागपूर, मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली येथे शोध मोहीम राबवून सचिन वंजारे, अल्पेश अवजाडे आणि शुभम पिंपळकर या तिघांनाही परळी ग्रामीण पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्यातील सर्व मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास परळी ग्रामीण पोलीस करत आहेत.

ही धडाकेबाज कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक मझरअली सय्यद आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकातील अंमलदारांनी मिळून केली आहे.

# जन शिक्षण संस्थान बीड येथे जागतिक बाल कामगार विरोधी दिन कार्यक्रम संपन्न

**बीड :** 18 वर्षा खालील काम करणारे मुले हे बालकामगार मध्ये येतात. जे वय शिक्षणाचे असते, त्याच वयात विविध कारणांमुळे शिक्षण सोडून शारीरिक कष्टाची कामे करून कुटुंबास पैसा मिळवून द्यावा लागतो. खरं तर या मार्गांनी पैसे कमावणे योग्य नाही. बाल वयात काम करावे लागण्याची करणे कौटुंबिक आर्थिक परिस्थिती हालाखीची असणे. कुटुंबातील कर्ता पुरुष व्यसनी असणे. कुटुंब एकल पद्धतीचे असणे. कुटुंबातील सदस्याचे मुलांकडे दुर्लक्ष असणे. इत्यादी कारणांमुळे मुले बालवयात शारीरिक कष्टाच्या कामाकडे प्रवृत्त होतात. घरात पैसा येऊ लागल्याने कुटुंबातील इतर सदस्यांनाही ते बरे वाटते. मात्र त्यांच्या शिक्षणाकडे पूर्णतः दुर्लक्ष होते.






सध्याची बाल मुले उद्याची भावी पिढी आहे.त्यामुळे ही भावी पिढी सुदृढ ,सक्षम व शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण असणे आवश्यक असते. या बालकामगारांचे पुनर्वसन होणे गरजेचे आहे. त्यांच्या घरच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देऊन यात परिवर्तन आणता येऊ शकते. बाल वयात मुलांकडून काम करून घेणे हे कायद्याने गुन्हा आहे असे आढळून आल्यास संबंधित व्यक्तीस दोन वर्ष शिक्षा व 50 हजार रुपये दंड होऊ शकतो. असे बाल कामगार कोणाला आढळल्यास 1590 या नंबर वर टोल फ्री कॉल करावा,तसेच त्यांच्या पालकांचे समुपदेशन करावे. अशी माहिती कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक , सामाजिक कार्यकर्ते व जिल्हास्तरीय बालकामगार पुनर्वसन समिती सदस्य तत्त्वशील कांबळे यांनी कार्यक्रम प्रसंगी बोलताना दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मार्गदर्शन करताना जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर जी देशमुख म्हणाले की, जिल्ह्यात बाल कामगार होऊ नयेत यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार च्या वतीने जन शिक्षण संस्थान द्वारा 15 ते 45 वयोगटातील लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात.

ही परिस्थिती कमी करण्यासाठी सर्वांनीच जागरूक राहून प्रयत्न करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सहायक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी दीनदयाल शोध संस्थान द्वारा सुरू असलेले प्रकल्प व संस्थाच्या कार्याची माहिती,जन शिक्षण संस्थान बीड ची माहिती देऊन कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.

प्रमाणपत्र वितरण

याच कार्यक्रमात यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या असिस्टंट ड्रेस मेकर धानोरा रोड बीड येथे संपन्न झालेल्या प्रशिक्षणार्थींचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. सूत्रसंचलन कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनूरकर यांनी केले तर आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ स्वाती जैन यांनी केले

कार्यक्रमासाठी प्रशिक्षिका, प्रशिक्षणार्थी, बालवाडी व नानाजी देशमुख विद्यामंदिर च्या शिक्षिका अशी एकूण 72 लोक उपस्थित होते.

धाराशिव
जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# किलज येथे सोलार प्रकल्पाची ९० हजारांची केबल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ जून -**

तालुक्यातील किलज येथील शेत गट क्रमांक ५६/१ मधील सोलार प्रकल्पाची सुमारे ३०० मीटर डीसी केबल वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरीस गेलेल्या केबलची किंमत सुमारे ९० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.




याप्रकरणी सदानंद मलगैडा पाटील (वय ५४), व्यवसाय - परमपूज्य सोलार क्लस्टर हेड, रा. नियर आश्रम, ता. विजापूर (कर्नाटक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, ५ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने सोलार प्रकल्पातील ३०० मीटर डीसी केबल वायर चोरी केली.

याबाबतची तक्रार १३ जून रोजी नोंदविण्यात आली असून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.



### मान्सूनचा गारवा, पण ग्रामपंचायत निवडणुकांचा राजकीय पारा चढला!

# वाशी तालुक्यात ग्रा.पं. निवडणुकांची चाहूल; गावागावांत गटबांधणी, पॅनल उभारणी आणि राजकीय मोर्चेबांधणीला वेग

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जून -**

ग्रामीण सत्तेचे केंद्र मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची चाहूल लागताच वाशी तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. मान्सूनच्या आगमनामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी गावपातळीवरील राजकारणाचा पारा मात्र दिवसेंदिवस चढताना दिसत आहे. अधिकृत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यास अद्याप काही काळ असला तरी गावागावांत राजकीय हालचालींना वेग आला आहे.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये पराभवाचा सामना करावा लागलेल्या अनेक मातब्बर नेत्यांनी आता ग्रामपंचायत निवडणुकांकडे आपले लक्ष केंद्रित केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. स्थानिक पातळीवरील आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी हे नेते थेट किंवा अप्रत्यक्षपणे निवडणुकीच्या मैदानात उतरू शकतात, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये सरपंचाची निवड थेट जनतेतून होत असल्याने या निवडणुकांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे काही नेते स्वतः सरपंचपदासाठी इच्छुक असल्याच्या चर्चा असून, तर काहीजण आपल्या समर्थकांच्या माध्यमातून राजकीय ताकद दाखविण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. अलीकडेच पार पडलेल्या आरक्षण सोडतीनंतर तालुक्यातील राजकीय घडामोडींना आणखी वेग आला आहे. गावातील चावडी, हॉटेल, चहाचे कट्टे आणि सार्वजनिक ठिकाणी संभाव्य उमेदवार, वार्डनिहाय समीकरणे, पॅनल




उभारणी आणि संभाव्य आघाड्यांबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत. कोणता उमेदवार कोणत्या वार्डातून निवडणूक लढविणार, याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

ग्रामपंचायत निवडणुका पक्षचिन्हावर होत नसल्या तरी विविध राजकीय पक्षांचे गट-तट गावागावांत सक्रिय झाल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नेते आपल्या समर्थकांची मोट बांधण्यात व्यस्त असून निवडणुकीपूर्वीच राजकीय मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे अपक्ष स्वरूपाच्या या निवडणुका अनेक पक्षांच्या प्रतिष्ठेचा विषय ठरण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, प्रभावी कार्यकर्ते, माजी पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच गावपातळीवर प्रभाव असलेल्या व्यक्तींना आपल्या पॅनलमध्ये सामावून घेण्यासाठी विविध गटांकडून प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. उमेदवारांची चाचपणी, गटबांधणी आणि संभाव्य आघाड्यांची जुळवाजुळव यामुळे राजकीय हालचालींना चांगलाच वेग आला आहे.

अधिकृत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच वाशी तालुक्यातील राजकीय वातावरण रंगू लागले असून आगामी काळात अनेक गावांमध्ये नव्या आघाड्या, नवी समीकरणे आणि प्रतिष्ठेच्या चुरशीच्या लढती पाहायला मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मान्सूनच्या सरींसोबतच ग्रामपंचायत निवडणुकांच्या चर्चाही आता गावागावांत रंगू लागल्या आहेत.

# ज्येष्ठ फटाका उद्योजक तय्यबभाई दारूवाले यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा गावचे ज्येष्ठ फटाका उद्योजक तथा फटाका उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्तिमत्त्व तय्यबभाई दारूवाले यांचे रविवारी (दि. १४ जून) अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने तेरखेडा गावासह संपूर्ण फटाका उद्योग क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण त्यांना प्रेमाने 'चाचा' म्हणून ओळखत होते. मनमिळावू स्वभाव, सर्वांना आपलेसे करणारी वागणूक आणि समाजातील प्रत्येक घटकाशी जपलेले जिव्हाळ्याचे संबंध यामुळे त्यांनी विशेष स्थान निर्माण केले होते.

दीर्घकाळ फटाका व्यवसायात कार्यरत असलेल्या तय्यबभाई दारूवाले यांनी आपल्या कष्ट, जिद्द आणि दूरदृष्टीच्या बळावर तेरखेडा गावाची ओळख राज्यासह देशाच्या विविध भागांत पोहोचवली. फटाका उद्योगाच्या उभारणी व विस्तारात त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

व्यवसायाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. सर्वसामान्यांशी आपुलकीने वागणारे आणि समाजहित जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना मानाचे स्थान होते.

त्यांचा दफनविधी तेरखेडा येथील मुस्लिम कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात पार पडला. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार, व्यावसायिक सहकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे आणि मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने फटाका उद्योगाने एक अनुभवी उद्योजक, तर तेरखेडा गावाने सर्वांना आपलेसे करणारा 'चाचा' गमावला आहे.

# शेतकरी महिलांच्या पाठीशी 'नाम'चा पर्याय; बीज महोत्सवात सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ जून -**

परिस्थिती कितीही बिकट असली तरी संघर्षातून आपले अस्तित्व निर्माण करणाऱ्या गरीब, अल्पभूधारक शेतकरी आणि एकल महिलांच्या पाठीशी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून पर्याय फाउंडेशन खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकविकास मंचाचे विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांनी केले.




नाम फाउंडेशन प्रायोजित व पर्याय फाउंडेशन आयोजित बीज महोत्सवांतर्गत सोयाबीन बियाणे वाटप कार्यक्रम शनिवारी (दि. १३ जून) हासेगाव (के.), ता. कळंब येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमातून मराठवाड्यातील १५ हजार तर धाराशिव जिल्ह्यातील ५ हजार ५०० अल्पभूधारक व एकल महिला शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात विश्वनाथ तोडकर यांनी ख्यातनाम अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या नाम फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजू शेतकरी, शेतमजूर आणि महिलांसाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पर्याय फाउंडेशनचे कार्य उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी नाम फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेशजी थोरात यांनी संस्थेच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत अल्पभूधारक शेतकरी व एकल महिलांच्या विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले. हवामान तज्ज्ञ पंजाबजी डक यांनी यंदा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त करत मराठवाड्यात चांगल्या पावसाचा अंदाज वर्तविला. शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून खरीप हंगामाची तयारी करावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास गणेश थोरात, राजाभाऊ शेळके, महेश पोतदार, पंजाब डक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक ऋषिकेश तोडकर यांनी केले, सूत्रसंचालन विलास गोडगे यांनी तर आभार प्रदर्शन सुनंदा खराटे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पर्याय फाउंडेशनच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# वीरशैव-लिंगायत समाजाने गोलमेज परिषदेत मंजूर ठरावांची अंमलबजावणी करावी : प्रा. धोंडे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जून -**

अहमदपूर (जि. लातूर) येथील भक्तीस्थळावर १० जून रोजी आयोजित शिवा-वीरशैव लिंगायत गोलमेज परिषद २०२६ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या ठरावांचा देशभर प्रचार-प्रसार करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे आणि धाराशिव जिल्हाध्यक्ष संजय बताले यांनी केले आहे.



परिषदेत शिवाचार्य, मठाधीपती, कीर्तनकार, प्रवचनकार, विचारवंत आणि संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सविस्तर चर्चा होऊन दोन महत्त्वाचे ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

पहिल्या ठरावानुसार, २०२६-२७ च्या जनगणनेत धर्म नोंदविताना वीरशैव-लिंगायत अशी नोंद करावी तसेच जातीच्या नोंदीत संबंधित उपजातीपूर्वी लिंगायत हा शब्द जोडावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुसऱ्या ठरावानुसार, बसवकल्याण येथील महात्मा बसवेश्वरांचा मूळ अनुभव मंडप व परसू कट्टा केंद्र सरकारच्या ताब्यात घेऊन जागतिक पर्यटकांसाठी खुला करावा, तसेच महात्मा बसवेश्वर जयंती केंद्र सरकारच्या वतीने राष्ट्रीय स्तरावर साजरी करावी, या मागण्यांसाठी डिसेंबर २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

परिषदेत मंजूर झालेल्या या ऐतिहासिक ठरावांची समाजबांधवांनी व्यापक अंमलबजावणी करावी, असे आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गुंजोटी येथे खरीपपूर्व शेतकरी मोहिम; १०० टक्के अनुदानावर सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जून -**

कृषी विभाग व गुंजोटी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने खरीपपूर्व शेतकरी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाडीबीटी प्रणालीवर निवड झालेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना राष्ट्रीय बीज निगम निर्मित **KDS**-९९२ या सुधारित जातीचे सोयाबीन बियाणे प्रमाणित बियाणे घटकांतर्गत १०० टक्के अनुदानावर मोफत वितरित करण्यात आले.

कार्यक्रमात आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक शेती तंत्रज्ञान, जलसंधारण, पीक व्यवस्थापन तसेच शाश्वत शेतीविषयक मार्गदर्शन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी डी. बी. रीतापुरे यांनी पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासणे, बीज प्रक्रिया करणे आणि आवश्यक औषधांची प्रक्रिया करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच कमी पाण्यात अधिक उत्पादनासाठी बीबीएफ व टोकन पेरणी पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

यावेळी पावसाच्या पाण्याचा प्रभावी वापर, मृद व जलसंधारण, खतांचा संतुलित वापर आणि संभाव्य एल निनो परिस्थितीमुळे उद्भवणाऱ्या दुष्काळजन्य संकटांवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबतही शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास सहाय्यक कृषी अधिकारी अतुल गायकवाड, शरद आरेकर, प्रगतशील शेतकरी शैलेश माळगे, गुंजोटी फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे पदाधिकारी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी उपयुक्त माहिती मिळाली आहे.

# इटकळ ग्रामपंचायतीच्या प्रभाग सदस्य आरक्षणाची सोडत जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१४ जून -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ ग्रामपंचायतीच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग सदस्य आरक्षण सोडत शुक्रवारी (दि. १२ जून) ग्रामसभेत जाहीर करण्यात आली. हनुमान मंदिर परिसरात झालेल्या ग्रामसभेत रोटेशन पद्धतीने तीन प्रभागांतील नऊ सदस्यांचे आरक्षण निश्चित करण्यात आले.



प्रभाग क्रमांक १ मध्ये एससी पुरुष-१, ओबीसी महिला-१ आणि सर्वसाधारण महिला-१ अशी आरक्षणे निश्चित करण्यात आली. प्रभाग क्रमांक २ मध्ये ओबीसी पुरुष-१, एससी महिला-१ आणि सर्वसाधारण महिला-१, तर प्रभाग क्रमांक ३ मध्ये सर्वसाधारण पुरुष-२ आणि सर्वसाधारण महिला-१ असे आरक्षण जाहीर करण्यात आले.

यापूर्वीच सरपंच पदाचे आरक्षण सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी घोषित करण्यात आले असून यावेळी प्रथमच सरपंच पदासाठी संपूर्ण गावातून थेट मतदान होणार आहे. त्यामुळे ग्राम पंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय गटांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

आरक्षण सोडत कार्यक्रमास मंडळ अधिकारी डी. पी. गायकवाड, ग्रामसेवक नितीन कांबळे, तलाठी गोरोबा तोडकरी, पोलीस पाटील विनोद सलगरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तांब्या-पितळ्याच्या पारंपरिक भांड्यांनी पुन्हा वाढवलं घराचं सौंदर्य!

### ▶▶ घरातील शोपीसमध्ये भातुकलीच्या खेळातील भांड्यांच्या जपणुकीचा नवा ट्रेंड....

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१४ जून -**

आधुनिक तंत्रज्ञान आणि मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे बालपणीचे अनेक पारंपरिक खेळ काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्यामध्ये भातुकलीच्या खेळाचाही समावेश आहे. मात्र, एकेकाळी मुलांच्या खेळाचा अविभाज्य भाग असलेली भातुकलीतील तांब्या-पितळ्याची छोटी भांडी आता नव्या रूपात घरांच्या शोकेसमध्ये विराजमान होत आहेत. आलिशान फ्लॅट्स, बंगल्यांच्या इंटेरिअरमध्ये पारंपरिक तांब्या-पितळ्याच्या वस्तूंचा वापर वाढला असून, घराच्या सजावटीसाठी अशा वस्तूंना पुन्हा एकदा मोठी मागणी निर्माण झाली आहे.

लहानपणी आवर्जून खेळले जाणारे अनेक खेळ मोबाईलच्या क्रांतीनंतर मागे पडले. त्यापैकी भातुकली हा एक महत्त्वाचा खेळ होता. घरात मुलगा असला की क्रिकेट आणि मुलगी असली की भातुकलीचा डाव हे चित्र बहुतांश घरांमध्ये पाहायला मिळत असे. मात्र, बदलत्या जीवनशैलीमुळे हा खेळ जवळपास नामशेष होण्याच्या मार्गावर होता. आता त्याच भातुकलीतील तांब्या-पितळ्याच्या भांड्यांना घराच्या सजावटीत मानाचे स्थान मिळत आहे. एकेकाळी प्रत्येक घरात देवघरातील ताम्हण, पळी, फुलपात्र, अंघोळीसाठी घंगाळ, ताट, वाट्या, डबे तसेच पाणी तापविण्यासाठी बंब सहज पाहायला मिळत असे. मात्र, स्टील आणि प्लास्टिकच्या भांड्यांच्या वाढत्या वापरामुळे तांब्या-पितळ्याची भांडी हळूहळू घरातून गायब झाली. गेल्या दहा वर्षांपासून घराच्या इंटेरिअरमध्ये पारंपरिक वस्तूंचा समावेश करण्याचा कल वाढल्याने तांब्याच्या भांड्यांना पुन्हा मागणी वाढू लागली आहे.

तांब्या-पितळ्याचे हांडे, घागरी, कळशी, भगूली, तपेली, घंगाळ, बंब, पवाळी अशा विविध प्रकारची पारंपरिक भांडी महाराष्ट्रभर लोकप्रिय आहेत. या व्यवसायावर हजारो कारागीर अवलंबून आहेत. तांबे आणि पितळ्याची भांडी तयार करण्याचे काम अनेक वर्षांपासून सुरू असून, तांबट समाजाचा हा परंपरागत व्यवसाय आहे. मोठमोठी पातेली, ताट, पूजेसाठी लागणारे ताम्हण, पळी-पंचपात्र, बंब तसेच अंघोळीसाठी वापरले जाणारे घंगाळ यांसारख्या वस्तू आजही तयार केल्या जातात. तांब्या-पितळ्याची भांडी नियमित स्वच्छ ठेवावी लागतात. त्याउलट स्टील आणि प्लास्टिकच्या भांड्यांची देखभाल तुलनेने सोपी असल्याने, तसेच 'युज अँड थ्रो' संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे तांब्या-पितळ्याच्या भांड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात घटली होती. प्लास्टिक आणि स्टीलच्या वाढत्या वापरामुळे या पारंपरिक व्यवसायावरही परिणाम झाला. मात्र, तांबट समाजातील कारागिरांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हा व्यवसाय टिकवून ठेवला.

गेल्या सहा ते सात वर्षांपासून या व्यवसायाला पुन्हा ऊर्जितावस्था प्राप्त झाली आहे. पूर्वी बाथरूममध्ये वापरले जाणारे घंगाळ आता घरांच्या हॉलमध्ये तसेच आधुनिक हॉटेल्समध्ये सजावटीच्या वस्तू म्हणून स्थान मिळवत आहेत. त्यामध्ये आकर्षक रोपे किंवा कुंड्या ठेवून घराच्या सौंदर्यात भर घालण्यात येत आहे. आधुनिक हॉटेल्स, वैशिष्ट्यपूर्ण घरकुले आणि आकर्षक बंगल्यांमध्ये पारंपरिक भांड्यांचा सजावटीसाठी वापर वाढल्याने बंब, घंगाळ, लॅम्प आणि इतर वस्तूंना पुन्हा मागणी वाढली आहे.

> **घरातील इंटेरिअरला पारंपरिक स्पर्श...**
> ग्रामीण जीवनातून शहरात स्थायिक झाल्यानंतर अनेक जण स्वतःचे घर बांधतात किंवा विकत घेतात. घराचे इंटेरिअर करताना पारंपरिक वस्तूंचे संकलन करून त्यांचा सजावटीसाठी वापर करण्याची आवड वाढत आहे. तांब्याच्या वस्तू आकर्षक आणि लक्ष वेधून घेणाऱ्या असल्याने घराच्या सजावटीत त्यांचा समावेश विशेष आनंद देणारा ठरत आहे. घरातील प्रसन्न वातावरणासाठी दर्शनी भागात नावीन्यपूर्ण कलाकृतींसोबत पारंपरिक वस्तूंना स्थान देऊन त्यांचे सुशोभीकरण केल्यास घराला एक वेगळाच पारंपरिक आणि देखणा स्पर्श मिळतो. - **अॅड. निरूपा कांबळे** (गृहिणी)

# पानगाव शिवारात तेलाच्या बॉक्सची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जून -**

कळंब तालुक्यातील पानगाव शिवारात मालवाहतूक करणाऱ्या आयशर टेम्पोमधून सिध्दा गोल्ड कंपनीच्या तेलाच्या बॉक्सची चोरी झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणात अज्ञात चोरट्याविरुद्ध येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी नेताजी नागनाथ जाधव (वय ४६, रा. पेन्नूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ जून २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास ते आयशर टेम्पो (क्र. एमएच १० सीआर ३८२०) मधून सोलापूरहून कळंबकडे सिध्दा गोल्ड कंपनीच्या तेलाचा माल घेऊन जात होते.

दरम्यान, पानगाव शिवारात अज्ञात व्यक्तीने टेम्पोमधील सिध्दा गोल्ड कंपनीच्या तेलाचे दोन बॉक्स चोरी करून नेले. चोरीस गेलेल्या मालाची किंमत ७ हजार ७६८ रुपये असून, तेलाचे बॉक्स फेकून दिल्यामुळे आणखी ३१ हजार ७५ रुपये किमतीचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी नेताजी जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जवळगा येथे शिवमहापुराण कथेची सांगता
## शिव पार्वती विवाह सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १४ जून : देवणी तालुक्यातील जवळगा येथील महात्मा बसवेश्र्वर सभागृहात आयोजित अंखड शिवनाम सप्ताहातील सात दिवसीय 'शिवमहापुराण कथे'ची दि १४ जून रोजी सांगता शिव-पार्वती विवाह सोहळ्याने अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात झाली. या सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने शिवभक्तांनी हजेरी लावली होती.

या कथेचे वाचक शिभप विश्र्वनाथ स्वामी पेनूरकर तर गायक वादक शिभप हावगी पन्नासे यांची साथ होती.या कथेतील विवाह सोहळ्याचे वैशिष्ट्य शिवपार्वतीची हुबेहूब वेशभूषा पवन मुळे या दांपत्याने साकारली तसेच नंदीचे रूप परमेश्र्वर गंगापुरे ,देव गण म्हणून कपिल संगशेट,माधव जळकोटे होते.कथेमध्ये आज शिवपार्वती विवाह सोहळा असल्याने सकाळपासून लगबग सुरू सुंदर वेशभूषेत शिवपार्वतीची जोडी दिसती होती. शिवपार्वतीची बैलगाडीतून भव्य मिरवणूक वाद्यांच्या गजरात काढण्यात आली.सुरेल स्वरात मंत्रोच्चार व मंगलाष्टक झाल्या व शिवपार्वतीचा विवाह सोहळा दिमाखात पार पडला.मामा म्हणून अमित बिरादार,सोमेश्र्वर धानुरे होते विवाहाचे पौराहित्य चंद्रशेखर स्वामी यांनी केले.विवाह सोहळयानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी संपूर्ण परिसर हर हर महादेव,जय शिवशंभू च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.



# नीट २०२६ पेपरफुटी प्रकरण ताजे असतानाच लातूरात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या परिक्षेतील गैरप्रकार उघडकीस
# थेट उत्तरपञिकाच परिक्षा केंद्राबाहेर लिहीण्यासाठी दिली, तक्रार देऊनही गुन्हा दाखल नाही

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ जून : नीट २०२६ पेपरफुटी प्रकरणी लातूर ची सर्वत्र बदनामी झाली. हे प्रकरण ताजे असतानाच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परिक्षेतील गैरप्रकार उघडकीस आला आहे. चक्क उत्तरपञिका परिक्षाकेंद्राच्या बाहेर लिहिण्यासाठी पाठवली गेली. या संदर्भात थेट पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली परंतु पोलिसांनी काहीही कारवाई केली नाही.

या बाबत अधिक माहिती अशी की, माहे मे / जून २०२६ परीक्षेकरीता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे परीक्षा केंद्र महात्मा फुले महाविद्यालय जळकोट, जि. लातुर येथे आहे. दि. १०/०६/२०२६ रोजी सदर केंद्रास विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन व डॉ. यशवंत कलेपवार, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेड) यांनी एकत्रित भेट दिली. सदर केंद्रावर परीक्षेतील गैर प्रकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कॉपी प्रकरण विद्यापीठ नियमाप्रमाणे प्रक्रिया करून एकूण २५ प्रकरणे पुढील कार्यवाहीस्तव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेड यांचेकडे नियमाप्रमाणे पाठविण्यात आले.

परीक्षेच्या सर्व दालनांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करत असतांना प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन एका दालनामध्ये गेले असता त्या दालनात पर्यवेक्षक म्हणून गोविंद मुसळे हे कार्यरत होते. त्या दालनात ३० विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था होती. करिता परीक्षा विभागाकडून ३० उत्तर पुस्तिका देण्यात आल्या होत्या. परीक्षा दालनात २७ विद्यार्थी उपस्थित होते व ०३ विद्यार्थी अनुपस्थित होते. ३० उत्तरपुस्तिकांपैकी उपस्थित २७ विद्यार्थ्यांना २७ उत्तर पुस्तिका वितरित करण्यात आल्या होत्या. या स्थितीत पर्यवेक्षकाजवळ ०३ उत्तर पुस्तिका शिल्लक राहाणे अनिवार्य होते. परंतु प्रत्यक्षात पर्यवेक्षकाकडे ०२ च उत्तरपुस्तिका असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांचे निदर्शनास आले. तेव्हा पर्यवेक्षक गोविंद मुसळे यांना प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी तिसऱ्या उत्तर पञिकेची विचारणा केली असता गोविंद मुसळे यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संशय अधिक बळावला व त्या गठ्ठ्यांतील २६१०३५७५३ या क्रमांकाची उत्तरपुस्तिका गहाळ झाल्याचे निदर्शनास आले. महाविद्यालयाच्या परीक्षा कार्यालयात येऊन २६१०३५७५३ ही उत्तर पुस्तिका गहाळ झाल्याची बाब केंद्र संयोजक रामदास पंडित नागरगोजे, केंद्र सह संयोजक एस. आर. दराडे, परीक्षा प्रमुख हनुमंत व्यंकटी गित्ते यांना सांगितले असता सदर उत्तरपुस्तिका आम्ही शोधून देतो असे म्हणत त्यांनी काही कालावधी घालविला व काही कालावधीनंतर उत्तर पुस्तिका सापडत नसल्याचे सांगितले.



सदर केंद्रावरून केवळ ही एकच उत्तरपुस्तिका गहाळ झालेली नसून याची संख्या ही अधिक असू शकते. सदरील दालनातील ०३ अनुपस्थित विद्यार्थी ब्याकोडे उमेश मनमतप्पा, मालुरे श्रीराम प्रल्हाद आणि इंद्राळे तुषार बालाजी हे दि. १०/०६/२०२६ रोजी प्रथम सत्रात जरी अनुपस्थित दिसत असले तरीही प्रत्यक्षात त्यांनी यापूर्वीचे पेपर दिले आहेत. हा सर्व प्रकार पाहता या ०३ विद्यार्थ्यांपैकी कोणत्यातरी एका विद्यार्थ्याने ही गहाळ झालेली उत्तर पञिका दालनातून बाहेर घेवून जाण्याची कृती केलेली असू शकते. उत्तरपुस्तिका गहाळ करून गैरप्रकारात सहाय्य करण्याचे काम केंद्र संयोजक रामदास पंडित नागरगोजे, केंद्र सह संयोजक एस.आर. दराडे, परीक्षा प्रमुख हनुमंत व्यंकटी गित्ते यांचे मार्फत होत असून दि. १०/०६/२०२६ रोजी दालनातील पर्यवेक्षक गोविंद मुसळे यांनी ही सहकार्य केल्याचे दिसून येते. केंद्र प्रमुख म्हणून चंद्रशेखर कळसे यांनाही जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही. करिता या सर्वांच्या विरोधात रितसर पोलिस केस करण्याची सूचना प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी सदर केंद्रावर विद्यापीठाने नियुक्त केलेले वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक सुर्यकांत दत्तात्रय माळहिप्परगे यांना दिली. परंतु वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक सुर्यकांत दत्तात्रय माळहिप्परगे यांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली नाही.

त्यामुळे वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक सुर्यकांत दत्तात्रय माळहिप्परगे सदर केंद्रावर कार्यरत असतांना उत्तर पुस्तिका गहाळ होणे, उत्तर पुस्तिका बाहेरून लिहून आणणे हे प्रकार घडतात व संबंधित दोर्षीवर गुन्हा दाखल करण्याची सूचना देवूनही विद्यापीठाने नियुक्त केलेले वरिष्ठ बहिस्थ पर्यवेक्षक सुर्यकांत दत्तात्रय माळहिप्परगे हे पोलिस स्टेशनमध्ये अर्ज देत नाहीत. याचा अर्थ सदर गैरप्रकारात त्यांचाही सहभाग असण्याची शंका निर्माण होते. असे ही तक्रारी मध्ये नमूद केले आहे.

सुर्यकांत दत्तात्रय माळहिप्परगे यांना विद्यापीठ परीक्षेच्या कामातून तातडीने कमी करण्यात आले आहे. डॉ. यशवंत कलेपवार, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, विभागीय केंद्र नांदेड या नात्याने तक्रार अर्ज दाखल करून उत्तरपुस्तिका गहाळ करणाऱ्या, बाहेरून उत्तरपुस्तिका लिहून आणणाऱ्या सर्वांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. शैक्षणिक क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या या अपप्रवृत्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी अशी विनंती पण करण्यात आली आहे.

## भिषण अपघातात, तिघांचा मृत्यू

तभा वृत्तसेवा








चाकूर दि. १४ जून : चाकूर बायपासवरील लातूर -नांदेड राष्ट्रीय महामार्ग विचीत्र अपघात होऊन रस्ता रक्तरंजित झाला होता. शनिवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास तीन वाहनांच्या विचित्र आणि भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाले. या अपघातानंतर रस्त्यावर सर्वत्र रक्ताचे सडे पडले होते.यात तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेली माहिती अशी, की अहमदपूरहून लातूरकडे जाणारा आयश ट्रक (क्रमांक एमपी ०९ जीएच १०२०) भरधाव वेगाने येत असताना चाकूरकडून (अलगरवाडी पाटी) बायपासजवळ रस्ता ओलांडत असलेल्या मोटारसायकल स्वराला जोरदार धडक दिल्याने या दुर्दैवी अपघातात मोटारसायकलवरील जनार्धन काळबा येणगे वय ६० वर्षे व त्यांच्या पत्नी सविता जनार्दन येनगे वय ५५ रा.तेलगाव हे पती-पत्नी जागीच ठार झाले आहेत. या धडकेनंतर आयशर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि विरुद्ध दिशेने समोरून लातूरहून शिरूर ताजबंदकडे जाणाऱ्या वॅगनर कार एम.एच. २४ बी.आर. ७१२१ कारवर जोरदार धडकले. या अपघातात वॅगनरमधील श्रेयश सचिन वाघमारे वय १६ वर्षे रा.शिरूर ताजबंद याचा जागीच मृत्यू झाला असून त्या गाडीतील सुशील शिवमुर्ती स्वामी ४२ वर्षे रा. शिरूर ताजबंद हे गंभीर जखमी झाले आहेत. ते दोघेजण शिरूर ताजबंदचे रहिवासी आहेत. जखमींना तातडीने ग्रामीण रुग्णालय,चाकूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.





हा अपघात इतका भीषण होता की काही क्षण परिसरात एकच आक्रोश पसरला. मदतीसाठी धावलेल्या नागरिकांचेही मन हेलावून गेले. रस्त्यावर पडलेले रक्ताचे डाग आणि वाहनांचा चक्काचूर झालेला अवस्थेतील अवशेष पाहून अपघाताच्या तीव्रतेची कल्पना येत होती.

चाकूर बायपासवरील हा राष्ट्रीय महामार्ग दिवसेंदिवस मृत्यूचा सापळा ठरत चालला आहे. याच मार्गावर वारंवार भीषण अपघात होत असून अनेक निरपराध नागरिकांना आपला जीव गमवावा लागत आहे. तरीही संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून ठोस उपाययोजना होताना दिसत नाहीत.

स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी उड्डाणपूल, सेवा रस्ता, वेगमर्यादा नियंत्रण, इशारा फलक आणि कायमस्वरूपी वाहतूक व्यवस्थापनाची उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. आणखी किती निष्पाप जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

## पाणी उशाला अन् कोरड घशाला
## नागरी मुलभूत सुविधा पुरविण्यात नगरपालिकेला अपयश

तभा वृत्तसेवा

औसा दि. १४ जून : कोट्यावधी रुपयांच्या योजना राबविन्हियासा शहराला पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा दहा पंधरा दिवसांनी होत असून शहरवासीयांची अवस्था ऐन उन्हाळ्यापासून या जून महिन्यात ही पाणी उशाला अन्न कोरड घशाला अशी झाली आहे. यासह दोन दोन महिने गटारीची स्वच्छता करण्यात येत नाही. तसेच घंटागाडी ही वेळेवर येत नसल्याने शहरात अस्वच्छतेची साम्राज्य पसरली आहे. यामुळे शहरात नागरी सुविधा पुरविण्यात औसा नगरपालिकेला अपयश आल्याची चर्चा शहरवाशियातून व्यक्त होत आहे.

औसा शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यात नगर परिषद प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप एमआयएमच्या वतीने नगर परिषदेला दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि नालेसफाईच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

यावर्षीच्या तीव्र उन्हाळ्यात शहरातील नळधारकांना दहा ते पंधरा दिवसांनी पाणीपुरवठा केला जात आहे. शहराला माकणी व तावरजा प्रकल्पातून पाणीपुरवठा करण्यासाठी सरकारने कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. तरीही शहरातील नागरिकांना पाण्यासाठी दररोज भटकंती करावी लागत आहे. नगरपालिकेकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा पाणीपुरवठा पुरेसा होत नसल्याने नागरिकांना पाणी विकत पाणी घेण्याची वेळ आली आहे. याबाबत नागरिकांनी विचारणा केल्यास वारंवार मोटार खराब असल्याचे कारण केले जात असल्याचा आरोप या निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

शहरातील अनेक प्रभागांमध्ये चार ते पाच दिवस घंटागाडी येत नसल्याने नागरिकांना कचरा उघड्यावर टाकावा लागत आहे. त्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची तक्रार या निवेदनात करण्यात आली आहे. घंटागाड्यांची संख्या अपुरी असल्याने दोन ते तीन वार्डांसाठी एकच घंटागाडी कार्यरत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शहरातील गटारींची नियमित स्वच्छता होत नसून दोन-दोन महिने साफसफाई केली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पावसाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर शहरातील सर्व नाल्यांची तातडीने स्वच्छता करण्यात यावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

शहरवासी यांच्या वतीने करण्यात आलेल्या तात्काळ पूर्तता करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देण्याची मागणी एम आय एम चे औसा प्रमुख सय्यद मुजफ्फर अली इनामदार यांनी केली आहे. अन्यथा एमआयएमच्या वतीने नगर परिषद प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे

## वसतिगृहातून निघून गेलेली २ मुले पालकांच्या स्वाधीन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ जून : महाराष्ट्र पोलीस दलमार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन शोध-या विशेष मोहिमेअंतर्गत हरवलेली बेच्चा झालेली कसेच विविध कारणांनी घरापासून दूर गेलेली मुले शोधून त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न सुरू आहेत या मोहिमेदस्यान शिवाजीनगर पोलीस स्टेशनव्या अधिकाली व अंमलदारांनी उल्लेखनीय कामगिरी करत वस्तीगृहातून निघून गेलेला चेन अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या तया सुखरूप दिले आहे. संबंधित दोन्ही मुले काही कारणास्तव वस्तीगृहातून कोणालाही न सांगता निमून गेली होती. मुलांच्या वेळा होण्यानी माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी तात्काळ शोध मोहीम हाती घेतली. परिसरातील विविध शिकाणी चौकशी निक माहितीचे विशेषण तसेच स्थानिक नागरिकां मदतीने शोधकार्य राबविण्यात आले. अखंड प्रयत्न निंतर पोलिसांनी दोन्ही मुलांचा शोच लावून त्यांची समुपदेशनपूर्वक विचारपूस केली, त्यानंतर सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

## जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी १५१ विहिरींचे अधिग्रहण
## जळकोट तालुक्यात ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

तभा वृत्तसेवा



लातूर दि. १४ जून : जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता, जिल्हा परिषद प्रशासनाकडून विविध उपाययोजना वेगाने राबविल्या जात आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अहवालानुसार जिल्ह्यात ३ टँकर आणि १५१ विहीर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील केवळ जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, तेथील ३ गावे आणि १ वाडी, अशा एकूण ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये १ खाजगी आणि २ शासकीय मिळून एकूण ३ टँकर मंजूर करण्यात आले आहे. या टँकर्सच्या माध्यमातून मंजूर केलेल्या ६ खेपांनुसार प्रत्यक्ष पाणीपुरवठा केला जात आहे. जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा येथे १० एप्रिल २०२६ पासून आणि गव्हाण येथे २४ एप्रिल २०२६ पासून टँकर मंजूर करण्यात आले असून, वंजारवाडा येथे १ जून २०२६ पासून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

जिल्ह्यात सध्या टँकरसाठी ३ आणि टँकरव्यतिरिक्त इतर पाणीपुरवठ्यासाठी १४८ अशा एकूण १५१ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. या अधिग्रहित विहिरींच्या माध्यमातून जिल्ह्यातील एकूण १२५ गावे व वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये अहमदपूर तालुक्यात सर्वाधिक ५२ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, त्याखालोखाल औसा तालुक्यात ३५, जळकोट तालुक्यात १५, निलंगा तालुक्यात १३, उदगीर तालुक्यात ११, रेणापूर तालुक्यात ८, चाकूर तालुक्यात ५, शिरूर अनंतपाळ तालुक्यात ६, लातूर तालुक्यात व देवणी तालुक्यात प्रत्येकी ३ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

## हेल्मेट न वापरणाऱ्या पोलिसांच्या सेवा पुस्तिकेत होणार नोंद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १४ जून : जिल्हयाचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी हेल्मेट वापराच्या सक्तीबाबत सुचना देत असताना लातूर जिल्हयातील सर्व प्रभारी अधीकारी यांना त्यांच्या अधीनस्थ असलेल्या प्रत्येक पोलीस अमलदार यांनी हेल्मेट वापरले पाहीजे नाही वापरल्यास त्यांना शिक्षा देवून त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकामध्ये घेतली जाईल अशा सुचना देवून पोलीस निरीक्षक वहातूक शाखा यांना त्याची सुरूवात पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर या ठिकाणावरून करण्यास बजावलेले होते.

या सर्व बाबींचा परीणाम हेल्मेट वापरावर झाला असून सर्व पोलीस अमलदार जास्तीत जास्त हेल्मेटचा वापर करत आहेत. यामुळे नागरिकांनी पोलिसांच्या हेल्मेट वापराचा आदर्श घेऊन स्वतःही हेल्मेट वापरणे गरजेचे आहे.

## चोरीचा उलगडा अन् जनावरे चोरीचा डाव पाडला हाणून

तभा वृत्तसेवा



लातूर दि. १४ जून : येथील विवेकानंद चौक पोलिसांनी एका बाजूला १४ लाख रुपयांहून अधिक किंमतीच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीचा उलगडा करून महिला आरोपीला अटक केली तर दुसऱ्या बाजूला बैल चोरीच्या तयारीत असलेल्या चोरट्यांना पकडून तीन बैलांचा गुन्हा नोंद होण्यापूर्वीच शेतकऱ्याला दिलासा दिला आहे.

एलआयसी कॉलनी परिसरातील फिर्यादीच्या राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने अंदाजे ९ तोळे ९ ग्रॅम वजनाचे, सुमारे १४ लाख ४८ हजार ५५० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असलेली पर्स चोरी केली होती. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा होता. पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांचे नेतृत्वात पथक नेमले गेले होते. गुप्त माहितीदार, तांत्रिक विश्र्लेषण आणि शास्त्रीय तपासाच्या आधारे पोलिसांनी अल्पावधीतच आरोपीचा शोध घेतला. याप्रकरणी शामल मोहन राठोड (वय ४० वर्षे, रा. कन्हेरी तांडा, ता. जि. लातूर) हिला ताब्यात चोरीस गेलेल्या मालापैकी ९ तोळे ४ ग्रॅम वजनाचे, सुमारे १३ लाख ६३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

तर दुसऱ्या घटनेत सारोळा येथील शेतकरी बिभीषण संपती बनसोडे यांच्या शेतातून मध्यरात्री तीन बैल चोरीस नेण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच विवेकानंद चौक पोलीस ठाण्यातील कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार त्रिंबकेश्र्वर अनिल विरकर आणि दीपक आबाजी सोनकांबळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळापासून दोन किलोमीटर अंतरावरील एका शेताच्या बांधावर अंधारात बांधून ठेवलेले तीनही बैल पोलिसांना आढळून आले. त्यानंतर बैलांची ओळख पटवून ते शेतकरी विभीषण बनसोडे यांच्या ताब्यात देण्यात आले.

या तत्पर कारवाईमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान टळले. सदर दोन्ही कारवाया पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे सूचनेनुसार, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या नेतृत्वात पार पडल्या.